उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक



# गांवकरी

आज धनत्रयोदशी



■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : ६१ ■ नाशिक, मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर २०२४ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा




www.chandukakasaraf.in | TOLL FREE 1800 267 8555

**बारामती:** महावीर पथ | कचेरी रोड | **बारामती एम. आय. डी. सी.:** पेन्सिल चौक | **अकलूज:** शासकीय विश्रामगृहासमोर
**पुणे:** चंदननगर: द्वारका चेंबर्स | हडपसर: मगरपट्टासिटी मेन गेट समोर | **संगमनेर:** व्यापारी संकुल, एस. टी. स्टँड
**अहिल्यानगर:** नेवासकर पेट्रोलपंप शेजारी, सथ्था कॉलनी | **नाशिक:** साई स्पोर्ट्स जवळ, कॅनडा कॉर्नर
**पंढरपूर:** सरगम चौक, एच. डी. एफ. सी. बँक जवळ | **सोलापूर:** सात-रस्ता, स्टेशन रोड, यतिराज हॉटेल समोर
**फलटण:** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, शिंगणापूर रोड

# अचानक भेट अन् संवादाने भारावल्या आदिवासी विद्यार्थिनी

## आयुक्त नयना गुंडे यांनी घेतला आश्रमशाळेतील सुविधांचा आढावा

**नाशिक : प्रतिनिधी**
**दुर्गम अति दुर्गम भागात राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थिनींसाठी आदिवासी विकास विभागाकडून शासकीय कन्या आश्रम शाळा चालविल्या जातात. मात्र, अनेकदा आश्रमशाळांबाबत तक्रारी येतात. आश्रमशाळांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांचा आढावा घेण्यासाठी आयुक्त नयना गुंडे यांनी नुकतीच त्र्यंबकेश्वर तालुक्यातील देवरगाव येथील शासकीय कन्या आश्रमशाळेला सरप्राईज व्हिजिट दिली. उच्च पदस्थ अधिकाऱ्यांनी साधलेल्या संवादाने विद्यार्थिनी भारावून गेल्या होत्या.**



आश्रमशाळांमध्ये पारंपारिक शिक्षणासोबतच कौशल्य विकासचे धडे दिले जातात. त्याअंतर्गत विद्यार्थिनींना औद्योगिक वसाहतींना भेट व तज्ञांचे मार्गदर्शन मिळते. इंटर्नशिपची संधी उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे विद्यार्थिनींना आत्मनिर्भर होण्यास मदत होत आहे.
– **नयना गुंडे,** आयुक्त, आदिवासी विकास विभाग

देवगाव शासकीय माध्यमिक आणि उच्च माध्यमिक कन्या आश्रमशाळेत इयत्ता पहिली ते बारावीमध्ये ६१६ विद्यार्थिनी प्रवेशित आहे. समग्र शिक्षा अभियानांतर्गत इयत्ता नववी ते बारावीचे विद्यार्थिनींसाठी मल्टी स्किल तसेच ब्युटी अँड वेलनेस हे दोन स्किल डेव्हलपमेंटचे विषय शिकविले जातात. त्यासाठी लँड हॅन्ड इंडिया या संस्थेने अद्यावत लॅब कार्यान्वित केली आहे. या लॅबची पाहणी आयुक्त गुंडे यांनी केली. यावेळी उपायुक्त विनिता सोनवणे, मुख्याध्यापक अरविंद सुरवाडे, लँड हॅन्ड इंडियाचे उपसंचालक निलेश कुऱ्हाडकर, जिल्हा समन्वयक उमेश गटकळ, विषय शिक्षक आदेश हांडगे, आशा गोसावी आदी उपस्थित होते.

आश्रमशाळेतील विद्यार्थिनी सोबत आयुक्त गुंडे व उपायुक्त सोनवणे यांनी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. आयुक्तांनी आश्रमशाळेतील सुरक्षितता, भौतिक व आरोग्य विषयक सुविधा तसेच यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी पुरविण्यात आलेल्या गणवेश व स्टेशनरी यांची माहिती घेतली. आयुक्तांनी आश्रमशाळा आवारात उभारण्यात येत असलेल्या मुलींच्या वस्तीगृहाची पाहणी केली.




# ना नफा ना तोटा तत्वावर दिवाळी फराळ विक्री

**लासलगाव वार्ताहर**
**सर्व सामान्यांची दिवाळी सुखकर व्हावी म्हणून लोकनेते दत्त-ाजी पाटील प्रतिष्ठानच्या वतीने सवलतीच्या दरात ना नफा ना तोटा या तत्वावर दिवाळी फराळ विक्रीचा शुभारंभ करण्यात आला. सुरुवातीला लोकनेते दत्ताजी पाटील विद्यालयाचे शिक्षक विजय साबळे, बद्रीप्रसाद वाबळे, ऋषिकेश वाघ यांच्या हस्ते सपत्नीक विधीवत पूजा करण्यात आली. या कार्यक्रमासाठी फराळ पुरवठादार दिलीप देसाई, मोईन खान, नरेंद्र परदेशी, भास्कर परदेशी, प्रकाश वाघाटे यांचा सत्कार करण्यात आला.**

परिसरात शेतीची विविध कामे जोमाने सुरु असून खरीप हंगामातील पिकांची काढणी व रब्बी हंगामातील पिकांची पेरणी कांदा लागवड या सारख्या अनेक शेतीची कामे सुरू असल्याने महिला शेतकरी व शेत मजूर यांना दिवाळी साजरी करणे जिकरीचे होते,आमच्या उपक्रमाच्या माध्यमातून महिलांना मोठा दिलासा मिळत असून शेतकरी बंधु व शेतमजुरांची दिवाळी ही अल्प रकमेत आनंदात साजरी होते. यावर्षी शहरात फराळ विक्रीचे अनेक स्टॉल उभे राहिले असुन परिसरात उत्तम पाऊसपाणी झाल्यामुळे या उपक्रमाला भरघोस प्रतिसाद लाभेल अशाप्रकारचे वातावरण दिसते आहे .
– **नानासाहेब पाटील,** उपक्रमाचे संयोजक

यावेळी लासलगाव शिक्षण सहाय्यक मंडळाचे अध्यक्ष नानासाहेब पाटील, सचिव संजय पाटील, शंतनू पाटील, अभय पाटील, नीता पाटील, रंजना पाटील, पुष्पा दरेकर, वैष्णवी पाटील, दत्तात्रय डुकरे, राजाभाऊ दरेकर, निवृत्ती गायकर, सीताराम जगताप, डॉ. सुरेश दरेकर, डॉ. कैलास पाटील, देवीदास पाटील, प्रल्हाद पाटील, तुळशीराम जाधव, लक्ष्मण मापारी, प्रकाश गांगुर्डे, कैलास ठोंबरे, विठ्ठलराव गायकर,पोपट नवले,भागवतराव होळकर, शाहू होळकर, अरुण शर्मा, राजाभाऊ कराड, दत्ता पाटील, जनार्दन जगताप, प्रकाश कापडी, अरुण शिंदे,दत्तूलाल शर्मा, प्रदीप माठा, विश्वास पाटील, सुधाकर सोनवणे, बाबासाहेब गोसावी, दत्तू गांगुर्डे, संजीवनी पाटील, प्राचार्य रमेश सोनवणे मुख्याध्यापिका रोशनी गायकवाड, मुख्याध्यापक मोहन निकम आदी मान्यवर उपस्थित होते.

गत सतरा वर्षांपासून या प्रतिष्ठानच्यावतीने दिवाळी फराळाची सुरुची मिठाई या नावाने दिवाळी फराळरुपी पदार्थ सोनपापडी,मोतीचूर लाडू,म्हैसूर पाक, करंजी, नानकटाई आदी तसेच दोन-तीन प्रकारच्या शेव व चिवडा, चकली आदी तिखट पदार्थ केवळ १२० रु प्रति किलो, प्रति पाकीट या दराने विक्री केली जाते. या वर्षी सुमारे ९० हजार किलो फराळ पदार्थांची उपलब्धता करण्यात आली असून पुढील पाच ते सहा दिवस सकाळी नऊ ते सायं सहा वाजे पर्यंत लोकनेते दत्ताजी पाटील स्मारका शेजारी या दिवाळी फराळ पदार्थांची विक्री सुरू राहणार आहे अशी माहिती यावेळी संयोजक नानासाहेब पाटील यांनी दिली.

या उपक्रमासाठी अनेक संघटना व हितचिंतकांची मोलाची मदत होत असून परिसरातील सर्व सामान्य शेतकरी व शेतमजूर कामगार आदी मंडळींची फराळ पदार्थ खरेदी साठी झुंबड उडत असते.लोकनेते दत्ताजी पाटील प्रतिष्ठान व त्यांच्याशी संलग्न लोकनेते दत्ताजी पाटील सह बँक लासलगाव शिक्षण सहायक मंडळ, लासलगाव खरेदी विक्री संघ या संस्थेचे संचालकांचा व कर्मचारी वर्गाचा सक्रिय सहभागातून ही सेवा पार पडते.

## महत्त्वाचे

### दीपोत्सवाच्या पहिल्या दिवशी केला परिवाराकडून देणगी



**नाशिक : प्रतिनिधी**
वसुबारस हा दिपोत्सवाचा पहिला दिवस. या दिवशी उद्योजक किशोर केला व परिवाराने श्री काळाराम मंदिर संस्थानला भरीव देणगी अर्पण केली. तसेच संस्थानला आवश्यक असणारे संगणक, प्रिंटर प्रदान केले. विश्वस्त धनंजय पुजारी, मंदार जानोरकर, मंगेश पुजारी यांनी धनादेशाचा व देणगीचा स्वीकार केला. श्रीरामाची प्रतिमा देऊन देणगीदारांचा सत्कार केला. प्रारंभी श्री काळारामाचे व दास मारुतीचे पूजन करण्यात आले. किशोर केला, वंदना, मुलगा सत्य, सून स्नेहल व नाती समन्वी व साऱ्या यांच्या हस्ते देणगी देण्यात आली. याप्रसंगी पत्रकार संजय देवधर, हेमंत वाड, सुनील जोशी हे स्नेही तसेच संस्थानचे व्यवस्थापक राघवेंद्र अंकलगी, कर्मचारी मच्छिंद्र खकाळ आदी उपस्थित होते. यापूर्वी केला परिवाराने नवरात्रोत्सवात श्री कालिका माता संस्थानला देणगी दिली.

### दिंडोरी तालुक्यात नुकसानग्रस्त द्राक्षबागांचे पंचनामे सुरू



**सोनजांब : वार्ताहर**
नाशिक जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे द्राक्ष बागांचे पंचनामे करण्याचे आदेश तहसीलदार मुकेश कांबळे यांनी दिले. यावेळी वरखेडा मंडळ अधिकारी प्रीती अग्रवाल तालुका कृषी अधिकारी नानासाहेब भोये मंडळ कृषी अधिकारी संजय सावंत कृषी पर्यवेक्षक केदार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी सहाय्यक सुवर्णा नवले तलाठी अजय भोये मनोज खरोटे प्रभारी ग्रामसेवक सोमनाथ ढोकरे आणि चंद्रकांत भवर यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन द्राक्ष बागेचे झालेल्या नुस्कानाचे पंचनामे करण्यात आले. अवकाळी पावसामुळे द्राक्ष बाग फ ुलोरा अवस्थेत घड कुज होणे द्राक्ष बागांचे घड जिरणे अवकाळी व पावसामुळे भरपूर प्रमाणात औषधांच्या फवारणीचा खर्च वाढला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुस्कानीचे पंचनामे केले यावेळी उपस्थित शेतकरी बांधवांनी शासनाकडून जास्तीत जास्त नुकसान भरपाई मिळावी ही अपेक्षा शेतकऱ्यांनी केली. यावेळी उपस्थित सरपंच प्रभाकर सदाशिव जाधव उपसरपंच अरुणा गणेश जाधव, माजी सरपंच तुकाराम जाधव, तंटामुक्त अध्यक्ष रावसाहेब जाधव, कचरू शेळके, महारुद्र पतसंस्थेचे चेअरमन बाबूराव पुंडलिक जाधव व व्हा. चेअरमन सुनिल संधान, भाऊसाहेब जाधव, केदारनाथ हरिचंद्रे, वसंत जाधव, सोसायटी चेअरमन सुकदेव जाधव, सेतू संचालक नवनाथ जाधव आदी शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

### बोरस्ते विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची पर्यावरणपूरक दिवाळीची शपथ

**ओझर : वार्ताहर**



येथील मविप्र संचालित माधवराव बोरस्ते विद्यालयात विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करण्याची शपथ घेतली शिक्षक नरेंद्र डेरले यांनी शपथ दिली. दिवाळी सण साजरा करताना विद्यार्थ्यांनी इतर कोणत्याही प्रकारचे फटाके न फोडता पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करावी असे आवाहन मुख्याध्यापक सोपान वाटपाडे यांनी करुन विद्यार्थ्यांना पर्यावरण पूरक शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी आत्माराम शिंदे क्रीडाशिक्षक प्रभाकर लवांड नरेंद्र डेरले उपस्थित होते. अरुण सावंत मोनाली निकम मोहन क्षिरसागर यांनी फलक रेखाटन केले. विद्यालयाच्या प्रांगणात शिक्षिका मनीषा मोगल वर्षा पाटील राजश्री टरले शितल आहेर यांनी रांगोळी काढून सुशोभन केले. विद्यालयात विद्यार्थ्यांनी तयार केलेले आकाश कंदील लावण्यात आले होते. शेवटी सर्व विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करण्याची शपथ घेतली.

## निधन वार्ता

### कमलाबाई बैरागी

**सोनजांब : वार्ताहर**



चौंधाणे ता. सटाणा येथील डॉ. बजरंग किसनदास बैरागी यांच्या मातोश्री कमलाबाई किसनदास बैरागी यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### सुनील शेळके

**सिन्नर : प्रतिनिधी**



तालुक्यातील नांदूरशिंगोटे येथील युवा शेतकरी सुनील चंद्रभान शेळके यांचे वयाच्या ३४ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई-वडील, भाऊ, पत्नी, मुलगी, बहीण, भावजई, पुतणी असा परिवार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे युवक तालुकाध्यक्ष संदीप शेळके यांचे ते धाकटे बंधू होत.



**नांदगाव : नांदगाव नगरपरिषद येथे ''एक दिवा मतदानाचा''या उपक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी एक दिवा मतदानाचा या उपक्रमात सहभागी झालेले नांदगाव नगरपालिकेचे प्रशासकीय अधिकारी कर्मचारी वर्ग आदी.**
**(छाया : महेंद्र पगार)**

# नांदगाव नगरपरिषदला 'एक दिवा मतदानाचा' उपक्रमास सुरुवात

**नांदगाव : प्रतिनिधी**
**आगामी विधानसभा निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी नाशिक जिल्हा मतदान जनजागृती अभियानाचे प्रमुख तसेच नाशिक जिल्हा परिषेदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून तसेच नांदगांव विधानसभेच्या निवडणूक निर्णय अधिकारी सुरेखा चव्हाण तहसीलदार सुनील सौंदाणे मुख्याधिकारी नांदगाव नगर परिषद शामकांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली नांदगाव नगरपरिषद येथे एक दिवा मतदानचा या उपक्रमास सुरुवात करण्यात आली.**

दीपावली म्हणजे दीपोत्सव म्हणूनच नांदगाव शहराचे आराध्य दैवत एकविरा देवी मंदिर या ठिकाणी नांदगाव नगर परिषदे द्वारा शहरातील बचत गटातील महिला तसेच नागरिकांच्या सहभागातून एक दिवा मतदानाचा या उपक्रमा अंतर्गत दिवा लावून सुरुवात करण्यात आली.

यावेळी उपस्थित नागरिकांना मतदान करणे बाबत प्रबोधन करण्यात आले. मतदान जनजागृतीचा लोगो दिव्यांनी उजाळून निघाला होता. म्हणून त्या ठिकाणी नागरिकांची सेल्फी घेण्यासाठी मोठी गर्दी झाल्याचे पाहायला मिळाले या उपक्रमा प्रसंगी नांदगांव नगरपालिकेचे प्रशासकीय अधिकारी राहुल कुटे यांच्यासह प्रभारी प्रशासनधिकारी अनिल पाटील सहायक प्रकल्प अधिकारी, आनंद महिरे समुदाय संघटक विजया धनवट आदी यावेळी उपस्थित होते.

# सुरक्षित दिवाळी साजरी करा; महावितरणचे आवाहन

**नाशिक : प्रतिनिधी**
**दिवाळीची लगबग सुरू झाली असून, सर्वत्र नवचैतन्याचे वातावरण आहे. या दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी महावितरणच्या ग्राहकांनी विद्युत उपकरणांचा सतर्कने वापर करावा.**

**हे लक्षात ठेवा**
- विद्युत यंत्रणा, वीजतारांजवळ वा खाली रोषणाई करणारे फटाके उडवू व फोडू नयेत.
- विजेच्या उपकरणांजवळ फटाके ठेवू नयेत.
- एकाच विद्युत सॉकेट्सवर अधिक भार टाकू नये व त्यामध्ये काड्या खोचू नये.
- रोषणाईसाठी वापरण्यात येणारे विद्युत दिवे, त्यांच्या तारा व सॉकेट्स तपासून घ्याव्यात.

दिवाळीतील सजावट, रोषणाई आणि आतीषबाजी करताना चुकीमुळे दुर्दैवी घटनांनी आनंदाचे वातावरण दु:खात बदलायला वेळ लागत नसतो, अशा दुर्घटना टाळण्यासाठी खबरदारी घेऊन विद्युत सुरक्षिततेच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे सुरक्षित व सतर्क राहण्याचे आवाहन महावितरणच्या नाशिक परिमंडलाकडून करण्यात आले आहे.

दिवाळीच्या दिवशी फटाक्याने लागलेल्या आगीच्या घटना दरवर्षीच मोठ्या संख्येने होतात. यात केवळ आर्थिकच नव्हे तर जीवित हानीही होण्याची शक्यता असते. सुरक्षिततेची खबरदारी न घेतल्याने, निष्काळजीपणा आणि उदासिनता यामुळे अशा घटना होत असतात. आपल्या व आपल्या कुटुंबीयांचा दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी महावितरणने काही खबरदारीचे उपाय सुचविले आहेत.

दिवाळी आणि दिवे यांचे एक अतूट नाते आहे. त्यामुळे दिव्यांनी घराची सजावट करतांना ती मोकळ्या जागेतच लावावीत. पडदे, बिछाना यापासून ते लांब असतील याची काळजी घ्यावी. लहान मुले आणि पाळीव प्राण्यांपासून दिवे दूर आणि उंचीवर तसेच पंखे, वीजतारा यापासूनही ते दूर ठेवावेत. उच्च दर्जाच्या दिव्यांच्या माळांचा वापर करावा.

तुटलेल्या वीज तारा वापरू नयेत किंवा जोड देताना योग्य दर्जाच्या इन्सुलेशन टेपने त्या सुरक्षित करून घ्याव्यात. तुटलेले सॉकेट्स वापरू नयेत. घरात कुणीही नसताना सर्व विद्युत उपकरणे बंद करावीत, असे आवाहन महावितरणने केले आहे.

आपातकालीन संपर्क- कुठल्याही कारणामुळे विद्युत पुरवठा खंडित झाल्यास सुरळीत करण्यासाठी महावितरणची यंत्रणा कार्यरत असते. त्यामुळे काही वेळ संयम बाळगून नंतर संपर्क करावा. आपातकालीन परिस्थितीमध्ये नजिकच्या महावितरण कार्यालयात अथवा महावितरणच्या २४७ सुरू असणाऱ्या ग्राहक सुविधा केंद्राचे १९१२ किंवा १८००-२३३-३४३५ किंवा १८००-२१२-३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

# रेल्वेत चाकूचा धाक दाखवून पैसे चोरणाऱ्यास अटक

**शिलापूर : प्रतिनिधी**
**रेल्वेच्या जनरल डब्यातून प्रवास करणाऱ्या प्रवाशास चाकूचा धाक दाखवून बळजबरीने पैसे लुटणाऱ्या फरारी आरोपीस नाशिकरोड लोहमार्ग पोलिसांनी अटक केली आहे.**



याबाबत अधिक माहिती अशी की, १२ सप्टेंबर रोजी काशी एक्सप्रेसच्या जनरल डब्यातून प्रवास करणाऱ्या हैदर अली अफरोज अहमद. राहणार उत्तर प्रदेश या प्रवाशास चाकूचा धाक दाखवून चार चोरट्यांनी बळजबरीने पैसे घेतले होते. तशी फिर्याद त्यांनी नाशिक रोड लोहमार्ग पोलिसांत दिली होती. त्यानुसार गुन्हा रजिस्टर नंबर ३१५ / २०२४ कलम ३०९ (४) ३ (५) नुसार गुन्हा दाखल करून तीन आरोपींना २४ तासाच्या आत अटक करण्यात आली होती. परंतु चौथा आरोपी फरार होता .त्याचा दीड महिन्यांपासून पोलीस शोध घेत होते. परंतु तो मिळून येत नव्हता. पोलीस सतत त्याच्या मागावर होते.

सायबर सेलच्या मदतीने सापळा रचून संघानंद उर्फ संघर्ष विलास जमदाडे (२०) राहणार प्रबुद्ध नगर. सातपूर नाशिक.( मुळगाव महागाव जिल्हा वाशिम) यास अटक केली.

# नांदुरी बस स्थानक वादाच्या भोवऱ्यात

**सप्तशृंगगड : प्रतिनिधी**
**नांदुरी येथील आदिवासी शेतकरी कृष्णा गमजी राऊत यांच्या अशिक्षित पणाचा फायदा घेऊन एस. टी. महामंडळाने लाखो रुपयांची जागा हडप केल्याचा दावा उत्तम कृष्ण राऊत यांनी केला आहे.**



नांदुरी बसस्थानक संदर्भात नाशिक न्यायालय येथे खटला चालू असूनसुध्दा एसटी महामंडळ कळवण व सार्वजनिक बांधकाम विभाग हे कुणाच्या आशीर्वादाने काम करत आहे याची सखोल चौकशी व्हावी. तसेच माझे वडील जिल्हा रुग्णालय येथे हृदयविकाराच्या झटक्याने ॲडमिट असल्याने त्यांच्या जीवितास काय कमीजास्त झाल्यास पूर्णतः एस टी महामंडळ व सार्वजनिक बांधकाम विभाग जबाबदार राहील.
– **गुलाब राऊत**

एस. टी. महामंडळला १९७० साली सप्तशृंगी गडावर यात्रा उत्सव कालावधीसाठी गट नंबर ३५२ व ३५४ शेत जमीन भाडेतत्त्वावर दिली होती परंतु आमचे वडील कृष्णा गमजी राऊत यांचे निधन झाल्याने एसटी महामंडळने कुणाला माहीत न माहित वर्षानुवर्ष आस्थागायक त्या जागेचा उपयोग घेताना दिसून येत आहे.

नांदुरी बसस्थानक संदर्भात २०/१२/२०१६ पासून जिल्हा न्यायालय नाशिक येथे दावा दाखल असूनसुद्धा एसटी महामंडळने दडपशाही पद्धतीने तर सार्वजनिक बांधकाम विभागाने हुकूमशाही पद्धतीने बस स्थानकाचे काम सुरू ठेवले आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री जिल्हाधिकारी व स्थानिक प्रशासन तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाला वारंवार पत्रव्यवहार करून त्याच्या लक्षात आणून दिले आहे की ह्या नांदुरी बस स्थानकाची जागा न्यायप्रविष्ट बाब असल्यामुळे आपण ह्या ठिकाणी कोणतेही अनाधिकृत काम करु नये हे काम त्वरित थांबवावे अशी राऊत कुटुंबीयांनी विनंती केली आहे. तरीसुध्दा एस. टी. महामंडळने व सार्वजनिक बांधकाम विभागाने यात कोणतीही प्रकारची दखल घेतली नाही.

उत्तम कृष्ण राऊत हे नांदुरी बस स्थानकाच्या जागेवर जाऊन अनाधिकृत काम थांबवण्यासाठी वारंवार सा. बां. विभाग पदाधिकाऱ्यांना व ठेकेदाराला आक्रोशाने सांगत असताना त्यांना त्या ठिकाणी चक्कर आली व ते जागीच खाली पडले त्यांना त्वरित नांदुरी ग्रामीण रुग्णालय येथे दाखल केले परंतु त्यांची परिस्थिती पाहता त्यांना ग्रामीण रुग्णालय येथे रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने त्यांना खाजगी वाहनाने त्वरित जिल्हा रुग्णालय नाशिक येथे हलवण्यात आले व जिल्हा रुग्णालय संदर्भ हॉस्पिटल या ठिकाणी त्यांच्यावर विविध चाचण्या केल्या असता त्यांना तणावामुळे उत्तम हृदयविकाराचा झटका आल्याचे सांगण्यात आले. आज संदर्भ हॉस्पिटल नासिक येथे हृदयविकाराची शस्त्रक्रिया होण्याची शक्यता आहे. तसेच आमचा न्याय देवतेवर पूर्णपणे विश्वास आहे. न्यायदेवता जो निकाल दिईल तो आम्हास मान्य राहील तत्पूर्वी त्या ठिकाणी कुणीही अनधिकृत बांधकाम करू नये ही आमची राऊत कुटुंबीयांची सर्व विभागाला कळकळीची विनंती केली आहे.



# विहिरीत पडलेल्या बिबट्यास बाहेर काढण्यात वनविभागास यश

**उमराळे बु. : वार्ताहर**
**उमराळे बु. ता. दिंडोरी येथे बिबट्याच्या दर्शनाच्या अनेक घटना वाढत असून, रविवारी रात्रीच्या वेळेस उमराळे परिसरात एक बिबट्या शिकारीच्या शोधार्थ अचानकपणे नवनथ धात्रक याच्या घराजवळ असलेल्या निकम यांच्या विहिरीत पडल्याने, विहिरीतून गुरगुरण्याचा आवाज आल्याने, विहिरीत पाहिले असता बिबट्या पडल्याचे समजले त्यामुळे वन विभागास याबाबत माहिती देता वनविभाग कर्मचारी यांनी बिबट्यास बाहेर काढण्यात यश मिळवले.**

याबाबत माहिति अशी की, सध्या बिबट्याच्या वावर मोठ्या प्रमाणात वाढला असून शेतकऱ्याचे मोठे नुकसान करीत आहे. मात्र यास कोणीच वाली नसल्याचे शेतकऱ्याचे म्हणणे असून उमराळे येथील अशाच प्रकारे नवनाथ धात्रक हे यांच्या घराजवळ असलेल्या निकम यांच्या शेतातातील एका विहिरीत बिबट्या आपले सावज शोधण्याच्या नादात विहिरीत पडला. विहिरीच्या रस्त्याने अरुण धात्रक हे जात असताना विहिरीमध्ये गुरगुरण्याचा आवाज अचानकपणे आला असता त्यांनी विहिरीत डोकावून पाहिले असता बिबट्या पडल्याचे निदर्शनाला आले. याची माहिती वनविभागास कळविण्यात आली. त्यांनी एका पिंजऱ्याच्या माध्यमातून बिबट्यास विहिरीतून बाहेर काढण्यात यश मिळविले असून, शेतकऱ्यांनी रात्रीस वेळेस आपल्या शेतातील पिकास पाणी देण्यास बाहेर जाऊ नये असा सल्ला विनविभागाने दिला आहे.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

■ वर्ष ८६ ■ अंक : ६१ ■ नाशिक, मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर २०२४ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक



# उमेदवारांचे शक्तिप्रदर्शन

## प्रमुख उमेदवारांचे अर्ज दाखल ; आज अखेरचा दिवस

**मुंबई :**
**उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आज अखेरचा दिवस आहे. अजूनही महायुती आणि महाविकास आघाडीमधील काही उमेदवारांच्या नावावर अजूनही खल सुरूच आहे. काल राज्यात वसुबारसचा मुहूर्त साधत अनेक उमेदवारांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाचपाखाडीतून तर अजित पवार यांनी बारामती व त्यांच्या विरोधात युगेंद्र पवार यांनी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करताना उमेदवारांनी काढलेल्या रॅलींमुळे परिसर दणाणून गेला होता.**

बारामतीत अजित पवार यांनी मतदार संघातील सामान्य महिलांसमवेत उमेदवारी अर्ज दाखल केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातून मोठे शक्तिप्रदर्शन करीत रॅली काढली. नाशिकमध्ये विद्यमान आमदार देवयानी फरांदे, सीमा हिरे, दादा भुसे, राहुल ढिकले, राहुल आहेर, नितीन पवार यांनी अर्ज दाखल केला. तर नांदगाव मतदार संघातून /-..४

### आ. रोहित पवार यांचे शक्तीप्रदर्शन

कर्जत : रोहित पवार यांनी आज जोरदार शक्ती प्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज श्रीमंत भूषण सिंह राजे होळकर,खासदार अमोल कोल्हे हे उपस्थित होते. कर्जत तालुक्यातील सर्व तीर्थक्षेत्रांची भेट देऊन दर्शन घेत यानंतर आमदार रोहित पवार यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवार अर्ज भरल्यानंतर कर्जत येथील गोदड महाराज मंदिरामध्ये कर्जत व जामखेड तालुक्यातील वारकरी संप्रदायामधील अनेक मंडळी उपस्थित होते. या सर्वांचे आशीर्वाद रोहित पवार यांनी घेतले.

### मालेगावात अद्वय हिरेंवर हल्ल्याचा प्रयत्न

**नाशिक : प्रतिनिधी** मालेगाव बाह्य मतदार संघातील लढाई आता मुद्यावरुन गुद्दयावर आली आहे. काल मंत्री दादा भुसे यांनी अर्ज भरताना मोठे शक्ति प्रदर्शन केले. यादरम्यान, ठाकरे गटाचे उमेदवार अद्वय हिरे हे प्रचारासाठी एका ठिकाणी गेले असता त्यांच्यावर दादा भुसे यांच्या गटाच्या काही माणसांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे अद्वय हिरे यांनी पोलिसांना फोन केल्यानंतर पोलिस घटनास्थळी आले. यासंदर्भात अद्वय हिरे यांनी मालेगाव पोलिसांत तक्रार दिली आहे. यावेळी बोलताना अद्वय हिरे यांनी माझ्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. परंतु आपण दादागिरीला घाबरत नाही. गुंडगिरी मोडून काढण्यासाठीच आपण उमेदवारी करीत आहेत. तालुक्यातील जनतेला गुंडगिरीतून मुक्त करण्यासाठी आपण ही उमेदवारी करीत आहोत. तालुक्याला या गुंडगिरीतून मुक्त करू, असे अद्वय हिरे म्हणाले.





# शिवसेना शिंदे गटाची तिसरी यादी जाहीर

## भाजपाच्या शायना एनसी, दानवेंच्या कन्येला उमेदवारी

**मुंबई :**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून उमेदवारांची तिसरी यादी जाहीर करण्यात आलेली आहे. तिसऱ्या यादीत सेनेचे १३ उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. दोन जागी मित्रपक्षांच्या उमेदवारांना पाठिंबा जाहीर करण्यात आलेला आहे. विशेष बाब म्हणजे रावसाहेब दानवे यांच्या कन्या संजना जाधव, भाजपच्या शायना एनसी यांचे नाव सेनेच्या तिसऱ्या यादीत आले आहे. बार्शीचे अपक्ष आमदार राजेंद्र राऊत यांना देखील उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.



शायना एनसी



संजना जाधव

**शिवसेनेचे उमेदवार**

सिंदखेड राजा - शशिकांत खेडेकर, घनसावंगी- हिकमत उढाण, कन्नड- संजना जाधव, कल्याण ग्रामीण- राजेश मोरे, भांडूप पश्चिम- अशोक पाटील, मुंबादेवी- शायना एनसी, संगमनेर- अमोल खताळ, श्रीरामपूर - मल्हारी कांबळे, नेवासा- विठ्ठल लंघे पाटील, धाराशिव- अजित पिंगळे , करमाळा- दिग्विजय बागल, बार्शी- राजेंद्र राऊत, गुहागर- राजेश बेंडल.

**पाठिंबा- जनसुराज्य**

हातकणंगले- अशोकराव माने, शिरोळ- राजेंद्र यड्रावकर /-..४

### भाजपाचे २५ उमेदवार जाहीर

**मुंबई :** आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने तिसरी यादी जाहीर केली आहे.काल तिसरी यादी २५ उमेदवारांची जाहीर केली आहे. त्यामुळे आता महायुतीमध्ये भारतीय जनता पक्षाकडून १४६ उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. विशेष म्हणजे मोर्शी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून देवेंद्र भुयार यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आता भाजपानेही या मतदारसंघातून उमेश यावलकर यांना उमेदवारी दिली आहे.

**तीनआमदारांना तिकीट नाकारले!**

भाजपांन आज जाहीर /-..४

### दोन हजारांची लाच घेताना पिंपळसचा तलाठी जाळ्यात

**नाशिक : प्रतिनिधी**

सातबारा उताऱ्यावर पत्नीचे नाव लावून देण्याच्या मोबदल्यात निफाड तालुक्यातील पिंपळस रामाचे येथील तलाठी आसिफ अनिस पठाण हे दोन हजार रुपयाची लाच घेतांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकले. या प्रकरणी निफाड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या कारवाईबाबत एसीबीने दिलेली माहिती अशी की, तक्रारदार यांनी जळगाव तालुका निफाड येथे व्यापारी गाळा विकत घेतला असून त्याचा फेरफार करून सदर फेरफारची नोंद मंडळ अधिकारी यांच्याकडून प्रमाणित करून घेऊन सातबारा उताऱ्यावर तक्रारदार त्यांचे व त्यांच्या पत्नीचे नाव लावून देण्याच्या मोबदल्यात यातील पठाण यांनी ३ हजार रुपये लाचेची पंचा समक्ष मागणी करून तडजोडी अंती २ हजार रुपये आज २८ ऑक्टोंबर रोजी स्वतः स्वीकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले. त्यांच्याविरुद्ध निफाड पोलीस स्टेशन नाशिक येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

### देशमुखांऐवजी मुलगा रिंगणात

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने चौथी उमेदवार यादी जाहीर केली आहे. या यादीत एकूण सात उमेदवारांचा समावेश आहे. काटोल मतदारसंघातून सलील देशमुख यांना उमेदवारी देण्यात आली आहे. सलील देशमुख हे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे सुपूत्र आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या संसदीय मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी सात उमदेवारांच्या नावाची घोषणा करण्यात आली. चौथ्या यादीत माण,काटोल, खानापूर,वाई, दौंड, पुसद, शिंदखेडा, या मतदारसंघांचा समावेश आहे



**Format C-7**

**Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates**

**(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court incontempt petition C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)**

Name of Political Party: **Nationalist Congress Party (NCP)**
Name of the Election: **Maharashtra Legislative Assembly 2024**
Name of state/UT: **Maharashtra**

(1) Name of the Constituency- **119-Yeola Assembly Constituency**
Name of the candidate- ***Chhagan Chandrakant Bhujbal***

| Sl.No. | | | |
|---|---|---|---|
| 1 | **Criminal antecedents** | | |
| | a | Nature of the offences | U/s 13(1)(e), 13(2) of PC Act, 1988 & U/s 109 IPC<br>The Complainant alleges that the persons named in the FIR have obtained properties disproportionate to their known sources of income. |
| | b | Case No. | FIR No. 35/2016 |
| | C | Name of the court | No |
| | d | Whether charges have been framed or not (Yes/No) | Awaiting Summons |
| | e | Date of conviction, if any | No |
| | f | Details of punishment undergone, if any | No |
| | g | Any other information required to be given | No |
| 2 | **Criminal antecedents** | | |
| | a | Nature of the offences | U/s 3 r/w 4 of PMLA Act, 2002<br>It is alleged by the prosecution that the persons named as accused have laundered tainted money and projected the same as untainted. |
| | b | Case No. | a) Case No. 2/2016, b) 3/2018 |
| | C | Name of the court | Special MP/MLA & PMLA Court, Mumbai |
| | d | Whether charges have been framed or not (Yes/No) | No |
| | e | Date of conviction, if any | No |
| | f | Details of punishment undergone, if any | No |
| | g | Any other information required to be given | No |
| 3 | **Criminal antecedents** | | |
| | a | Nature of the offences | U/s. 13(1)(c), 13(1)(d) with 13(2) of PC Act, 1988<br>It is alleged by the prosecution that in the Government tender accused persons got wrongful gain to themselves and wrongful loss to the government |
| | b | Case No. | A.C.B. Spl. Case No. 18 of 2016 |
| | C | Name of the court | Special MP/MLA & PMLA Court, Mumbai |
| | d | Whether charges have been framed or not (Yes/No) | No |
| | e | Date of conviction, if any | No |
| | f | Details of punishment undergone, if any | No |
| | g | Any other information required to be given | No |
| 4 | **Criminal antecedents** | | |
| | a | Nature of the offences | U/s 395, 397, 398, 401, 341, 141, 144, 147, 148, 149, 427, 182, 166, 167, 409, 165(A), 177, 304(A), 402, 467, 471, 199, 200, 34, 120B of IPC<br>On an order U/s 156(3) Cr PC, the Ld. Magistrate has directed the jurisdictional police station to conduct investigation against the Accused persons for the offences as mentioned above in the relevant column. |
| | b | Case No. | Cr. Case No. 185/2012 |
| | C | Name of the court | JMFC Ghodnadi, Shirur, Pune |
| | d | Whether charges have been framed or not (Yes/No) | No |
| | e | Date of conviction, if any | No |
| | f | Details of punishment undergone, if any | No |
| | g | Any other information required to be given | No |
| | The reason for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the pools (not more than 100 words) | | He is an OBC leader. He fought for social equality and rights of the downtrodden and farmers. He worked tirelessly to eradicate caste system and for the development of his constituency. |
| | reason as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidate (not more than 100 words) | | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

(2) Name of the Constituency- **119-Yeola Assembly Constituency**
Name of the candidate- **Chhagan Chandrakant Bhujbal**

Sd/-
**Shivajirao Garje**
**General Secretary Maharashtra Regional,**
**Nationalist Congress Party (NCP)**

# मविआच्या उमेदवारासाठी कामाला लागा

## सिडकोतील बैठकीत आवाहन

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**महाविकास आघाडीचे उमेदवार सुधाकर बडगुजर यांना मोठ्या मताधिक्यांनी नाशिक पश्चिममध्ये निवडून आणायचे आहे. त्यानंतर खऱ्या अर्थाने या विधानसभा मतदारसंघात विकासाचा कायापालट करायचा आहे. त्यामुळे सर्वांनी एकजूट होऊन कामाला लागा व जास्तीत जास्त मतदारांना मतदान करण्यासाठी आवाहन करा. अशा प्रकारचे आवाहन महाविकास आघाडीच्या बैठकीमध्ये उपस्थित मान्यवरांनी केले.**



महाविकास आघाडीचे उमेदवार सुधाकर बडगुजर यांचा आज (मंगळवारी )उमेदवारी अर्ज भरण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या नियोजनासाठी सोमवारी सायंकाळी उपजिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी यांच्या संपर्क कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अण्णा पाटील यांनी सांगितले की, सर्वांनी कामाला लागा. सुधाकर बडगुजर नक्कीच आमदार होणार आहे. तर नाना महाले यांनी सांगितले की, सुधाकर बडगुजर यांनी प्रभागाचा विकास केला आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीचा त्यांचा विजय नक्की आहे. असे विधान नाना महाले यांनी केले.

तसेच उपस्थित आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी आपले मत व्यक्त केले. बैठक प्रसंगी उबाठाचे दत्ता गायकवाड, जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर, महानगरप्रमुख विलास शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष प्रदेश पदाधिकारी नाना महाले, माजी नगरसेवक अण्णा पाटील, लक्ष्मण जायभावे, वंदना पाटील, डी.जी. सूर्यवंशी, भूषण राणे, सचिन राणे, देवानंद बिरारी, सुनील जगताप, विजय पाटील, संजय भामरे, तात्या भामरे, मकरंद सोमवंशी, बाळासाहेब गिते आदींसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

### स्वामी समर्थांच्या प्रकटभुमीच्या विकासासाठी भक्तांनी एकत्र यावे

**पुणे:** लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले दत्त संप्रदायातील थोर सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कर्दळीवनातील प्रकटभूमीच्या विकासासाठी देशातील स्वामिभक्तांनी एकत्र यावे, असे आवाहन श्री स्वामी ओम मल्हारी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. गौरव घोडे यांनी केले. राज्य सरकारने याबाबत पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी म्हटले आहे.श्री स्वामी समर्थांचे देशभरात अनेक ठिकाणी मठ आहेत, मात्र त्यांची प्रकटभूमी दुर्लक्षित आहे. या स्थळाचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून देशातील स्वामिभक्तांनी पाठपुरावा करणे आवश्यक आहे. हे स्थान घनदाट जंगलात असले तरी दर्शनासाठी जाणाऱ्या स्वामिभक्तांना कुठेही त्रास सहन करावा लागत नाही. आंध्र प्रदेश-तेलंगण वनविभागाच्या परवानगीने या स्थानाचा विकास करता येऊ शकतो. दत्त संप्रदायात कर्दळीवनास मोठे महत्त्व आहे. या स्थानाचा विकास झाल्यास स्थानिकांना रोजगारही मिळेल.

# ओझरला घरफोडी ५४ हजाराचा ऐवंज लंपास

**ओझर : वार्ताहर**

**येथील एका घरातील कुटुंबिय घर बंद करुन बाहेर गेल्याची संधी साधत अज्ञात चोरट्याने घराचे दरवाजाचे कुलुप तोडून घरातून रोख रकमेसह सोन्या चांदीचे दागिने असा ५४ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना ओझर येथे घडली**

रविवार दिनांक २६ रोजी सायंकाळी पांच ते २७ तारखेच्या सकाळी नऊ वाजेच्या दरम्यान खंडेराव कचरू क्षिरसागर राहाणार मारी गोल्ड पार्क साईधाम साईबाबा मंदिरा जवळ ओझर हे कुटुंबियासह बाहेर गेले असतानाची संधी साधत कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांचे घराच्या दरवाज्याचे कुलुप तोडून घरात प्रवेश करून कपाटात ठेवलेले ५० हजार रुपये किमतीचा सोन्याचा नेकलेस दोनहजार रुपये किमतीच्या चांदीच्या साखळ्या व



देवाच्या देव्हाऱ्यात ठेवलेले २००० रुपये रोख असा ५४ हजार रुपयांचा ऐवज घरफोडी करून चोरून नेला तसेच चोरट्यांनी घरातील वस्तू अस्ताव्यस्त केल्या असल्याची तक्रार क्षिरसागर यांनी ओझर पोलिस ठाण्यात नोंदविल्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलिस.

निरिक्षक अरुण धनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार बी जी आहेर हे करत आहे करत आहे.

पान नं. १ वरून...

## उमेदवारांचे शक्तिप्रदर्शन

माजी खासदार समीर भुजबळ, सुहास कांदे यांनी अर्ज दाखल केला. आज उमेदवारी अर्ज भरण्याचा अखेरचा दिवस आहे. त्यामुळे ज्या उमेदवारांचे अर्ज अजून भरणे बाकी आहे. ते जोरदार शक्ति प्रदर्शन करत आज अर्ज दाखल करणार आहेत. काँग्रेसने शंभरच्या आसपास उमेदवार दिले आहेत. तर भाजपाने आतापर्यंत १५० जागांवर उमेदवार दिले आहेत. एकनाथ शिंदे यांनी ८० तर अजित पवार गटाने ४९ उमेदवार दिले आहेत. काही जागांचे उमेदवार आज अखेरच्या दिवशी जाहीर होणार आहेत.

**अजित पवार यांची बारामतीकरांना साद**

राज्याचं लक्ष लागेलल्या बारामती मतदारसंघात काका-पुतण्याच्या लढाईत काका जिंकणार की पुतण्या, अशी चर्चा मतदारसंघात होत आहे. त्याच पार्श्वभूमीवर अजित पवारांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर बारामतीकरांना उद्देशून भाषण केलं. यावेळी, अजित पवारांनी त्यांच्यास्टाईलने फटकेबाजी केली, तसेच ते भावूक झाल्याचंही दिसून आलं.

लोकसभेला माझं चुकलं, सुनेत्राला सुप्रियाच्या विरोधात मी उमेदवार नव्हतं द्यायला पाहिजे. इथं बसलेल्या लोकांनी सुप्रियाला मतदान केलं. लोकसभेला ताई आणि विधानसभेला दादाला.. दादा म्हणजे हा दादा नाहीतर लोकांना वाटेल तो दादा. शिरुरला उभा राहा म्हणून सांगितले, बारामतीच्या लोकांनी त्यादिवशी जास्त आग्रह केला म्हणून आज मी उमेदवारी अर्ज भरल्याचं अजित पवार यांनी म्हटलं. प्रत्येकाने आपापल्या गावात जा, दुसऱ्याच्या गावात जाऊ नका. आपापले घर सांभाळा मी तुम्हाला हे का सांगतोय कारण माझंच घर नीट नाही. म्हणून मला भीती वाटते बोलताना, तुम्ही तिकडे गेल्यावर मला त्रास होतोय, अशी भावनिक सादही बारामतीकरांना अजित पवारांनी घातली.

**बारामतीचे मतदार युगेंद्रला निवडून देतील: शरद पवार**

बारामती : शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते युगेंद्र पवार यांनी बारामती या मतदारसंघासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी खासदार शरद पवार उपस्थित होते. बारामतीच्या निवडणुकीत युगेंद्र पवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील. सोबतच त्यांनी बारामतीची जनता युगेंद्र पवार यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील, असा विश्वास शरद पवार यांनी व्यक्त केला. युगेंद्र पवार यांचे शिक्षण परदेशात झाले. ते एक उच्चशिक्षित पदवीधर आहेत. त्यांचे प्रशासन, व्यवसाय, साखरधंदात यात ते जाणकार आहे. अशा तरुणाला पक्षाने आज संधी दिली. बारामतीची जनता आज नव्या पिढीतील नव्या नेतृत्त्वाचा स्वीकार करेल. तसेच त्याच्या पाठीशी आपली शक्ती उभी करेल, याची मला खात्री आहे, अशा भावनाही शरद पवार यांनी व्यक्त केल्या.

**ठाकरेंना धक्का, उमेदवार शिंदेंच्या शिवसेनेत**

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगरमध्ये शिवसेना ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. जाहीर केलेल्या उमेदवाराने निवडणुकीतून माघार घेतली असून शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार आहे.

छत्रपती संभाजीनगर मध्य मतदारसंघात तिरंगी लढत होणार होती. मात्र, आता शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार किशनचंद तनवाणी यांनी निवडणुकीतून माघार घेतल्याची घोषणा केली आहे. छत्रपती संभाजीनगर मध्य मतदारसंघात २०१४ सारखी परिस्थिती म्हणजे एमआयएमचा उमेदवार निवडून येवू नये म्हणून माघार घेत असल्याचे किशनचंद तनवाणी यांनी म्हटले आहे. जाहीर केलेल्या उमेदवाराने अचानक माघार घेतल्याने हा उद्धव ठाकरेंसाठी मोठा धक्का मानला जात आहे. तर किशनचंद तनवाणी हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती समोर येत आहे.

**काँग्रेसने कोल्हापूर उत्तरचा उमेदवार बदलला**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने चौथी यादी जाहीर केली आहे. पक्षाच्या या चौथ्या यादीत ४ उमेदवारांचा समावेश आहे. यात अकोला पश्चिम, कुलाबा, सोलापूर शहर मध्य आणि कोल्हापूर उत्तर या मतदारसंघांचा समावेश आहे. यातील कोल्हापूर उत्तरमधील उमेदवार आधीच जाहीर करण्यात आला होता. मात्र त्याला विरोध झाल्याने उमेदवार बदलण्यात आला. आज जाहीर झालेल्या यादीनंतर काँग्रेसच्या एकूण उमेदवारांची संख्या १०३ झाली आहे. राज्यात महायुतीमधील भाजप आणि महाविकास आघाडीतील काँग्रेस या दोन पक्षांनीच १००हून अधिक उमेदवार जाहीर केले आहेत.काँग्रेसच्या चौथ्या यादीतील उमेदवार

अकोला पश्चिम-साजिद खान, कुलाबा-हिरा देवासी, सोलापूर शहर मध्य- चेतन नरोटे कोल्हापूर उत्तर-मधुरिमाराजे छत्रपती

## शिंदेंच्या शिवसेनेची तिसरी यादी जाहीर

भाजप नेत्या शायना एनसी वरळी विधानसभा मतदारसंघातून इच्छुक होत्या. मात्र, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून वरळीत मिलिंद देवरा यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. यानंतर शायना एनसी यांना शिवसेनेकडून मुंबादेवी मतदारसंघातून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर, रावसाहेब दानवे यांची कन्या संजना जाधव हिनं काल शिवसेनेत प्रवेश केला होता. तिला देखील कन्नड विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.

बार्शीमधील अपक्ष आमदार राजेंद्र राऊत हे भाजपचे समर्थक मानले जातात.मात्र, जागा वाटपामध्ये बार्शीची जागा एकनाथ शिंदे यांच्याकडे गेल्यानतंर राऊत यांनी शिवसेनेत प्रवेश केला. या ठिकाणी शिवसेनेकडून राजेंद्र राऊत यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

**कोल्हापूरमधील दोन जागांवर मित्रपक्षांना पाठिंबा**

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून कोल्हापूरमध्ये हातकणंगलेच्या जागेवर जनसुराज्य पार्टीच्या उमेदवाराला पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे. भाजपनं देखील शाहूवाडी मतदारसंघात जनसुराज्य पार्टीचे विनय कोरे यांना पाठिंबा जाहीर केला आहे. एकनाथ शिंदे यांनी शिरोळ मतदारसंघात राजेंद्र यड्रावकर यांना पाठिंबा जाहीर केला आहे.

**शिवसेनेकडून ७८ जागी उमेदवार तर दोन जागा मित्रपक्षांना**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेककडून पहिल्या यादीत ४५, दुसऱ्या यादीत २० आणि तिसऱ्या यादीत सेनेचे १३ आणि मित्रपक्षांचे २ असे उमेदवार जाहीर केले आहेत. म्हणजेच शिवसेना ७८ आणि मित्रपक्ष २ जागा लढवणार आहेत. महायुतीकडून भाजपनं १४६ आणि मित्रपक्ष ४ अशा १५० एकनाथ शिंदे यांची शिवसेना ७८ आणि मित्रपक्षांचे २ अशा ८० जागा जाहीर केल्या आहेत. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून ४९ जागा जाहीर करण्यात आल्या आहेत.

## भाजपाचे २५ उमेदवार जाहीर

केलेल्या उमेदवार यादीमध्ये तीन विद्यमान आमदारांची तिकिटं कापल्याचं दिसून येत आहे. त्यात आर्णीतून संदीप दुर्वे यांच्याऐवजी राजू तोडसाम यांना उमेदवारी देण्यात आली आहे. नागपूर मध्यमधून विकास कुंभारे यांच्याऐवजी प्रवीण दटके यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. आर्वीतून दादाराव केचे यांच्याऐवजी सुमीर वानखेडे यांना तिकीट देण्यात आलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून मोर्शी विधानसभा मतदारसंघातून देवेंद्र भुयार यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतरदेखील भारतीय जनता पक्षानं आपल्या उमेदवार यादीमध्ये मोर्शीतून उमेश यावलकर यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

**प्रकाश मेहता, गोपाळ शेट्टींना उमेदवारी नाकारली**

घाटकोपर पूर्वमधून प्रकाश मेहता उमेदवारीसाठी इच्छुक होते असं सांगितलं जात आहे. मात्र, त्यांना तिकीट नाकारून भाजपानं पुन्हा पराग शाह यांनाच उमेदवारी दिली आहे. तसेच, बोरीवलीमधून गोपाळ शेट्टी उमेदवारीसाठी इच्छुक असताना संजय उपाध्याय यांचं नाव जाहीर करण्यात आलं आहे. काँग्रेसमधून भाजपात आलेल्या अर्चना पाटील चाकूरकर यांना लातूरमधून उमेदवारी देण्यात आली आहे.

एस एम बी टी मान्सून लीग वरिष्ठ गट स्पर्धा

## नाशिक जिमखानाचे ३ तर मेरी, एकता, सिन्नर व द्वारका संघांचे २ विजय

**नाशिक : जिल्हा क्रिकेट असोसिएशन आयोजित, एस एम बी टी मान्सून लीग २०२४-२५ स्पर्धेतील, वरिष्ठ खुल्या गटातील मर्यादित ५० षटकांचे सामने रंगत आहेत. हर्षल तांबेंच्या , एस एम बी टी प्रायोजित मान्सून लीग स्पर्धेचे हे सलग सहावे वर्ष. यात चार गटात एकूण १६ संघ सहभागी झाले आहेत. आतापर्यंत झालेल्या सामन्यांत ब गटात नाशिक जिमखाना आपले तिन्ही सामने जिंकून आघाडीवर आहे.**

त्यापाठोपाठ द्वारका संघांने दोन विजय नोंदले आहेत. ब गटात , मेरीने तर क गटात एकता व सिन्नर यांनी देखील तीन पैकी दोन सामन्यात विजय मिळवले आहेत. आतापर्यंत झालेल्या एकूण २२ सामन्यांत फलंदाजीत सिन्नर संघाचा सिद्धार्थ नक्का तीन सामन्यात दोन फटकेबाज शतकांसह एकूण ३०० धावा करून आघाडीवर आहे. त्याने एकता विरुद्ध १७२ तर एन डी सी ए आफ्टरनून विरुद्ध १२३ धावा केल्या. या व्यतिरिक्त शतकवीर आहेत - एकतातर्फे अथर्व चौधरी २१५ , कृष्णा क्रिकेट अकादमीतर्फे विशाल थोरात १२७ व अर्जुन उचित १११, नाशिक जिमखानातर्फे यासर शेख १११ आणि एन डी सी ए आफ्टरनूनतर्फे आयुष ठक्कर १११.

गोलंदाजीत देखील सिद्धार्थ नक्काने ७ बळी घेत आपली छाप पाडली आहे. त्यासह सिद्धी विनायकच्या दीर्घ ब्म्हेचा व रोहित पाटील , तसेच सिन्नरच्या शंतनू एखंडे यांनीही तीन सामन्यात प्रत्येकी ७ बळी घेतले आहेत.

# मखमलाबाद विद्यालयाला ११ लाखांचे पारितोषिक

**पंचवटी : वार्ताहर**

**मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मखमलाबाद या शाळेने महाराष्ट्र शासनाच्या ''मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा'' टप्पा क्रमांक २ अभियान सन २०२४-२५ या स्पर्धेत नाशिक जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवून ११ लाखांचे पारितोषिक मिळविले. मविप्र संचालक रमेश आबा पिंगळे व प्राचार्य संजय डेर्ले यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेत सहभाग घेऊन हे पारितोषिक प्राप्त झाले.**

या स्पर्धेसाठी शालेय शैक्षणिक प्रगती,शालेय सर्व प्रकारच्या भौतिक सुविधा, विद्यार्थ्यांसाठी केलेले शैक्षणिक, कला, क्रिडा क्षेत्रातील मार्गदर्शन व विद्यार्थ्यांनी त्यामध्ये जिल्हा, राज्य, राष्ट्रीय स्तरावर मिळविलेली बक्षिसे, वर्षभरातील विविध उपक्रम, वृक्षारोपण, परसबाग यांचा यामध्ये प्रामुख्याने समावेश होता.या उपक्रमासाठी विभागीय आयुक्त प्रविण गेडाम, मनपा आयुक्त डॉ.अशोक करंजकर, अतिरिक्त आयुक्त प्रदिप चौधरी , जि.प.शिक्षणाधिकारी प्रविण पाटील, मनपा शिक्षणाधिकारी बापूसाहेब पाटील, केंद्रप्रमुख दिपक पगार या सर्वांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या स्पर्धेसाठी प्राध्यापक, सर्व शिक्षकवृंद,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अतिशय चांगल्या प्रकारे मेहनत घेतली.या यशाबद्दल मविप्र सरचिटणीस ॲड.नितीन ठाकरे, अध्यक्ष डॉ.सुनिल ढिकले, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, सभापती बाळासाहेब क्षिरसागर, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी, संचालक रमेश आबा पिंगळे, संचालक ॲड.लक्ष्मण लांडगे, सर्व मविप्र संचालक मंडळ, माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ.भास्करराव ढोके, सर्व मविप्र शिक्षणाधिकारी, माजी सेवक संचालक डॉ. अशोकराव पिंगळे, अभिनव बालविकास मंदिर शालेय समिती अध्यक्ष निवृत्ती महाले, उच्च माध्यमिक समिती अध्यक्ष पंढरीनाथ पिंगळे,कला व वाणिज्य महाविद्यालय समिती अध्यक्ष सुरेश पिंगळे, होरायझन स्कुल कमिटी अध्यक्ष शंकरराव पिंगळे, दिनकरराव पिंगळे, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष पहिलवान वाळु काकड, उपप्राचार्य राजेंद्र गाडे, ज्युनियर कॉलेज प्रमुख प्रा.उज्वला देशमुख, मविप्र सभासद, सर्व स्कुल कमिटी सदस्य, माता पालक संघ,सर्व मखमलाबाद ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.

# दिवाळीनिमित्त लासलगाव बाजार समितीस ४ दिवस सुट्टी

**लासलगाव वार्ताहर:**

**आशिया खंडातील कांद्याची सर्वात मोठी बाजारपेठ असलेली लासलगाव बाजार समिती दिवाळी सणानिमित्त चार दिवस बंद राहणार असल्याचे लासलगाव बाजार समिती प्रशासनाने सांगितले आहे**

आज मंगळवार दि.२९ रोजी भुसार व तेलीबिया या शेतीमालाचे लिलाव सकाळच्या सत्रात होतील तसेच बुधवार दि.३०/१०/२०२४ ते शनिवार दि. ०२/११/२०२४ पर्यंत दिपावली सणानिमित्त मजूर वर्ग कामावर येणार नसल्याने लासलगाव मुख्य बाजार आवारावरील भुसार व तेलबिया खरेदीदार लिलावाचे कामकाजात सहभागी होणार नाही तरी शेतकरी बांधवांनी वरील दिवशी आपला भुसार व तेलबिया हा शेतीमाल विक्रीस आणु नये.

तसेच सोमवार दि. ०४/११/२०२४ पासून कांदा, भुसार व तेलबिया या शेतीमालाचे लिलाव नियमितपणे सुरू राहतील याची सर्व शेतकरी व संबंधित मार्केट घटकांनी नोंद घ्यावी असे आवाहन बाजार समितीचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती गणेश डोमाडे, सचिव नरेंद्र वाढवणे यांनी केले आहे.

**जाहीर नोटीस** निशाणी नंबर ०६ प्रोसेस जमा ॲड. श्री. मधुकर चैत्राम सावंत सटाणा कोर्ट, सटाणा, ता. सटाणा, जि. नासिक

**जा.क्र.३३२९/२०२४ वारस दाखला अर्ज नंबर १४०/२०२४**

**सटाणा येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात...**

**सोनाबाई संजय भोईटे, उर्फ सौ. सोनाली विनोद मोरे** वय ३० वर्ष धंदा-शेती, रा. देवपुरपाडा, ता. देवळा, जि नाशिक. ह.मु. करमाड बुद्रुक, ता. पारोळा, जि. जळगांव मो. नं. ७७०९६५०६३८, ७५८८७०८९९६ **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** **सामनेवाला**

कारणे सदरचे जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा अर्जदाराचे वडील **संजय नारायण भोईटे** हे **दि.२५/६/१९९८** रोजी लखमापूर, ता. सटाणा, जि. नाशिक येथे मयत झाले आहेत. तसेच अर्जदाराचे आईचे नाव **संगिता संजय भोईटे** असे असून ती देखील पाच सहा वर्षापूर्वी मयत झालेली आहे. त्यामुळे आता मयताचे पश्चात अर्जदार ही एकटीच मयताची कायदेशीर वारस आहे. अन्य कोणीही वारस नाहीत. तसेच अर्जदार हीस अन्य कोणीही भाऊ अगर बहिण नाही. त्यामुळे अर्जदारांना ते मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे लिगल हेअरशीप सर्टीफिकेट (वारस दाखला) मिळणेकामी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी वरील अर्जदारांचे मागणीप्रमाणे अर्जदार हे मयत **कै. संजय नारायण भोईटे** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्दीनंतर **३०** दिवसांचे आत अगर **दि. ११/१२/२०२४** रोजी आपण स्वतः अगर वकीलांमार्फत मे. कोर्टात हजर राहून आपले लेखी म्हणणे दाखल करावे. या मुदतीत कोणाचे काहीएक म्हणणे न आल्यास मे. न्यायालय अर्जदाराचा योग्य तो पुरावा घेवुन पुढील आदेश करतील व मग त्यानंतर कोणाचे काहीएक ऐकून घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी. आज **दि.२५/१०/२०२४** रोजी माझी सही व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

**कामगिरी लिपिक दिवाणी व फौजदारी न्यायालय, प्रथम वर्ग, सटाणा** (शिक्का) **सहाय्यक अधीक्षक दिवाणी व फौजदारी न्यायालय प्रथम वर्ग, सटाणा**

# १८ झोपु योजनांचा मार्ग मोकळा होणार?

**मुंबई : मूळ झोपडपट्टी पुनर्वसन योजना कुठल्याही नियमावलीशी संलग्न करता येऊ शकते, असे स्पष्ट करणारा निर्णय नगरविकास विभागाने जारी केल्यामुळे आता आक्षेप घेतलेल्या १८ झोपु योजनांबाबत महापालिका काय निर्णय घेते, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.** या निर्णयात प्रकल्पबाधितांसाठी असलेल्या ३३(११) या नियमावलीसोबत अन्य कुठलीही नियमावली संलग्न करता येत नाही, असे स्पष्ट करण्यात आल्यामुळे यापुढे या प्रकल्पांसाठी विकासक पुढे येण्याची शक्यता नसल्याचा दावा झोपु प्राधिकरणातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना केला आहे. झोपडपट्टी पुनर्विकास योजना विकास नियंत्रण नियमावली ३३(१०) नुसार राबवली जाते. प्रकल्पबाधितांसाठी घरे बांधून देणाऱ्यांना ३३(११) नियमावलीनुसार चार पर्यंत चटईक्षेत्रफळाचा लाभ घेता येतो.

**जाहीर नोटीस** दिवाणी किरकोळ अर्ज नं. ६५३/२०२४, नि.१०

**नाशिक येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो., वरीष्ठ स्तर, नाशिक (मा. एन. ए. पटेल साहेब) यांचे कोर्टात**

**१. श्री. विजय संतोष निकम** उ.व. ५८ वर्षे, धंदा. शेती, **२. श्री. जयंत संतोष निकम** उ.व. ५४ वर्षे, धंदा. शेती, दोघे रा. देवळा, ता. देवळा, जि. नाशिक. **३. श्री. मंगल संतोष निकम** उ.व. ५० वर्षे, धंदा. गृहीणी, रा. तृप्ती बेकरी शिवाजी नगर, देवळा, ता. देवळा, जि. नाशिक **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** **सामनेवाले**

ज्याअर्थी वर नमूद अर्जदार यांनी त्यांचे वडिल नामे **कै. संतोष काळु निकम** यांच्या बँक ऑफ बडोदा, शाखा देवळा, ता. देवळा, जि. नाशिक या बँकेतील बचत खाते नं. ८९१२०१०००००५९५८ मध्ये जमा असलेली रक्कम रुपये १,५०,०००/- व त्यावरील व्याज तसेच निवृत्ती वेतन खाते नं. ८९१२०१००००६५१७ मधील जमा असलेली रक्कम रुपये ६,२५,०००/- व त्यावरील व्याज हया रकमा मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज भारतीय वारसा कायदा १९२५ चे कलम ३७२ अन्वये वारस दाखला ( सकसेशन सर्टिफिकेट) मिळणेकामी दाखल केलेला आहे. ज्याअर्थी या अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र (सकसेशन सर्टिफिकेट) देण्यास कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी मे. कोर्टात स्वतः अगर त्यांचे वकिलांमार्फत दि.०६/१२/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणणे मांडावे अन्यथा कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र (सकसेन सर्टिफिकेट) देण्यात येईल. आज दिनांक १५/१०/२०२४ रोजी आमचे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली आहे.

**सही/-लिपिक दि.न्या.व.स्तर/नाशिक** (शिक्का) **सही/- अधिक्षक दि.न्या.व.स्तर/नाशिक**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस विशेषतः **श्री. ज्ञानेश्वर भास्कर नेरकर (पाटील)** रा. लोणखर्डे, ता. साक्री, जि.धुळे यांस **सौ. रुपाली ज्ञानेश्वर नेरकर (पाटील)**, द्वारा **श्री. बापू भिला भामरे**, रा.सामपुरा, मालेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक यांचेकडून सदरचे जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की- तुझा व माझा विवाह हिंदूधर्मशास्त्र व जातीरिवाजानुसार **मौजे रामपुरा मालेगाव**, ता.मालेगाव, जि.नाशिक येथे **दिनांक १७/०५/२००५** रोजी झालेला असून विवाह संबंधातून दोन अपत्य मुलगी **जागृती** वय १८ व **धनंजय** वय ८ वर्ष अशी झालेली आहेत. सुरुवातीला चार अपत्य तू मला दोन अपत्य होईपावेतो बऱ्यापैकी वागविले. त्यानंतर तुम्हांला दारुचे व्यसन दारुच्या नशेत वेळोवेळी जिवे मारहाण करुन फारकतीची सतत मागणी करुन त्रास देत असत. त्या दरम्यान तुम्हांस कुष्ठरोगाचे लक्षण डॉक्टरांनी सांगितल्यामुळे तुम्ही जास्त दारुचे व्यसन करु लागलात व त्याकाळात तुम्ही रागाचे भरात मला दोघे अपत्यांसह सुमारे **१५** वर्षापूर्वी मारहाण शिवीगाळ करुन फारकतीची मागणी करुन हाकलून दिले आहे. त्यानंतर तुम्ही मला नांदण्यास घेण्यास कधीही आला नाहीत व मुलांची देखील कधीही विचारपूस केली नाही व देखभाल केली नाही. मी व माझे नातेवाईक तुमच्याकडे मला नांदण्याकामी बऱ्याचवेळा प्रयत्न केला. परंतु प्रत्येक वेळी तुम्ही फारकतीची मागणी सतत ठेवली. त्याअर्थी तुम्ही माझा व माझ्या मुलांचा त्याग केलेला दिसून येत आहे. सबब तुम्हांस सदरचे जाहीर फारकत नोटीसीने कळविण्यात येते की- सदरची जाहीर फारकत नोटीस प्रसिध्द झालेपासून **७** दिवसांचे तुम्ही मला वरील प्रकार पुन्हा करणार नाही असा लेखी दस्त पंचासमक्ष लिहून देऊन नांदण्यास घेऊन जावे. वरील मुदतीत तुम्ही वागला नाहीत तर हिच जातीरिवाजानुसार जाहीर फारकत समजण्यात यावी व त्यानंतर जो तो दुसरा घरोबा करण्यास मोकळा राहील. कळावे ही जाहीर फारकत नोटीस.

**सटाणा, दिनांक २९/१०/२०२४**

**सौ. सौ. रुपाली ज्ञानेश्वर नेरकर (पाटील), रा.सामपुरा, मालेगाव, ता. मालेगाव, जि. नासिक**

**नोटीस आमचेमार्फत प्रतिसध्दीस रवाना**

**ॲड. चंद्रकांत नामदेव आहिरे, सटाणा कोर्ट (नाशिक)**

**गांवकरी Classified** जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

**Wanted**

Accountant for Amma Builders Knowing Tally, GST, TDS, etc. Contact-9373905562/ 8975719707

**पाहिजेत**

होलसेल मेडिकल एजन्सीसाठी किमान १० वी पास मुली पाहिजेत. वयोमर्यादा १८ ते ३५ भेटा. महादेव एजन्सीज, गोळे कॉम्प्लेक्स, गोळे कॉलनी, नाशिक.

---

नाशिक शहराजवळ असलेल्या फार्म हाऊसवर बंगला साफसफाई व स्वयंपाकासाठी विवाहित निर्व्यसनी जोडपे पाहिजे. राहण्याची सोय. **संपर्क- सकाळी १० ते ५. मो. नं.९०४९०-३४९९९**

---

न्यू अनारकली फॅशन &NX दुकानासाठी अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर व सेल्समन, हेल्पर पाहिजे. ठिकाण: एम.जी.रोड, भारत बुकसमोर, फावडे लेन,

---

**संपर्क- ९८८१३८३०१९**

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर ९८३४१०९३३७ ९७६३७३२४२४**

**पाहिजेत**

कॉलेजरोड नाशिक येथील नामांकित ब्युटी पार्लर व शासन मान्यताप्राप्त ब्युटी कल्चर कोर्सेस, ॲकेडमीसाठी अनुभवी ब्युटीशियन, उत्तम संवाद कौशल्य असलेल्या अनुभवी रिसेप्शनीस्ट, टेली कॉलर्स मुली, महिला पाहिजेत.-अपेक्षेसह बायोडेटा पाठवा. संपर्क ९३०९२४००७५, ८३७८८७८६२

---

अशोक स्तंभावरील बॉईज होस्टेलसाठी कामासाठी जोडपे पाहिजे. राहण्याची व जेवणाची सोय. कामाचे स्वरूप स्वयंपाक, भांडे घासणे **मो. भूषण बागूल ७३८७३६३४७२ कल्याणी बागूल ९३७०७३२८६६**

---

कारसाठी अनुभवी, निर्व्यसनी - नासिकरोड रहिवासी ड्रायव्हर पाहिजे. अर्जासह भेटा- कागज पॅकेजिंग प्रा. लि. ३ रा मजला, स्टार झोन मॉल, पासपोर्ट ऑफिसच्यावर, नासिकरोड.

**ब्राह्मण वधू पाहिजे**

मुलगी उंच असावी, समजूतदार, मनमिळाऊ, पदवीधर, वय २४ ते २७. **संपर्क मोबाईल नंबर ९५५२२७७०९७, ९५११६८०९९८**

**ज्योतिष**

गायत्री ज्योतिष- जन्म कुंडली, कुंडली मिलान, कुंडलीवरून भविष्य कथन, खासगी त्रासावर उपाय. **संपर्क-** ज्योतिषाचार्य, कमलेश शास्त्री, इंद्रकुंड, नाशिक. ९१५६१७८९६९

**CHANGE OF NAME**

My old name Netrali Daniel Mirpagar has been changed to my new name **Netrali Danial Mirpagar** as per aadhar no.864956449722

---

I Have Changed My Name from Nutan Bhanudas Wadalkar to **Nita Mahendra Kotwal** as per Aadhar No. 476723194732

---

**नावात बदल**

माझे जुने नाव किरण उत्तमराव खैरनार असे होते आणि आता माझे नवीन नाव **किरण उत्तम खैरनार** असे झाले आहे. आधार नं. ३३८४ ०३३१ ३८४८

---

माझे जुने नाव उत्तमराव भाऊसाहेब खैरनार असे होते आणि आता माझे नवीन नाव **उत्तम भाऊसाहेब खैरनार** असे झाले आहे.

**आधार नं. ३८५८ ०९०० ८१५१**

**पाहिजेत**

मथुरा हॉटेल प्युअर व्हेज मुक्तीधामच्या पाठीमागे, साठी वेटर-२, तंदूरकुक-१, किचन हेल्पर-१, वेटर हेल्पर-१ पाहिजे. संपर्क-९३७२८८९१११

**विकणे आहे**

संपूर्ण प्लॅन्ट विकणे आहे ३६/७ ऑईल एक्सपेलिअर २ कन्व्हेअर ५० एचपी मोटार ३००० एल रिफायनी स्पेअर पार्ट सेट २, स्टार-डेल्टा स्टार्टर **संपर्क- ग्रीन लिफ इंडस्ट्रीज ९४२२९९०२७८**

**जाहिरात छोटी किमया मोठी!**

महत्त्वाचे



## चांदवडला निवडणूक निरीक्षक श्रीमती ईफात अरा यांचे आगमन

**चांदवड वार्ताहर:** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ प्रकीया सूरु असून भारत निवडणूक आयोगा मार्फत निवडणूक प्रकियेची पाहणी करण्यासाठी निवडणूक निरीक्षक यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने कळवण-सुरगाणा आणि चांदवड-देवळा विधानसभा मतदारसंघाकरिता श्रीमती ईफात अरा निवडणूक निरीक्षक यांचे आगमन चांदवड येथे झालेले आहे.तसेच मा. निवडणूक निरीक्षक यांचा मुक्काम शासकीय विश्रामगृह चांदवड येथे असणार आहे. तरी नागरीकांना निवडणूक प्रक्रियेशी संबधित काही तक्रार असल्यास सकाळी १० ते ११ या वेळेत शासकीय विश्रामगृह येथे भेट घेता येईल. तसेच दूरध्वनी क्र.०२५५६-२५२३३१ व मोबाईल क्र. ८३२९२८५९५८ या क्रमांकावर संपर्क करता येईल. अशी माहिती निवडणूक निर्णय तथा उपविभागीय अधिकारी कैलास कडलग, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार मंदार कुलकर्णी यांनी दिली .

## बँक कर्मचाऱ्याला अडीच लाखांचा गंडा

**नवी मुंबई :** सायबर चोरट्यांनी आयसीआयसीआय बँकेचा कर्मचारी असल्याचे भासवून दुसऱ्या बँकेतील कर्मचाऱ्याला दोन लाख ४२ हजारांचा गंडा घातल्याचे उघडकीस आले आहे. एनआरआय पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात सायबर चोरट्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. या घटनेतील तक्रारदार अरुण रसाळ (५६) हे सीवूड्स सेक्टर-३६ मध्ये राहण्यास असून ते मुंबईत एका बँकेत क्लर्क म्हणून कामाला आहेत. महिनाभरापूर्वी रसाळ यांनी आयसीआयसीआय बँकेचे क्रेडिट कार्ड घेतले होते; मात्र ते कार्ड त्यांनी ॲक्टिव्ह केले नव्हते. याचाच फायदा उचलत एका सायबर चोरट्याने २१ ऑक्टोबर रोजी आयसीआयसी बँकेतील कर्मचारी असल्याचे भासवून त्यांना संपर्क साधला, तसेच त्यांच्या क्रेडीट कार्डवर हेल्थ इन्शुरन्स देण्यात आल्याचे, तसेच त्याचे ४,५०० रुपये प्रीमियम भरावा लागेल, असे सांगितले. यादरम्यान त्याने फोनवर बोलणे सुरू ठेवून रसाळ यांना एक एपीके फाईलची लिंक पाठवून ती डाऊनलोड करून हेल्थ इन्शुरन्स नको असल्याचे त्यात अपडेट करण्यास सांगितले. त्यानुसार रसाळ यांनी त्यात बँकेचा नवीन कार्डचा नंबर टाकला. यादरम्यान चोरट्याने रसाळ यांच्या फोनचा ताबा घेऊन त्याद्वारे त्यांच्या खात्यातील दोन लाख ४२ हजार रुपये दुसऱ्या खात्यात वळते करून घेतले. सायबर चोरट्याशी बोलणे झाल्यानंतर लगेचच रसाळ यांना कोटक महिंद्रा कंपनीतील व्यक्तीने संपर्क साधून त्यांच्या कोटक महिंद्रा कंपनीच्या क्रेडिट कार्डवरून दोन लाख ४२ हजारांचा व्यवहार झाल्याचे सांगितले. त्यानंतर रसाळ यांची फसवणूक झाल्याचे व त्याबाबत पोलिसांमध्ये तक्रार करण्यास समोरील व्यक्तीने सांगितले. त्यानुसार रसाळ यांनी सायबर पोलिस व एनआरआय पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली

## कल्याण रेल्वे स्थानकातील स्कायवॉकवर प्रवाशाला लुटले

**कल्याण :** कल्याण रेल्वे स्थानकातील स्कायवॉकवर रात्रीच्या वेळेत एका २१ वर्षाच्या तरूणाला दोन अनोळखी तरूणांनी लुटले. चोरट्यांनी प्रवासी तरूणाजवळील पिशवी, मोबाईल असा एकूण सात हजाराहून अधिक रकमेचा ऐवज चोरून नेला आहे. गेल्या महिन्यात हा प्रकार घडला होता. रविवारी याप्रकरणी तरूणाच्या तक्रारीवरून महात्मा फुले पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला. मेहरान शाईस्ता मेमन असे तक्रारदार तरूणाचे नाव आहे. तक्रारदार मेहरान मेमन कल्याण रेल्वे स्थानकातील स्कायवॉकवरून फलाटाच्या दिशेने येत होते. ते मोबाईलवर बोलत होते. मेहरान चालत असताना त्याच्या पाठीमागून तो अनोळखी तरूण आले. त्यांनी मेहरान यांना काही कळण्याच्या आत हाताचा ठोसा त्याच्या डोक्यात मारला. अचानक घडलेल्या या प्रकाराने तक्रारदार घाबरला. मारहाण करणारे तरूण मेहरान याच्या जवळील पिशवीची मागणी करू लागले. त्याने पिशवी देण्यास नकार दिला. मेहरान याने चोरट्यांना प्रतिकार करण्यास सुरूवात करताच, एका चोरट्याने स्वताच्या हातामधील स्टीलचा कडा काढून तो जोराने तक्रारदाराच्या डोक्यात मारला. मेहरानच्या डोक्यातून रक्तस्त्राव सुरू झाला. रात्रीची वेळ असल्याने स्कायवॉकवरील प्रवाशांची वर्दळ कमी होती. त्यामुळे मेहरानच्या बचावासाठी कोणीही प्रवासी पुढे आले नाही. दोन्ही तरूणांनी आक्रमकपणे मेहरानला पकडून त्याच्या जवळील पिशवी हिसकावून घेतली. त्याचा मोबाईल, मनगटी घड्याळ काढून घेऊन पळ काढला.

## कोल्हापूर-अहमदाबाद विमानसेवा सुरू

कोल्हापूर: कोल्हापूर-अहमदाबाद गुजरात नियमित विमानसेवा उद्या (ता.२८) पासून स्टार एअर लाईन कंपनीतर्फे सुरू होत आहे. आठवड्यातील चार दिवस विमानसेवा सुरू राहणार आहे. कोल्हापूर आणि गुजरातचे व्यापारी यांचे संबंध असल्याने या मार्गावर विमानसेवा सुरू व्हावी, अशी मागणी प्रवाशांमधून होत होती. सुमारे ५० आसन क्षमतेचे विमान कोल्हापूर-अहमदाबाद-कोल्हापूर या मार्गावर उड्डाण करेल. कोल्हापूर विमानतळ येथून सोमवार, गुरुवार, शुक्रवार, शनिवारी ही सेवा सुरू राहणार आहे. त्या दिवशी कोल्हापूरहून सकाळी अकराला विमान उड्डाण करेल आणि १२ वा. २० मिनिटांनी अहमदाबादला पोहोचेल. अहमदाबादहून दु. १२ वाजून ५० मिनिटांनी विमान उड्डाण करेल आणि दु. दोन वाजून ५० मिनिटांनी कोल्हापूरला येईल.

## भाऊबीजेच्या दिवशी मार्केट यार्डातील भाजीपाला विभाग सुरू

**पुणे :** दिवाळीत दरवर्षी भाऊबीजेच्या दिवशी मार्केट यार्डातील फळे, भाजीपाला विभागाचे कामकाज बंद ठेवण्यात येते. यंदा रविवारी (३ नोव्हेंबर) भाऊबीज आहे. शनिवारी (२ नोव्हेंबर) बाजार आवारास साप्ताहिक सुटी असते. सलग दोन दिवस मार्केट यार्डातील घाऊक बाजाराचे काम बंद राहिल्यास बाजारात भाजीपाल्याचा तुटवडा निर्माण होईल. त्यामुळे यंदा भाऊबीजेच्या दिवशी फळे, भाजीपाला विभाग, तसेच पान बाजाराचे कामकाज नियमित सुरू राहणार आहे. सलग दोन दिवस बाजार आवाराचे कामकाज बंद ठेवल्यास भाजीपाल्याची आवक होणार नाही. सणासुदीत नागरिकांना भाजीपाला उपलब्ध होणार नाही.

## गिरणा मध्यम व लघु प्रकल्पांतर्गत रब्बी हंगामासाठी लाभधारकांनी ३१ डिसेंबरपर्यंत पाणी अर्ज सादर करावेत

**नाशिक :** गिरणा पाटबंधारे विभाग, जळगाव विभागाच्या अधिपत्याखालील गिरणा प्रकल्पावारील जामदा डावा कालवा, जामदा उजवा कालवा, पांझण डावा कालावा, निम्नगिरणा कालव्यावरून व मन्याड, बोरी, अंजणी या मध्यम प्रकल्पांवर तसेच जळगाव खडकेसीम तालुका एरंडोल, हातगाव-१, खडकीसीम, पिंप्री उंबरहोळ, वाघळा १, वाघळा २ देवळी भोरस ब्राम्हणशेवगा, पिंपरखेड, राजदेहरे, कुंझर-२, कृष्णापुरी, वलठाण, ता.चाळीसगाव, पथराड, ता.भडगाव या लघु प्रकल्पावरून कालवा प्रवाही, कालवा उपसा, जलाशय उपसा, लाभक्षेत्रातील अधिसूचित नदी, नाले, ओढे या वरून उपसा सिंचनाने पाण्याचा लाभ घेणाऱ्या सर्व लाभधारकांनी अटी-शर्तीच्या पूर्ततेसह पाणी मागणी अर्ज ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत संबंधित पाटशाखेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा पोस्टाने सादर करावेत, असे आवाहन गिरणा पाटबंधरे विभाग, जळगावचे कार्यकारी अभियंता दे.पु. अग्रवाल यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. बैठकीत ठरविल्याप्रमाणे उर्वरीत पाणी साठ्यानुसार रब्बी हंगाम २०२४-२५ या मुदतीत उभी पिके, विहिरीवरून तसेच अन्य मार्गाने पाणीपुरवठ्याची पर्यायी व्यवस्था असेल अशा लाभधारकांना गहू, हरभरा, ज्वारी, दादर, हा. दुरी, मका, कडवळ, कपाशी, सुर्यफूल, करडई, भाजीपाला इत्यादी पिकांना मर्यादित पाणीपुरवठा करण्याचे ठरविण्यात आले आहे.

# मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात मुख्यमंत्री शिंदे यांचा सिंहाचा वाटा

**मुंबई:-गेली अनेक वर्षे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा अशी मागणी करण्यात येत होती पण ही मागणी पूर्ण होण्यास अखेर २०२४ साल उजडावे लागले.महाराष्ट्राचे लोकप्रिय यशस्वी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या सततच्या पाठपुराव्याचे हे यश असून त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीतील हे यश मानाचा तुरा ठरले आहे. सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्यामुळे केंद्रीय मंत्रिमंडळाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे.**





पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठी भाषेचा गौरव करतांना म्हंटले आहे की , ''मराठी भाषा हा देशाचा अभिमान आहे. या उत्तुंग भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळायलाच हवा होता,देशाच्या इतिहासात मराठी भाषेचा समृद्ध सांस्कृतिक वारशाचं योगदान या सन्मानामुळे अधोरेखित झालं आहे. भारताच्या परंपरेत मराठी कायमच अत्यंत महत्त्वाची आहे. आता अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे अनेक लोकांना मराठी भाषा शिकण्याची प्रेरणा मिळेल .''

मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे म्हणतात की,अभिजात भाषा या भारताच्या पुरातन वारशाचं जतन करण्याचं काम करतात. तसंच प्रत्येक समुदायाच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित होते, यामुळे हा दर्जा मराठी भाषेला मिळावा यासाठी अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरू होते.

माझा मराठाचि बोलु कौतुके। परि अमृतातें ही पैजा जिंके ।। समस्त मराठी जनांचे हार्दिक अभिनंदन!!!'' अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी मराठी भाषेचा अभिमान व्यक्त केला आहे.

ते म्हणतात ''अखेर माय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला! एका लढ्याला यश आले. यासाठी महाराष्ट्र सरकारने केंद्राकडे सतत पाठपुरवठा केला होता. आपल्या लाडक्या भाषेचा यथोचित सन्मान केल्याबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोद यांचे आभार मानताना मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी या कामात अनेक मराठी भाषक, विचारवंत, भाषेचे अभ्यासक, साहित्यिक आणि समीक्षकांबद्दलही कृतज्ञता व्यक्त केलेली आहे.

लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, विवेकसिंधू अशा अनेक ग्रंथाचा आधार घेत मराठी भाषा ही अभिजातच आहे, हे सिद्ध करण्यासाठी अनेक थोरा-मोठ्यांचे, अभ्यासकांचे यासाठी हातभार लागले. मराठी भाषेच्या सर्वांगिण विकासासाठी आता अनुदानासह केंद्र सरकारच्या पातळीवर सुद्धा सर्व ते सहकार्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे,

अभिजात दर्जा म्हणजे काय? मराठी भाषेला मिळाल्यामुळे नेमका काय होणार फायदा ?

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. एक लढाई यशस्वी झाली. आपल्या मराठी भाषिकांसाठी ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी काही विशिष्ट निकष पूर्ण करावे लागतात. मराठीने हे सर्व निकष पूर्ण केले आणि म्हणूनच तिचा दर्जा अभिजात भाषांमध्ये समाविष्ट केला गेला.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. एक लढाई यशस्वी झाली. अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी काही विशिष्ट निकष पूर्ण करावे लागतात. मराठीने हे सर्व निकष पूर्ण केले आणि म्हणून तिचा दर्जा अभिजात भाषांमध्ये समाविष्ट केला गेला.मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यामुळे आता मराठी भाषेचे संरक्षण, संशोधनासाठी आणि संवर्धनासाठी निधी मिळेल यामुळे मराठी भाषेच्या जतनासाठी आणि प्राचीन साहित्याच्या अभ्यासासाठी प्रोत्साहन मिळेल. शोधकार्याला प्रोत्साहन म्हणून अभिजात भाषांवर संशोधन करणाऱ्या व्यक्तींना राष्ट्रीय स्तरावर विशेष अनुदाने आणि शिष्यवृत्त्या दिल्या जातील. मराठी भाषेतील प्राचीन साहित्य, संस्कृती, आणि इतिहास यांचे अधिकाधिक शैक्षणिक अभ्यासक्रमात समावेश होईल, ज्यामुळे मराठीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या भाषेचा अधिक सखोल अभ्यास करता येईल.अभिजात दर्जा मिळाल्याने मराठी भाषेचा दर्जा उंचावला गेला आहे आणि तिच्या जतनासाठी आणि प्रसारासाठी अनेक नवे मार्ग खुले झाले आहेत हे लाभ लक्षात घेऊन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी हा विषय लावून धरला ज्याला यश मिळाले.

## बेकायदेशीर फटाके विक्रेत्यांवर पालिकेची अनोखी कारवाई

**भाईंदर :** मिरा भाईंदर महापालिकेच्या अग्निशमन विभागाने रविवारी बेकायदेशीर फटाके विक्री करणाऱ्यांवर अनोख्या पध्दतीने कारवाई केली. अशा विक्रेत्यांच्या फटाक्यांवर पाणी मारून ते भिजवून निकामी करण्यात आले तसेच जप्त केलेले फटाके जमिनीत पुरण्यात आले. यामुळे बेकायदेशीरपणे फटाके विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

फटाक्यांची विक्री करताना कुठलीही दुर्घटना घडू नये यासाठी मिरा भाईंदर महापालिकेने उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सुरक्षित फटाके विक्रीचे धोरण तयार केले होते. त्यानुसार खासगी मोकळ्या जागेवर, मैदानावर विक्रीसाठी परवानगी दिली होती. मात्र तरी देखील अनेक ठिकाणी या नियमांचे उल्लंघन करून फटाके विक्री करण्यात येत होती. त्यावर कारवाई करण्यासाठी आयुक्त संजय काटकर यांनी अग्निशमन विभागाचे बेकायदेशीर फटाके विक्री पथक स्थापन केले.

# बाभळेश्वरला विजेच्या शॉर्टसर्किटमुळे ऊसाचे नुकसान

### शेतकऱ्यांला ऊस पिकांची भरपाई द्या : घोलप

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

**नाशिक तालुक्यातील पळसे गावाजवळील बाभळेश्वर गावातील शेतात वीजेच्या तारांचे शॉर्टसर्किट झाल्याने शेतातील ऊस संपूर्ण जळून खाक झाला असून, घटनास्थळी माजी आमदार योगेश घोलप यांनी देखील भेट देऊन संबंधित अधिका-यांशी चर्चा करत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्याच्या ऊस पिकांची भरपाई द्यावी, असे सुचित केले. घटनेची माहिती समजताच तलाठी खोब्रागडे यांनी संपूर्ण माहिती घेत तातडीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या ऊसाचे पंचनामे केले.**



**बाभळेश्वर : गावातील वशेतक-याच्या ऊसाचे वीजेच्या शाँटसर्किट मुळे नुकसान झालेल्या ऊसाची पाहणीप्रसंगी नुकसानग्रस्त शेतकरी वर्गाशी चर्चा करताना माजी आमदार योगेश घोलप. समवेत शेतकरी वर्ग (छाया: सुनील पवार)**

नाशिकरोड शहरापासून अगदी हकेच्या अंतरावर असणाऱ्या बाभळेश्वर गावातील अनेक शेतात वीजेच्या ताराना झोळ असुन त्या वारे आल्याने एकमेकांना चिपकून जात असल्याने दोन तारामधे घर्षण होऊन त्या शेतात लोबंणा-या तारांमुळे वीजेच्या थिंणग्या पडल्याने अचानक ऊसाच्या चिपटाने पेट घेत संपूर्ण ऊसाचे नुकसान केले तर आग विझवत असताना शेतकरी महिलेची साडी देखील पेटले होते.मात्र सुदैवाने कोणतीही जिवित हानी झाली नाही.मात्र काल सांयकाळी झालेल्या अचानकच्या वीजेच्या शॉट सर्किटमुळे बाभळेश्वर गावातील शेतकऱ्यांमधे एकच हंकार झाला होता तर अनेक शेतकरी ऊसाला लागलेल्या आगेमुळे आग विजविण्यासाठी धडपड करत होते. तर अचानक लागलेल्या आगेने शेतकरी वर्गाची एकच धावपळ उडली होती.यावेळी बाभळेश्वर गावातील शेतकरी चिंतामण टिळे, अशोक टिळे, भारत टिळे, अंकुश टिळे, बहिरू टिळे, अशोक टिळे, रंगनाथ टिळे, संकेत टिळे प्रशांत टिळे, सागर टिळे, निखिल टिळे, मुकुंद टिळे, कुणाल टिळे, यश टिळे, संदीप टिळे, सुभाष टिळे. राहुल टिळे, चंद्रभान टिळे, उत्तम टिळे, कचरू भिमा टिळे, लखन टिळे, अशितोष टिळे आदी शेतकऱ्यांच्या शेतीची माजी आमदार योगेश घोलप यांनी पाहणी करुन संबंधित शेतकऱ्यांशी चर्चा केली.

**नुकसानग्रस्त शेतकरी**

बहिरु बाबुराव टिळे गट नं ४०/४२,चंद्रभान पंजा टिळे, भारत सखाराम टिळे गट नं.३७,अशोक शंकर टिळे गट नं.३४/३५,कचरू भिमा टिळे गट नं. ८८ हया शेतकऱ्यांचे ऊसाचे नुकसान झाले असून तातडीने भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.



**लासलगाव : येथील प.पू. भगरीबाबा मंदिरात अकराशे दिप प्रज्वलीत करून दीपोत्सव साजरा करण्यात आला.**
**(छाया: समीर पठाण)**

## भगरीबाबा मंदिरात अकराशे दिवे प्रज्वलीत करून दीपोत्सव

**लासलगाव वार्ताहर: दीपावली म्हणजे लख्ख दिव्यांचा दीपोत्सव, लखलखत्या दिव्यांनी सर्वांच्याच जीवनाला प्रकाशमय करणारी,प्रकाशाने परिसर आणि जीवन उजळून टाकणारी, फटाक्यांच्या आतीषबाजीने आनंदाला उधाण आणणारी दीपावली म्हणजे संपूर्ण वर्षातील एक मोठा आनंदोत्सव.**

वसुबारसच्या शुभ मुहूर्तावर पहिला दिवा ग्रामदैवताला या उद्देशाने प्रेरित होऊन गेल्या नऊ वर्षांपासून राजा शिवछत्रपती प्रतिष्ठान तर्फे हा दीपोत्सव आयोजित केला जातो.यंदाही प. पू. भगरीबाबा मंदिरात दीपोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला गेला. ११०० पणत्यांच्या रोषणाईने मंदिर परिसर उजळुन निघाला होता. लासलगाव परिसरातील भाविक भक्त तसेच प. पू. भगरीबाबा भक्त मंडळ आणि लहान मुलामुलीं पासून ते जेष्ठांपर्यंत सर्वांनी यात उत्साहाने सहभाग घेतला होता.यावेळी परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दोन एसटी बसचा अपघातात दोन जण ठार: तीनजण गंभीर

**वरवंड : ता-दौड पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर दोन एसटी बसेसचा अपघात होऊन दोन ठार तर जवळपास ४० ते ५० जण जखमी झाले आहेत. या अपघातामध्ये नामदेव बाबुराव आढाव (वय ७८, रा. चिंचपूर, आष्टी, बीड) व सुवर्णा संतोष होले (वय ३८, रा. बिरोबावाडी पाटस ता. दौंड) हे दोघे या अपघातातानंतर उपचारादरम्यान ठार झाले आहेत.**



तसेच अपघातमध्ये ४० ते ५० जण किरकोळ, व तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात पुणे - सोलापूर महामार्गावर असणाऱ्या वरवंड गावाजवळील कौठीचा मळा येथे घडला. वरवंड गावच्या हद्दीत असणाऱ्या कौठीचा मळा या ठिकाणी या दोन एसटी बसचा समोरासमोर भीषण अपघात घडला.सोलापूरच्या दिशेने जाणाऱ्या एसटी बसला एक दुचाकीस्वार आडवा आला त्यास वाचविण्यासाठी ती बस दुभाजकाच्या दुसऱ्याला बाजूला गेल्याने समोरून येणाऱ्या दुसऱ्या बसला ती जाऊन धडकली. या अपघातात दोन्ही बसेसमधील साधारण ४० ते ५० प्रवासी जखमी झाले आहेत. तसेच बस क्रमांक (एमएच ११ बीएल ९४११) ही जामखेड - स्वारगेट ही गाडी सोलापूरकडून ते पुणेकडे जात असताना एक दुचाकी आडवी गेल्याने त्याला वाचवण्याचा प्रयत्नात पुणेकडून येणारी बस (एमएच १४ बीटी ३३७९) पुणे - तुळजापूर या गाडीला जाऊन धडक दिली. या दोन्ही गाडीतील चालक व वाहक गंभीर जखमी झाले आहेत, असे तीनजण गंभीर जखमी असल्याचे बोलले जात आहे. या अपघातात दोनजण ठार झाले आहेत.

## मोखाडा येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून खून

**मोखाडा : प्रतिनिधी**

**मोखाड्यातील पिंपळाचापाडा येथे रविवारी रात्री मैत्रिणीचा वाढदिवस साजरा करुन घरी येताना अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करीत तिचा खून करण्यात आल्याची घटना २७ तारखेला घडली आहे. या घटनेने मोखाडा तालुका हादरला असून पुन्हा एकदा अल्पवयीन मुलीच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.**

पिंपळाचापाडा हा पोलिस स्टेशनपासून अवघ्या पाच मिनिटांच्या अंतरावर आहे. तरीही पाड्यातील अल्पवयीन ७ वर्षाच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करीत तिचा खून झाल्याची घटना रविवारी रात्री मोखाड्यात घडली आहे.पीडित मुलीच्या घराशेजारी वाढदिवस साजरा केला जात होता. या वाढदिवसासाठी मुलगी ये जा करत होती. मात्र वाढदिवस साजरा होऊन देखील मुलगी रात्री उशिरापर्यंत घरी न आल्याने मुलीच्या घरच्यांनी साडेअकरा वाजता मुलीची शोधा शोध सुरू केला. यावेळी मुलगी बेशुद्ध अवस्थेत गावा शेजारील निर्जनस्थळी आढळून आली. त्यानंतर मुलीच्या आई वडीलांनी मुलीला ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेले परंतु दवाखान्यात नेल्यानंतर डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. घटनेची माहिती समजताच परिसरातील नागरिकांकडून रोष व्यक्त होत आहे. पिंपळाचापाडासह शेजारील गाव पाड्यातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून आपल्या मुली तालुक्याच्या शाळेत कशा पाठवायच्या, त्यांच्या सुरक्षिततेचे काय अशी भीती पालकवर्गातून उपस्थित होत आहे.या घटनेचा अधिक तपास पोलिस उपअधीक्षक गणपत पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली मोखाडा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रेमनाथ ढोले व त्यांची संपूर्ण टिम करीत आहे.

# कऱ्हाडजवळ साडेपाच कोटींचे सोने-चांदी ताब्यात

**कऱ्हाड : सातारा बाजूकडून कऱ्हाडच्या दिशेने निघालेल्या कारमधून तब्बल साडेपाच कोटी रुपयांचे सोने आणि चांदी पकडण्यात आले आहे.**

पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर तासवडे, ता. कऱ्हाड येथील टोलनाक्यावर ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी संबंधित कार तसेच सोने व चांदी ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी चौकशी सुरू होती. मिळालेल्या माहितीनुसार, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात ठिकठिकाणी नाकाबंदी सुरू आहे. पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर तासवडे टोलनाका येथेही पोलिसांकडून वाहनांची तपासणी केली जात आहे. एका कारचा संशय आल्यामुळे पोलिसांनी ती कार अडवली. झडती घेतली असता कारमध्ये सुमारे ४ कोटी ९० लाख रुपयांचे सोने तसेच ५७ लाख रुपयांची चांदी आढळून आली. तळबीड पोलीस ठाण्याच्या पथकाने सोने, चांदी कार ताब्यात घेतली.


आयकर खाते तसेच जीएसटी खात्याला देण्यात आल्यानंतर उशिरा आयकर विभाग आणि जीएसटी विभागाचे अधिकारी व कर्मचारी तळबीड पोलीस स्टेशनला दाखल झाले आहेत.

# जनगणनेचे चक्र बदलणार, २०२५ पासून सुरु होणार जनगणना

**नवी मुंबई:- आता देशात जनगणनेस सुरुवात होणार आहे. मात्र जनगणनेचे चक्र बदलणार आहे. नेहमी दहा वर्षांनी होणारी जनगणना यंदा १४ वर्षांनी होणार आहे. जनगणना २०११ नंतर आता २०२५ मध्ये होणार असून त्यानंतर २०३५, २०४५, २०५५ अशी पुन्हा दहा, दहा वर्षांनी जनगणना होणार आहे. यापूर्वी १९९१, २००१, २०११ अशी जनगणना झाली होती. आता २०२५ मध्ये होणाऱ्या जनगणनेमध्ये संप्रदायाची माहिती घेतली जाणार आहे. २०२५ मध्ये सुरु होणार जनगणना २०२६ पर्यंत चालू राहणार आहे. कोरोनामुळे २०२१ मध्ये जनगणना झाली नव्हती. परंतु या जनगणनेत जातीय जनगणना होणार का? यासंदर्भात कोणताही खुलासा अजून झालेला नाही.**

जातीय जनगणनेची अनेक विरोधी पक्षांकडून मागणी होत आहे. सरकारने मात्र याबाबत अद्याप निर्णय घेतलेला नाही. धर्म आणि वर्ग जनगणनेत विचारले जातात. सर्वसाधारण, अनुसूचित जाती आणि जमातीची गणना केली जाते. लोकांना या वेळी ते कोणत्या पंथाचे अनुयायी आहेत हे देखील विचारले जाऊ शकते.

आतापर्यंत जनगणनेत धर्म आणि वर्ग विचारला जात होता. सामान्यपणे अनुसूचित जाती आणि जनजातीची गणना केली जात होती. मात्र यंदा संप्रदाय विचारला जाणार आहे. कर्नाटकात जसे सामान्य वर्गात असलेले लिंगायत समाज स्वत: वेगळा संप्रदाय मानतात. तसेच अनुसूचित जातीत वाल्मीकी, रविदासी सारखा संप्रदाय आहे. म्हणजेच आता धर्म, वर्ग सोबत संप्रदाय गणनेचा आधार असणार आहे. सरकारचा त्याबाबत विचार सुरु आहे.



### जातीय जनगणना होणार का?

जनगणना पूर्ण झाल्यानंतर २०२६ मध्ये लोकसभेच्या जागांचे सीमांकन सुरू होणार आहे. त्यानंतर हे काम २०२८ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. काँग्रेससह अनेक विरोधी पक्ष आणि एनडीएमधील काही पक्षांनी जातीय जनगणनेची मागणीसुद्धा केली आहे. मात्र केंद्र सरकारने अद्याप याबाबत निर्णय घेतलेला नाही.

### जनगणनेचा इतिहास

१८७२ मध्ये भारतातील पहिली जनगणना गव्हर्नर-जनरल लॉर्ड मेयो यांच्या काळात झाली होती. १८८१ मध्ये भारताची पहिली संपूर्ण जनगणना आयुक्त डब्ल्यू.सी. प्लॉडेन यांनी केली होती. त्यानंतर हे दर १० वर्षांनी एकदा जनगणना होत आली. मात्र, त्यातही काही वेळा अंतर दिसून आले. १८७२,१८८१. १८९१,१९०१, १९११, १९२१,१९३१,१९४१

**स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५१ मध्ये पहिली जनगणना झाली.**

१९५१, १९६१,१९७१,१९९१,२००१, २०११

# देवळालीची लढाई जिंकण्यासाठी एकत्रित काम करावे : घोलप

## देवळालीत महाविकास आघाडीचा कार्यकर्ता मेळावा

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

**ही लढाई जिंकण्यासाठी शांतता पाळली पाहिजे आणि तिन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येणे गरजेचे आहे. आम्ही ज्याच्या जीवावर मोठे झालो त्यांना कधीच विसरणारलो नाही. त्यामुळे या निवडणुकीत सर्वांनी एकजुटीने एकत्रित येऊन ही निवडणूक लढायची आणि आपल्या आशीर्वादाने जिंकायची आहे. मी मंत्री असताना मतदारसंघात पाच धरणाची निर्मिती केली आणि पाणी प्रश्न मार्गी लावला आहे. याच आजही मला खूप आनंद असून होणाऱ्या निवडणुकीत विधान भवनावरती भगवा फडकवावा असे आवाहन माजी मंत्री बबनराव घोलप यांनी महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत केले.**

तर शिवसेना सहसंपर्कप्रमुख दत्ताजी गायकवाड म्हणाले की, उमेदवार आपण प्रत्येकजण असून आपण प्रत्येकाने कुठलाही मतभेद न ठेवता एकत्रित काम करुन महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून आणायचा असुन मागील अडीच वर्ष जे काम उध्दव ठाकरेंनी मुख्यमंत्री असताना केले त्याचा सर्वांना अभिमान आहे. कोरोनाच्या महामारित देखील आपल्या जनतेची काळजी घेणारे एकमेव मुख्यमंत्री म्हणून अभिमानाने उध्दवजीचे नाव घेतले जाते मात्र साहेब आजारी असतानाच या चाळीसजणानी कट रचून उध्दव ठाकरेंना खुर्चीवरुन खाली खेचले आणि चाळीस गद्दार शिवसेनेला सोडून निघून गेले. असा पळून जाऊन गद्दारी करणाऱ्यानां त्याची जागा दाखववी असे सांगितले.

तर खासदारांच्या मताधिक्यांपेक्षा अधिक मतदान देऊन योगेश घोलपला विजयी करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी जीवाचे रान करुन महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून आणावा आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार साहेब, शिवसेनेचे अध्यक्ष उध्दव ठाकरेचे व काँग्रेसचे नाना पटोलेचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्नशील रहावे असे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष कोंडाजी आव्हाड यांनी केले.

देवळाली विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्याच्या नियोजन बैठकीस शिवसेनेचे उबाठाचे सहसंपर्कप्रमुख दत्ताजी गायकवाड, माजीमंत्री बबनराव घोलप, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष कोंडाजी आव्हाड, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशकार्यध्यक्ष पुरुषोत्तम कडलग, उपजिल्हाप्रमुख केशव पोरजे, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष संतोष गायधनी, विधानसभा प्रमुख योगेश भोर, जिल्हा संघटक प्रकाश म्हस्के, तालुकाप्रमुख दिपक गायधनी,बबन धोंगडे,विष्णु थेटे,विलास सांडखोरे, पोपट जाधव, काकासाहेब देशमुख, उत्तम खांडबहाले, साहेबराव चौधरी, युवराज गोडसे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) रामकृष्ण झाडे, निवृत्ती कापसे, रतन चावला, राजाराम फडोळ, बहिरु जाधव, मनोज लोढा, अस्लम मणियार, नामदेव कांडेकर, विश्वास कळमकर, बबन कांगणे, सरपंच बाजीराव जाधव, शंकरराव धनवटे, लिलाबाई गायधनी, माजी महापौर नयना घोलप,ज्योती भागवत, वंदना जाधव, अंबादास ताजनपुरे, मनोहर बोराडे, राहुल धात्रक, डॉ. संदीप वालझाडे, ज्ञानेश्वर शिंदे, जयंत गाडेकर, आत्माराम दाते, ॲड. बाळासाहेब आडके, वसिम शेख, श्रीराम गायकवाड, मोनिश दोंदे आदीसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.



**देवळाली : मतदार संघातील महाविकास आघाडीच्या कार्यर्त्याच्या मेळाव्यात मार्गदर्शन करताना माजीमंत्री बबनराव घोलप समवेत दत्ता गायकवाड, कोंडाजी आव्हाड, उमेदवार योगेश घोलप, पुरुषोत्तम कडलग, रामकृष्ण झाडे, शंकरराव धनवटे आदीसह मान्यवर (छाया : सुनील पवार)**

### घोलपांचा उमेदवारी अर्ज आज भरणार

महाविकास आघाडी शिवसेनेचे (उबाठा)उमेदवार योगेश घोलप आज आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असून त्यासाठी गिरणारे गावातील गणपती मंदिरात आरती करुन काही मोजक्या कार्यकर्त्यान समवेत उमेदवारी दाखल करणार आहे.तरी सर्व कार्यकर्त्यांनी गिरणारे गावात जमण्याचे आवाहन शिवसेना उबाठाच्यावतीने उपजिल्हाप्रमुख केशव पोरजे यांनी केले आहे.

### गद्दारांना जागा दाखवा

आई म्हणून ज्या पक्षावर आपण प्रेम करतो त्या पक्षाचे चिन्ह, पक्ष बळकवल शिवाय साहेबांना ज्यांनी मुख्यमंत्री पदावरून खाली खेचले अशा गद्दारांना जागा दाखवण्याची ही वेळ आहे. तर शिवसेना फोडीवर न थांबता राष्ट्रवादी देखील फोडली मात्र ऐंशी वर्षाच्या तरुणांनी म्हणजेच शरदचंद्र पवार साहेबांनी पक्ष फुटीनंतर देखील नव्या उमेदीने पुन्हा एकदा पक्ष उभा केला त्या भाजपाला धडा शिकवून. येणा-या काळात महाराष्ट्रावर भगवा झेंडा फडकविण्यासाठी सज्ज रहावे असे आवाहन सीपक गायधनी यांनी केले.

- **दीपक गायधनी,** (तालुकाप्रमुख, शिवसेना उबाठा)

## महत्त्वाचे



### महायुतीतही बंडखोरी; मेंगाळ यांनीही केला उमेदवारी अर्ज दाखल

**इगतपुरी : प्रतिनिधी**

इगतपुरी मतदार संघात महायुतीची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर माजी आमदार काशिनाथ मेंगाळ यांनी देखील सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी शिवसेनेचे नेते माजी आमदार पांडुरंग गांगड व माजी तालुकाप्रमुख संपत काळे यांच्या उपस्थितीत सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात उपविभागीय अधिकारी ओमकार पवार यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल केला. विशेष म्हणजे गेल्या एक दिवसापूर्वी आघाडीने उमेदवार जाहीर केल्यानंतर सर्व काँग्रेसच्या पदाधिकारी व आदिवासी नेत्यांनी काँग्रेसच्या उमेदवाराला व युतीच्या उमेदवाराला विरोध करत सर्वपक्षीय एकच उमेदवार द्यायची घोषणा केल्यानंतर माजी आमदार काशिनाथ मेंगाळ यांनी बंड करत उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी आदिवासी समाजातील सर्व नेते व तालुक्यातील इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# मविआकडून सुनीता चारोस्कर यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**दिंडोरी : प्रतिनिधी**

**लोकसभेला ज्याप्रमाणे शिवसेनेच्या व काँग्रेसच्या सर्व कार्यकर्त्यांनी ज्याप्रमाणे मोठी ताकद उभी केली होती त्याचप्रमाणे विधान सभेला महाविकास आघाडीच्या शरदचंद्र पवार गटाच्या उमेदवार सुनीता चारोस्कर यांना निवडून द्यावे, शरदचंद्र पवार यांनी सर्व जाती धर्माच्या लोकांना न्याय दिला आहे,असे मत कादवा साखर कारखान्याचे चेअरमन श्रीराम शेटे यांनी व्यक्त केले.**



दिंडोरी येथील संस्कृती लॉन्स येथे महाविकास आघाडीच्या उमेदवार सुनीता चारोस्कर यांचा उमेदवारी अर्ज काल दाखल करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. शिवसेनेचे जिल्हा प्रमुख जयंत दिंडे यांनी सांगितले की,महाविकास आघाडीच्या उमेदवार सुनीता चारोस्कर याना निवडून आणण्यासाठी शिवसेनेचा मोठा वाटा असेल. महाराष्ट्राची अस्मिता जपण्याची वेळ आता आली आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दत्तात्रय पाटील यांनी सांगितले की, आजपर्यंत आपण चार पंचवार्षिक वेळेस आमदार म्हणून निवडून दिले व ते नामदारही झाले, त्यामुळे त्यांनी कुठेतरी थांबायला पाहिजे होते. आज तुमच्या आमच्या आशीर्वादाने स्वतंत्र नन्तर पहिल्यांदा दिंडोरी विधान सभा साठी महिला उमेदवार यादिंडोरी पेठ विधान सभेत उभ्या राहणार असल्याने आपण सर्वानी एकजूट ताकद उभी करून पंधरा वर्षाचा बदल या विधान सभेला घडवायचा आहे, यावेळी कादवा कारखान्याचे चेअरमन श्रीराम शेटे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख जयंत दिंडे, दिंडोरी लोकसभेचे खासदार भास्कर भगरे, दत्तात्रय पाटील, गोकुळ नाना पिंगळे, जीवा पांडू गावित, शैलेश पवार, संजय आप्पा पडवळ, प्रवीण नाना जाधव, माजी आमदार रामदास चारोस्कर, शाम हिरे , राजू ढगे प्रकाश पिंगळ पांडुरंग गणोरे,दामू राऊत, गिरीश गावित, गणपत चौधरी, कृषी बाजार समिती सभापती प्रशांत कड, गंगाधर निखाडे, योगेश बर्डे, कादवा कारखाना संचालक,रघुनाथ जाधव, बापू पडवळ, रावसाहेब संदान, रामदास पाटील पिंगळ ,शिवाजी जाधव, दत्तात्रय जाधव, सोमनाथ सोनवणे, सुनील आव्हाड, पंडित गायकवाड, शैलाताई उफाडे, वाळू जगताप, पुंडलिक धात्रक, एकनाथ खराटे,उत्तम जाधव, दत्तू भेरे, तुकाराम जोंधळे, सचिन देशमुख, मेघा दिंदळे, सुनिता लहांगे, रणजीत देशमुख, भाऊसाहेब बोरस्ते, रघुनाथ जाधव, याकूब शेख, गणेश गवळी, मनोहर चौधरी आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

महाविकास आघाडीच्या उमेदवाराची अनेक दिवसापासून प्रतीक्षा होती त्यास अखेर मुहूर्त लागला असून महाविकास आघाडीकडून माजी आ. रामदास चारोस्कर याच्या सौभाग्यवती सुनीता चारोस्कर यांना उमेदवारी मिळाली असून काल श्रीराम शेटे ,दिंडोरी चे खासदार भास्कर भगरे शिवसेना जिल्हाप्रमुख जयंत दिंडे सुरगाणा कळवण विधानसभा माजी आ.जिवा पांडू गावित प्रवीण जाधव दत्तात्रय पाटील व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज भरण्यात आला.

# सुरगाण्यातील दहशतवादाला जशास तसे उत्तर देणार

## आ. नितीन पवार : शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल

**कळवण : प्रतिनिधी**

**घरकुल, वनजमिनीसाठी गोरगरीब जनतेकडून पैसे गोळा करणारे आता कळवण तालुक्यात विकासाची भाषा करत आहे. ४० वर्षे काय केले हे आधी जनतेला सांगा मग व्हिजन सांगा, सुरगाणा तालुक्यात दहशतीचे राजकारण सुरु असून राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी मी भक्कम उभा आहे. दहशतवादाला जशास तसें उत्तर देण्याचा इशारा आमदार नितीन पवार यांनी दिला.**




कळवण सुरगाणा विधानसभा मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीच्या वतीने आमदार नितीन पवार यांनी नामनिर्देशन दाखल केले. नामनिर्देशन दाखल करण्यासाठी कळवण शहरात राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे उमेदवार आमदार नितीन पवार यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन केले. कळवण बाजार समितीपासून मानूरपर्यंत रॅली काढून शहरातील मतदारांना अभिवादन करत मानूरला समारोप केला.आमदार पवार यांचे ठिकठिकाणी महिलांनी औक्षण केले व्यापारी बांधवानी सत्कार केला.

आमदार पवार पुढे म्हणाले की मी ए. टी.पवारांचा मुलगा त्यांना अभिप्रेत कामच करणार.तुमच्यासारखे घरकुलासाठी गोरगरिबांकडून तीनशे रुपये गोळा करत नाही. मोर्चे काढून फक्त संस्था वाढवल्या.कारखाना खाणाऱ्यांनी चार तालुक्यातल्या शेतकऱ्यांचं वाटोळं केलं ते आता माझ्यावर टीका करतात.पश्चिम पट्ट्यात जाऊन लोकांना भूलथापा देतात.जनता आमच्यासोबत आहे आम्हाला तुमच्यासारखे बाहेर तालुक्यातले लोक आणावे लागत नसल्याचे आमदार पवार यांनी सांगितले.

यावेळी अशोक पवार मोहन जाधव, नवसू गायकवाड, हेमंत पाटील, तुळशीराम महाले, यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन राकेश हिरे यांनी केले. आभार राजेंद्र भामरे यांनी मानले.

यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा जयश्री पवार शेतकरी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष देविदास पवार, नगराध्यक्ष कौतिक पगार, बाजार समिती सभापती धनंजय पवार, मविप्र चे माजी संचालक अशोक पवार, यशवंत गवळी, गोपाळ धूम, मधुकर जाधव, नारायण हिरे, महेंद्र हिरे, राजेंद्र भामरे, राजु पवार,भूषण पगार, शरद गुंजाळ, बापू जगताप, दीपक वेढणे,कृष्णा बच्छाव ,एस.के.पगार, युवराज गांगुर्डे, तुळशीराम महाले, नवसु गायकवाड, लक्ष्मण गायकवाड, राजेंद्र निकुळे, सुदाम भोये, लालजी जाधव, अर्जुन बागुल, रामदास चव्हाण, रघुनाथ महाजन, भगवान बागुल, पोपट जगताप उपस्थित होते.

### महिला भगिनींसोबत भरला फॉर्म

नितिन पवार यांनी गुलाबी साडी परिधान केलेल्या आदिवासी भगिनीसमवेत तहसील कार्यालयात जाऊन आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. रॅलीत हजारो महिला भगिनींची उपस्थिती होती.

# चांदवडला महायुती, महाविकास आघाडी प्रहारच्या उमेदवारांचे अर्ज दाखल

**काजी सांगवी : वार्ताहर**

**चांदवड येथे दिवसभर सर्व पक्षांच्या वतीने उमेदवारी दाखल करण्यासाठी लगबग चालू होती. महायुतीचे उमेदवार डॉक्टर राहुल आहेर तसेच महाविकास आघाडीचे उमेदवार शिरीष कुमार कोतवाल प्रहार जनशक्ती पक्षाचे उमेदवार गणेश निंबाळकर यांनी आजचा मुहूर्त साधून उमेदवारी अर्ज दाखल केला.**



डॉक्टर राहुल आहेर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार पंकज भुजबळ, माजी जिल्हाध्यक्ष अरुण आहेर मनोज शिंदे डॉक्टर नितीन गांगुर्डे बाळासाहेब वाघ विलास दादा ढोमसे देवळाचे शिवसेना तालुका अध्यक्ष चांदवड शिवसेना तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष यांच्यासह महायुतीचे सर्व घटक पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मेळाव्यानंतर रॅली काढून डॉक्टर राहुल आहेर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला महाविकास आघाडीचे उमेदवार तसेच काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शिरीष कुमार कोतवाल यांनी अत्यंत साध्या पद्धतीने उमेदवारी अर्ज दाखल केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे डॉक्टर सयाजीराव गायकवाड शिवसेनेचे नितीन आहेर तसेच महाविकास आघाडीचे घटक असलेले मोजके कार्यकर्ते उपस्थित होते. प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष तसेच उमेदवार गणेश निंबाळकर यांनी चांदवड कृषी उत्पन्न बाजार समिती येथून बैलगाडीवर रॅली काढून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

# नांदगावमधून सहा उमेदवाराचे अर्ज दाखल

## एकूण उमेदवारांची संख्या ९ वर

**नांदगाव: प्रतिनिधी**

**नांदगाव विधानसभा मतदारसंघाचे निवडणुकीसाठी सोमवार दि.२८ रोजी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या निर्धारित वेळेपर्यंत माजी खासदार समीर भुजबळ यांच्यासह ज्ञानेश्वर देविदास शेलार , सुहास द्वारकानाथ कांदे, अंजुमखान अहमद पठाण, हारूण अरब पठाण, प्रशांत कैलास पवार आदींनी आपला आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.**

आज एकूण सहा उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहे. या अगोदर तीन उमेदवारांनी आपले उमेदवार अर्ज दाखल केले आहेत आता एकूण उमेदवारांची संख्या नऊवर गेली आहे. माजी खासदार समीर भुजबळ यांनी न्यू इंग्लिश स्कुल पासून नांदगांव शहरातून रॅली काढत या रॅलीची सांगता जैन धर्म शाळेजवळ सभा घेऊन सभेची सांगता करण्यात आली.

यानंतर समीर भुजबळ यांनी शक्ती प्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आत्तापर्यंत नांदगाव विधानसभा मतदारसंघासाठी नऊ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत उमेदवारी दाखल करण्यासाठी मंगळवार दिनांक २९ रोजी शेवटचा दिवस असल्याने उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी उद्या मोठी गर्दी होणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

# सावाना सुरू करणार मुलींसाठी अभ्यासिका

**नाशिक : प्रतिनिधी**

**सार्वजनिक वाचनालयातर्फे मुलींसाठी स्वतंत्र अभ्यासिका सुरू करण्याचा निर्णय रविवारी झालेल्या वार्षिक सभेत घेण्यात आला. अभियंता अविनाश शिरोडे यांच्याकडून प्राप्त झालेल्या ३६ लाख रुपयांच्या निधीतून ही अभ्यासिका उभारण्यात येणार आहे.**



या सभेच्या अध्यक्षस्थानी सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके होते. व्यासपीठावर उपाध्यक्ष वैद्य विक्रांत जाधव, प्रा. डॉ. सुनील कुटे, कार्याध्यक्ष ॲड. अभिजित बगदे, जयेश बर्वे, गिरीश नातू, जयप्रकार जातेगावकर, सुरेश गायधनी, संजय करंजकर, प्रेरणा बेळे, सोमनाथ मुठाळ, प्रशांत जुन्नरे उपस्थित होते. सावाना वार्ता हे बंद पडलेले नियतकालिक आता वाचकांना ऑनलाइन उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. अशी माहिती दिली. सुहास भनगे यांनी ग्रंथांचा हिशेब लागत नसल्याची बाब निदर्शनाला आणून दिली. दोन लाख, दोन हजार ३४१ ग्रंथांपैकी ४५ हजार ग्रंथांचा हिशेब लागत नाही. याकडे लक्ष वेधले. प्रा. फडके यांनी याबाबत खुलासा करताना २०१८ साली मोजणी झाली होती. त्यानंतर मोजणी झालेली नाही. मात्र, काही ग्रंथ ज्यांना मागणी नाही, असे २५ हजार ग्रंथ शहरातील वाचनालयांना भेट दिल्याचे सांगितले. सभासदांकडे असलेली पुस्तके परत करण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे.

देणगीदार रामेश्वर सारडा यांनी संस्थेला दिलेल्या पत्रानुसार त्यांच्याऐवजी श्रीरंग सारडा यांना संस्थेत प्रतिनिधीत्व देण्यास सभेने एकमताने मंजुरी देण्यात आली. विषयांचे वाचन देवदत्त जोशी यांनी केले. मागील सभेचे इतिवृत्त वाचन ॲड. अभिजित बगदे यांनी केले. सभेत २०२३-२४ चा अहवाल तसेच ताळेबंद जमाखर्चास मंजुरी देण्यात आली. २०२५-२६ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल, बी.जी. शेखर पाटील यांची महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळावर सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव केला. या सभेला सभासद उपस्थित होते.

# राजकारण्यांच्या पोटी न जन्मल्याने मला डावलण्यात येते

## चांदवडच्या मेळाव्यात डॉ. कुंभार्डे यांची खंत

**काजीसांगवी : वार्ताहर**

**२०१४ साली भाजपाने तिकीट नाकारल्यावर अपक्ष उमेदवारी करावी लागली. त्यावेळी पक्षीय चिन्हांवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांपेक्षा चांदवड तालुक्यात सर्वात जास्त मते मला होती. त्यावेळी मला कोणत्याही पक्षाचे तिकीट असते तर मीच आमदार झालो असतो. २०१४ नंतर ते आत्तापर्यंत सर्व ठिकाणी लढविलेल्या निवडणुकांमध्ये तालुक्यात एक नंबरची मते मला मिळतात. याचा अर्थ जनतेच्या मनातील खरा आमदार मीच आहे. फक्त मला संधी मिळत नाही. कारण मी राजकारण्यांच्या घरात जन्माला आलो नाही. अशी खंत डॉ. आत्माराम कुंभार्डे यांनी व्यक्त केली.**




**काजीसांगवी : कार्यकर्ता बैठकीत बोलताना डॉ. आत्माराम कुंभार्डे. (छाया : भारत मेचकुल)**

चांदवड येथील चंद्रभागा लॉन्स मध्ये आयोजित कार्यकर्ता बैठकीत ते बोलत होते.

डॉ. आत्माराम कुंभार्डे यांना महायुतीकडून तिकीट मिळाले नसल्याने त्यांचे सर्व समर्थक कार्यकर्ते प्रचंड नाराज झाले आहे. या सर्व कार्यकर्त्यांची भावना काय आहे हे ऐकण्यासाठी बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी डॉ. कुंभार्डे यांच्या सर्व कार्यकर्त्यांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या. डॉ. कुंभार्डे यांच्यावर नेहमीच अन्याय झाल्याची भावना सर्वच कार्यकर्त्यांनी बोलून दाखविली. त्यामुळे डॉ. कुंभार्डे यांनी काहीतरी निर्णय घ्यावा अशी गळ कार्यकर्त्यांनी घातली.

पंचायत समिती जिल्हा परिषद कृषी उत्पन्न बाजार समिती या सर्व ठिकाणी मी भाजपाची सत्ता आणली. आमदार डॉ. राहुल आहेर यांना आमदार करण्यातही माझा मोठा सिंहाचा वाटा आहे. मी प्रामाणिकपणे काम करणारा नेता असल्याने मी लोकांसाठी २४ तास दिवसा रात्री केव्हाही उपलब्ध असतो.

सिन्नर नांदगाव येवला मालेगाव तालुक्याच विकास होतो मग चांदवडचाच विकास का होत नाही? अशी खरमरीत टीकाही केली. जनतेचे प्रश्न सिंचनाचे प्रश्न औद्योगीकरण हे जर सोडवायचे असेल तर त्यासाठी आमदारकीची चावी हातात लागते. परंतु ती दुर्दैवाने आपल्यापासून लांब जात असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

### माघारी नंतर भूमिका स्पष्ट करणार

डॉ. आत्माराम कुंभार्डे यांना कार्यकर्त्यांनी गळ घातल्यानंतर त्यांनी स्पष्ट केली की, जो उमेदवार मतदार संघाचे प्रश्न सोडवेल विकास करेल त्याच्यासोबत किंवा अपक्ष उमेदवारीसाठी आपण तयार आहे. तसेच चांदवड देवळा विकास आघाडी तयार करून ज्यांना काम करायचे नाही त्यांना धडा शिकविणार. किंवा जे सर्वांच्या समोर जनतेचे प्रश्न सोडविण्याचे आश्वासन देतील त्यांच्यासोबतही जाण्याचा विचार करू. असे डॉ. कुंभार्डे यांनी स्पष्ट केल्याने राजकीय वर्तुळात त्यांच्या भूमिकेबाबत उत्सुकता वाढली आहे.

## महत्त्वाचे

### सिन्नरला उभ्या ट्रकमधून डिझेल चोरी

**सिन्नर : प्रतिनिधी**

माळेगाव शिवारात नाशिक-पुणे महामार्गाच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकमधून चोरट्यांनी १६० लिटर डिझेल चोरी केले. दिनेश श्यामसुंदर यादव, रा. उत्तर प्रदेश याने आपला ट्रक माळेगाव शिवारातील हॉटेल तनिष्क समोर उभा केला होता. रात्रीच्या वेळी चोरट्यांनी ट्रकच्या टाकीमधून डिझेल चोरी केले. याप्रकरणी यादव याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. अधिक तपास हवालदार शिंदे करत आहेत.

### सिन्नरमध्ये परप्रांतीय कामगाराची आत्महत्या

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील माळेगाव एमआयडीसीतील बालाजी फास्टनर्स इंडिया प्रा. लि. कारखान्यातील परप्रांतीय कामगाराने गळफास घेऊन आत्महत्या केली. राकेश जगदीश यादव (३८) रा. मध्यप्रदेश असे मृताचे नाव आहे. राकेशने कारखान्यातील कोटिंग विभागात छताच्या अँगलला प्लास्टिकच्या दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला. कामगारांनी त्यास ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून हवालदार संतोष टेमगर पुढील तपास करत आहेत.

### ईरा स्कूलच्या अथर्व ढोली याची राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड

**सिन्नर : प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी



कार्यालय, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने सिन्नर महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या विभागीय तायक्वांदो स्पर्धेत शहरातील ईरा इंटरनॅशनल स्कूलच्या अथर्व सचिन ढोली याने प्रथम क्रमांक पटकावला. त्याची बालेवाडी, पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून स्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. सिन्नर महाविद्यालयात पार पडलेल्या विभागीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत इरा इंटरनॅशनल स्कूल मधील मनस्वी तानाजी सोनवणे हिने द्वितीय क्रमांक पटकावला. तर राम दशरथ दळवी, अथर्व विजय आव्हाड आणि स्मित राजेंद्र बोराडे यांनीही चमकदार कामगिरी केली. राज्यस्तरीय स्पर्धे साठी निवड झालेल्या ढोली याला नाशिक जिल्हा क्रीडा अधिकारी खांडेकर, स्कूलचे संचालक किरण मोरे, इंजिनिअर मयूर आव्हाड, डॉ. संदीप मोरे, सीईओ संगीता नय्यर, प्राचार्य राजेंद्र शिंदे, प्राथमिक विभागाच्या प्राचार्य सरिता सिंग यांनी शुभेच्छा दिल्या. क्रीडा शिक्षक व राष्ट्रीय तायक्वांदो प्रशिक्षक नितीन सुभाष सानप यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

### दुचाकी घसरुन एक ठार

**वंजारवाडी :** भरधाव दुचाकी घसरल्याने ५२ वर्षीय व्यक्ती ठार झाला. हा अपघात गेल्या गुरूवारी (दि.३) वंजारवाडी (ता. इगतपुरी) शिवारात झाला. एसएमबीटी रूग्णालयात जखमी दुचाकीस्वारावर उपचार सुरू होते. याबाबत देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. बाळू विष्णू मते (रा. मुरंबी, ता. इगतपुरी) असे मृत दुचाकीस्वाराचे नाव आहे. मते गुरूवारी सकाळी मुरंबीकडून वंजारवाडीच्या दिशेने आपल्या दुचाकीवर प्रवास करीत असतांना हा अपघात झाला होता. वंजारवाडी शिवारात भरधाव दुचाकी घसरल्याने ते गंभीर जखमी झाले होते. मुलगा विक्रम मते यांनी त्यांना तात्काळ अशोका मेडिकेअर हॉस्पिटल येथे दाखल केले होते. अधिक उपचारार्थ त्यांना इगतपुरी येथील एसएमबीटी रूग्णालयात हलविले असता मंगळवारी उपचार सुरू असतांना वैद्यकीय सूत्रांनी तपासून मृत घोषीत केले. अधिक तपास हवालदार मिरजे करीत आहेत.

### वीज बील वसुली करताना महावितरणच्या अधिकाऱ्यांना मारहाण; दोघांविरुद्ध गुन्हा

**चांदवड : वार्ताहर**

तालुक्यातील वडाळीभोई येथे वीज बिल वसुली करताना अधिकाऱ्यांना गजाने मारहाण केल्याप्रकरणी वडनेर भैरव पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजेंद्र बाबूराव खैरनार व दीपक राजेंद्र खैरनार असे गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. शुक्रवार २५ ऑक्टोबर रोजी दुपारी १२:३० वाजेच्या सुमारास सहाय्यक अभियंता वडाळीभोई कक्ष दिनेश प्रसाद रंजन व सहाय्यक अभियंता शिंगवे कक्ष रोहन जाधव तसेच वरिष्ठ तंत्रज्ञ तेजस खैरनार, प्रधान तंत्रज्ञ संदीप गुजरे हे वीजबिल वसुली कामानिमित्त वडाळीभोई गावात राजेंद्र बाबुराव खैरनार यांचे लाईट बिल थकलेले असल्याने त्यांच्या घरी गेले व त्यांना तुमच्या लाईट बिल थकलेले आहे ते तुम्ही भरा, नाही भरल्यास आम्हाला नियमाप्रमाणे तुमचे लाईटचे कनेक्शन कट करावे लागेल, असे सांगितले. परंतु त्यावर राजेंद्र खैरनार यांनी आम्ही बिल भरणार नाही तुम्हाला काय करायचे ते करून घ्या असे बोलले. त्यामुळे उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांचे वीज कनेक्शन कट केले. याचा राग आल्याने राजेंद्र बाबुराव खैरनार यांनी त्यांना अडवून त्यांच्याकडे असलेले पकड व इतर साहित्य घेऊन शिवीगाळ सुरू केली. त्यावर महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तुम्ही नियमाप्रमाणे बिल भरून पावती घेऊन या तुमचे वीज कनेक्शन लगेच चालू करून देऊ असे सांगितले. तेव्हा राजेंद्र खैरनार यांनी सांगितले की, वीज कनेक्शन जोडल्याशिवाय आम्ही तुम्हाला जाऊ देणार नाही व ते अधिकारी व कर्मचारी यांना शिवीगाळ करू लागले. तेव्हा त्यांची बाजू घेऊन त्यांचा मुलगा दीपक राजेंद्र खैरनार हा आला व सहाय्यक अभियंता रोहन जाधव यांची गच्ची धरून त्यांना मारहान करण्यास सुरुवात केली. त्यांना सोडवण्यासाठी रंजन हे गेले असता त्यांनाही त्यांनी चापटीने मारहाण केली. त्यामुळे वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी वडाळीभोई पोलीस चौकी येथे येऊन अधीक्षक अभियंता ज्ञानदेव पडळकर, कार्यकारी अभियंता केशव काळुमाळी, उपकार्यकारी अभियंता तुषार सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली राजीव रंजन यांनी वडनेर भैरव पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध सरकारी कामात अडथळा आणणे व मारहाण प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. जोपर्यंत गुन्हा दाखल होऊन आरोपींना अटक होत नाही तोपर्यंत आम्ही इथून हलणार नाही अशा प्रकारची भूमिका अधिकारी व कर्मचारी यांनी घेतली होती. त्यामुळे लगेचच गुन्हा दाखल होऊन आरोपींना अटक करण्यात आली असल्याची माहिती उपकार्यकारी अभियंता तुषार सूर्यवंशी यांनी दिली.

# सिन्नरला ६ जणांचे उमेदवारी अर्ज दाखल

**सिन्नर : प्रतिनिधी**

**१२० सिन्नर विधानसभा मतदारसंघात सोमवारी (दि.२८) सहा जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सीमंतीनी कोकाटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून एक आणि एक अपक्ष असे दोन अर्ज दाखल केले. तर शरद तुकाराम शिंदे यांनी महाराष्ट्र स्वराज्य पार्टीकडून एक आणि एक अपक्ष असे दोन अर्ज दाखल केले. मात्र या दोघांनीही पक्षांचे एबी फॉर्म जोडलेले नाहीत.**

याशिवाय प्रहारचे तालुकाध्यक्ष कैलास विश्वनाथ दातीर आणि वडगाव पिंगळा येथील नारायण ज्ञानदेव मुठाळ यांनी प्रत्येकी एक अपक्ष नामनिर्देशन पत्र निवडणूक निर्णय अधिकारी रवींद्र भारदे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सुरेंद्र देशमुख यांच्याकडे दाखल केले. आतापर्यंत आमदार माणिकराव कोकाटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून तर उदय सांगळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून अर्ज दाखल केले आहेत.

### आज शेवटचा दिवस

याशिवाय सांगळे यांच्या पत्नी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शीतल सांगळे यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. आतापर्यंत एकूण ११ नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आले आहे.

मंगळवारी (दि.२९) उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाकडून हरिभाऊ बाळाजी तांबे हे नामनिर्देशन पत्र दाखल करणार आहेत. याशिवाय दुपारी ३ वाजेपर्यंत आणखी कोण कोण उमेदवारी अर्ज दाखल करते हे पहावे लागणार आहे.



# सिन्नरला अखंड मराठा समाज, मराठा सोयरीक संस्थेचा वधू-वर मेळावा

### संस्थेचे कार्य कौतुकास्पद : कृष्णाजी भगत

**सिन्नर : प्रतिनिधी**

**सद्यस्थितीत वधू वरांचे लग्न जुळणे दिव्य बनले आहे. शेतकरी, व्यावसायिक मुलांचे लग्न जुळणे अति कठीण झाले आहे. त्यासाठी पालकांनी एकमेकांना समजून घेणे गरजेचे आहे. आज धकाधकीच्या जीवनात कुणालाच वेळ नाही, मात्र मराठा सोयरिक संस्था हे काम स्वयंस्फूर्तीने करत आहे. त्यामुळे त्यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन वधू - वर मेळाव्याचे अध्यक्ष, मविप्रचे संचालक कृष्णाजी भगत यांनी केले.**

सिन्नर शहरातील नर्मदा लॉन्स येथे अखंड मराठा समाज व मराठा सोयरिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ९१ व्या मोफत मराठा वधू-वर परिचय मेळाव्यात ते बोलत होते. राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमा पुजनाने मेळाव्यास प्रारंभ झाला. वधू-वरांनी आपल्या अपेक्षांचे ओझे कमी केले तर लग्न जुळण्यास वेळ लागणार नाही, असा सल्ला माजी नगराध्यक्ष विठ्ठलराजे उगले यांनी दिला.

मेळाव्यासाठी मराठा सेवा संघाचे माजी तालुकाध्यक्ष प्रा. राजाराम मुंगसे, माजी सरपंच ज्ञानेश्वर पांगारकर, जयराम शिंदे, भाऊपाटील खताळे, मराठा उद्योजक लॉबीचे राज्य कार्याध्यक्ष स्वप्निल काळे, डॉ. संजय गायधनी, बंटीशेठ भागवत, राजेंद्र खताळे, छाया झाडे, बाजार समितीच्या संचालक सुरेखा पांगारकर, कमलेश कोते, बाळासाहेब देशमुख, प्रभाकर चतुर, प्रज्वल ढमाले, प्रा. रावसाहेब गायकवाड, डी. जी. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. मोफत वधू-वर मेळावा यशस्वी करण्यासाठी शिवशाहीर स्वप्निल डुंबरे, प्रदीप भोर, बाळासाहेब भगत, मच्छिंद्र चिने, नामदेव शिंदे, पंढरीनाथ ढोकणे, सुदेश खुळे, प्रकाश गुळे, राजाभाऊ चव्हाणके, प्रतिक शिंदे यांनी मोलाचे सहकार्य केले.

#### ३५८ वधू-वरांची नाव नोंदणी

मेळाव्यात सुमारे दोन हजाराहून अधिक वधू वर आणि त्यांच्या पालकांनी हजेरी लावली. पैकी ३५८ जणांची नव्याने नोंदणी झाली. त्यात ३१० विवाह इच्छुक तरुण आणि ४८ तरुणींचा समावेश आहे. यावेळी अनेक मुलींनी व मुलांनी स्वतः स्टेजवर येऊन परिचय दिला. आतापर्यंत नाशिक जिल्ह्यातील सगळ्यात मोठा मेळावा असल्याचे मत अनेक पालकांनी व्यक्त केले.

#### ३० नोव्हेंबरला नाशिक रोड येथे मेळावा

मराठा समाजाच्या वतीने ९२ वा मोफत वधू-वर मेळावा शनिवारी ३० नोव्हेंबर रोजी नाशिक रोड येथील कदम लॉन्स येथे आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याच्या अधिक माहितीसाठी ७४४७७८५९१० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# देवळालीत भावा-बहिणीत सामना?

## तनुजा घोलप यांचा अपक्ष अर्ज दाखल

**नाशिक : प्रतिनिधी**

**राज्यातील विविध मतदारसंघामध्ये विधानसभेच्या निवडणुकीमुळे घरा-घारामध्ये उभी फूट पडल्याचे चित्र आहे. राजकारणात कधी काका विरुद्ध पुतण्या, भावाविरोधात भाऊ, वडिलांविरोधात मुलगी, भावजय विरुद्ध नणंद असे आखाडे निवडणुकीत पहावयास मिळाले आहे.**





दरम्यान देवळाली मतदारसंघात आता भावाविरोधात बहीण उभी ठाकली आहे. माजी आ. योगेश घोलप यांच्याविरोधात भाजपच्या तनुजा घोलप यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करत त्या निवडणुकीच्या आखाडयात उतरल्या आहेत. मात्र या भावा-बहिणीच्या लढाईत विरोधी पक्षाच्या उमेदवाराचाच फायदा होण्याची शक्यता आहे. मात्र तनुजा घोलपांनी अर्ज भरल्यानंतर याची मतदारसंघात चांगलीच चर्चा रंगू लागली आहे.

देवळाली विधानसभा मतदारसंघाची जागा शरद पवार गटाने ठाकरे गटाला सोडताचा, येथून माजी आ. योगेश घोलप यांना उद्धवसेनेने जागा सोडली. यानंतर घोलप समर्थकांनी जल्लोष साजरा केला. मात्र माजी मंत्री बबन घोलप यांची कंन्या तनुजा घोलप यांनी त्यांचा उमेद्वारी अर्ज दाखल केल्याने माजी आ. योगेश घोलप यांची अडचन होण्याची शक्यता आहे. तनुजा भोईर-घोलप यांनी निवडणुकीतून जर माघार घेतली नाही तर मतविभाजनाचा फटका त्यांच्या भावालाच बसण्याची शक्यता आहे. देवळालीतून उमेदवारी करण्यासाठी तनुजा भोईर-घोलप गेल्या काही दिवसांपासून मतदारसंघात जनसंपर्क वाढवत होत्या. नागरिकांच्या भेटीगाठी घेत असल्याचे चित्र होते. मात्र महायुतीत हा मतदारसंघ अजित पवार गटाकडे असून येथून सरोज आहिरे विद्यमान आमदार आहेत. त्यांना येथूम महायुतीकडून उमेदवारीही मिळाली आहे.

दरम्यान, भाजपकडून संधी मिळत नसल्याचे पाहून आणि शरद पवार गटाकडूनही संधी मिळणार नसल्याचे लक्षात आल्यावर तनुजा घोलप यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करत बंडखोरी केली आहे. मात्र त्यांचा आ. आहिरेंपेक्षा त्यांचे बंधू माजी आ. योगेश घोलप यांनाचा तोट्याचे होऊ शकते. ही अडचण पाहूनच माजी मंत्री बबन घोलप यांनी आपल्या मुलीला आडनाव लावू नये अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल. असा इशाराच त्यांनी देऊन टाकला आहे. उमेदवारी अर्ज भरण्याचा आज मंगळवारी अंतिम दिवस आहे. तसेच माघारीनंतर कोण कोण माघार घेणार चित्र स्पष्ट होणार आहे.

# बाजार समितीच्या उपसभापतिंची सोनसाखळी खेचली

**सिन्नर : प्रतिनिधी**

**सिन्नर शहरात सोनसाखळी चोरट्यांचा सुळसुळाट झाला आहे. त्यामुळे रस्त्याने ये-जा करणाऱ्या महिला असुरक्षित झाल्या आहेत. सिन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती सिंधू केशव कोकाटे यांना चेन स्नेचरचा फटका बसला. चालत्या दुचाकीवरून अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातून अडीच तोळ्याची पोत लांबविल्याची घटना सिन्नर शहरात घडली.**



सिन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती सिंधू केशव कोकाटे या दुचाकीने जात असताना चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील अडीच तोळ्यांची पोत लांबविली. कोकाटे या सिन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शनिवारी (दि.२६) मासिक बैठकीसाठी आल्या होत्या. त्यानंतर त्या पती केशव कोकाटे यांच्यासोबत दुचाकी (एमएच. १५, एच. डी. ५०९२) ने खासदार राजाभाऊ वाजे यांच्या कार्यालयात भेट देण्यासाठी जात होत्या. सिन्नर विश्रामगृहाजवळ आल्यानंतर संगमनेर नाक्याकडून त्यांच्या पाठीमागून दुचाकीवरून आलेले दोन भामटे त्यांच्या दुचाकीजवळ आले. काही कळण्याच्या आता दुचाकीवर पाठीमागे बसलेल्याने सिंधुबाई यांच्या गळ्यातील अडीच तोळ्यांची पोत हिसकावली. सिंधुबाई यांनी प्रतिकार केला असता चोरट्यांनी त्यांच्या हाताला झटका देत मारुती मंदिरासमोरून घोटी महामार्गाने सुसाट वेगात पळ काढला.

याप्रकरणी सिंधू कोकाटे यांच्या फिर्यादीवरून सिन्नर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास उपनिरीक्षक टकले करत आहेत.

**ग्रामपंचायत भोकणी, ता. सिन्नर, जि. नाशिक**

**फटाके (शोभेची दारू) विरहीत दिवाळी साजरी करणेबाबत**

## जाहीर आवाहन

भोकणी गावातील तमाम नागरिकांना सुचित करण्यात येते की, शासनाचे पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांचे निसर्गाशी संबंधित पृथ्वी, वायु, जल, अग्नी व आकाश या पंचतत्वांवर आधारित उपाययोजना करुन शाश्वत निसर्गपुरक जीवनपध्दती अवलंबिण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून सद्यःस्थितीत मोठ्या प्रमाणात वातावरणीय बदल होत आहे. या वातावरणीय बदलाच्या अनेक कारणांपैकी हवेचे प्रदूषण हे एक महत्वाचे कारण आहे.

विविध सण / उत्सव प्रसंगी आपण वाजवित असलेल्या फटाक्यांमध्ये कार्बन व सल्फरचे प्रमाण अधिक असते. या विषारी वायुंमुळे वनस्पती, पक्षी, प्राणी व मानवजातीस हानी पोहचते. यामुळे हवेतील प्रदुषण थांबविण्याची क्रिया प्रत्येक सुजाण व जागरुक नागरिकाने स्वतः पासून सुरु करणे आवश्यक आहे. यासाठी सदरचे माझी वसुंधरा अभियान अंतर्गत येणाऱ्या पंचतत्वांपैकी वायुचे प्रदुषण थांबविण्यासाठी भोकणी गावातील सर्व नागरिकांना, आपण फटाके वाजवू नयेत असे विनंतीपूर्वक आवाहन करण्यात येत आहे.

तरी येणारी दिवाळी प्रदुषणमुक्त व पर्यावरणपुरक म्हणून साजरी करुयात. तसेच ही दिवाळी सुरक्षित व आनंददायी जावो अशा सर्वांना शुभेच्छा.

**सही/-**
**अरुण वाघ, सरपंच**

**सही/-**
**योगेश रहाणे, ग्रामविकास अधिकारी**

**ग्रामपंचायत भोकणी, ता. सिन्नर, जि. नाशिक**

## पेठरोड भागात मुलीचा विनयभंग

**नाशिक : दूध घेवून घराकडे परतणाऱ्या अल्पवयीन मुलीची वाट अडवित एकाने भररस्त्यात विनयभंग केल्याची घटना पेठरोड भागात घडली.**

प्रेमसंबधास नकार दिल्याने हा प्रकार घडला असून याप्रकरणी पंचवटी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नरेश शंकर बाबर (रा. फुलेनगर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या युवकाचे नाव आहे. अल्पवयीन पीडीता गुरूवारी (दि.२४) सायंकाळच्या सुमारास पेठरोडवरील पाटा जवळ असलेल्या गण्याच्या गोठ्यात दूध खरेदी करण्यासाठी गेली होती. दूध घेवून ती आपल्या घराकडे पायी जात असतांना फुलेनगर येथील नवजीवन हॉस्पिटल भागात संशयिताने तिला गाठून हे कृत्य केले. भररस्त्यात वाट अडवित संशयिताने तू मला आवडतेस माझ्याबरोबर लग्न कर असा तगादा लावला. यावेळी मुलीने लग्नास नकार देत आपल्या आजीकडे तुझी तक्रार करेल अशी धमकी दिल्याने संतप्त युवकाने जीवे मारण्याची धमकी देत तिच्याशी अंगलट करीत विनयभंग केला.

निवडणूक निर्णय अधिकारी, दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अकोला, जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, अकोला यांचे कार्यालय, तोष्णीवाल ले-आऊट मूर्तीजापूर रोड, अकोला

Email ID-dycolvpakola@gmail.com — Website- http://akola.nic.in

क्र कक्ष 19 दि. अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक / निवडणूक/कावि-01/2024 — दिनांक: 23/10/2024

## दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., (मल्टिस्टेट शेड्युल्ड बँक) संचालक मंडळ निवडणूक कार्यक्रम (2024-2029)

## सर्वसाधारण सभेची सूचना

बहु राज्य सहकारी संस्था अधिनियम, 2002 च्या कलम 45 K(1) बहु राज्य सहकारी संस्था नियम 19 F (a) द्वारे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून सहकारी निवडणूक प्राधिकरणाने, दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि, अकोला च्या सन 2024-2029 या कालावधीच्या संचालक मंडळाची निवडणुक घेण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, अकोला यांची नियुक्ती केली आहे.

त्यानुसार मी अजित कुंभार, निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, अकोला बहु राज्य सहकारी संस्था नियम, 2002 च्या नियम 19 (H) (4) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून याद्वारे दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अकोला चे संचालक मंडळाच्या सदस्यांची निवडणुक घेण्यासाठी सर्व साधारण सभा दिनांक **08.12.2024 रविवार रोजी सकाळी 8.00 वाजता वर्धमान भवन, जुने एस.पी. ऑफीस जवळ, अकोला ता. जि. अकोला** (महाराष्ट्र) येथे संचालक मंडळ सदस्यांच्या निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यन्त खालील विषयाकरिता आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

### बैठकीची विषयपत्रिका

1. निवडणुकीद्वारे 2024-2029 या कालावधीसाठी एकूण 17 मंडळ सदस्यांची निवड करणे.
2. उपविधी क्रं. 33 नुसार मतदार संघ

| मतदार संघ | निवडून द्यावयाचे सदस्य |
|---|---|
| 1. सर्वसाधारण | 10 |
| 2. शाखाप्रतिनिधी (बँकेच्या मुख्यालयापासून 25 कि. मी. पेक्षा जास्त अंतरावरील शाखेच्या कार्यक्षेत्रात वास्तव्यास असणाऱ्या सभासदांमधून) | 04 |
| 3. महिला प्रतिनिधी | 02 |
| 4. मागासवर्गीय प्रतिनिधी (अनुसूचीत जाती/जमाती) | 01 |
| | 17 |

**3. संचालक मंडळाच्या सदस्यांचा निवडणुक कार्यक्रम खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | तपशील | तारीख | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1. | मतदानास पात्र असलेल्या सदस्यांच्या तात्पुरत्या यादीच प्रकाशन | 14 नोव्हेंबर 2024 (गुरुवार) | सकाळी 11.00 वाजता | बँकेचे मुख्य कार्यालय, अकोला आणि बँकेच्या सर्व शाखा कार्यालयामधे |
| 2. | तात्पुरत्या यादीवर आक्षेप (असल्यास) मांडण्याची वेळ | 16 नोव्हेंबर 2024 ते 19 नोव्हेंबर 2024 (शनिवार ते मंगळवार) | सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 पर्यन्त (प्रत्येक दिवस) | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला |
| 3. | तात्पुरत्या यादीवरील आलेल्या आक्षेपाची छाननी (असल्यास) | 20 नोव्हेंबर 2024 ते 23 नोव्हेंबर 2024 (बुधवार ते शनिवार) | सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 पर्यन्त (प्रत्येक दिवस) | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला |
| 4. | मतदानासाठी पात्र असलेल्या सदस्यांच्या अंतिम यादीचे प्रकाशन | 25 नोव्हेंबर 2024 (सोमवार) | सकाळी 11.00 वाजता | बँकेचे मुख्य कार्यालय, अकोला आणि बँकेच्या सर्व शाखा कार्यालयामधे |
| 5. | नामनिर्देशन पत्र देणे व स्वीकारणे | 26 नोव्हेंबर 2024 ते 29 नोव्हेंबर 2024 (मंगळवार ते शुक्रवार) | सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 पर्यन्त (प्रत्येक दिवस) | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला |
| 6. | प्राप्त झालेल्या नामर्निर्देशन पत्र नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणे. | 29 नोव्हेंबर 2024 (शुक्रवार) | सायंकाळी 5.00 वाजता | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला |
| 7. | प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी | 30 नोव्हेंबर 2024 (शनिवार) | सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 पर्यन्त | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला |
| 8. | वैध नामर्निर्देशन पत्राची प्रसिध्दी करणे. | 30 नोव्हेंबर 2024 (शनिवार) | सायंकाळी 5.00 वाजता | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला |
| 9. | नामनिर्देशन पत्रे मागे घेणे | 02 डिसेंबर 2024 (सोमवार) | सकाळी 11.00 ते दुपारी 4.00 पर्यन्त | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला |
| 10. | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या अंतिम यादीची प्रसिध्दी करणे. | 02 डिसेंबर 2024 (सोमवार) | सायंकाळी 5.00 वाजता | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला |
| 11. | आवश्यक असल्यास मतदानाची तारीख | 08 डिसेंबर 2024 (रविवार) | सकाळी 8.00 ते सायंकाळी 4.00 पर्यन्त | वेळेवर जाहीर करण्यात येईल |
| 12. | मतमोजणी | 11 डिसेंबर 2024 (बुधवार) | सकाळी 08.00 ते मतमोजणी संपेपर्यन्त (सतत) | वर्धमान भवन, जुने एस.पी. ऑफीस जवळ, अकोला |
| 13. | संचालक मंडळ निकालाची घोषणा | 13 डिसेंबर 2024 (शुक्रवार) | सहकारी निवडणूक प्राधिकरण नवी दिल्ली यांचे मंजुरीनंतर | वर्धमान भवन, जुने एस.पी. ऑफीस जवळ, अकोला |

**टिप:-**

1) निवडणूक लढविणारा उमेदवार हा मल्टिस्टेट को ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट व रूल्स 2002, तसेच बँकेच्या उपविधि, निवडणूक नियमानुसार पात्रता धारण करणारा असावा.

i) संचालक पदाकरिता निवडणूकीमध्ये उभे राहणा-या इच्छुक सभासदाचे (उमेदवाराचे) नाव मतदार यादीमध्ये असणे आवश्यक आहे.

ii) बँकेच्या उपविधी क्रं. 34 (ए) (ओ) अन्वये ज्या वर्षामध्ये निवडणूक होत आहे त्या अगोदरच्या वर्षाच्या 31 मार्च रोजी सतत 2 वर्षापासून सभासदाचे नावाने बँकेमध्ये बिन बोज्याची मुदत ठेव

a) सर्व साधारण वर्गासाठी रु. 10,000/-/-

b) महिला प्रवर्गासाठी रु. 5000/- व

c) अनु. जाती/अनु. जमाती प्रवर्गासाठी रु. 5000/- असणे आवश्यक आहे. याबाबत चा पुरावा नामनिर्देशन पत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.

(iii) 1) वैयक्तिक सभासद हा कायदा/नियम आणि बँकेचे उपविधी व निवडणूक नियमामधील तरतुदीनुसार अपात्र नसावा.

2) नामनिर्देशन अर्ज, निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात निःशुल्क मिळतील. त्यासाठी नियमानुसार अर्ज द्यावा लागेल व सदर अर्जात ज्या मतदार संघातून अर्ज भरावयाचा आहे तो नमूद करावा,

3) ज्या मतदार संघातून उमेदवारास उभे रहावयाचे आहे त्या मतदार संघाचे नाव स्पष्टपणे नामनिर्देशन पत्रावर नमूद करणे आवश्यक आहे.

4) अनुसूचीत जाती/जमाती मतदार संघातील उमेदवारांना नामनिर्देशन पत्रासोबत सक्षम अधिकाऱ्याचे संबंधित प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

5) दाखल करण्यात येणाऱ्या नामनिर्देशन पत्रासोबत रु. 5000/- अनामत ठेव जमा करणे आवश्यक आहे.

6) मतदानाचे ठिकाण अकोला, कारंजा, मंगरुळपिर, बाळापुर, मूर्तीजापूर, हिवरखेड, आकोट, मालेगाव, वाडेगाव, तेल्हारा, नागपुर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, दर्यापूर, मुंबई, चंद्रपुर, वर्धा, नांदेड, छ. संभाजीनगर, नाशिक, मतदान केंद्रे नंतर प्रसिद्ध करण्यात येतील.

7) पात्र सभासद/मतदारांची अद्यावत यादी या कार्यालयाच्या, बँकेचे मुख्य कार्यालय व सर्व शाखांच्या नोटिस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल.

8) सार्वजनिक/शासकिय/निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट अंतर्गत सुट्ट्या वगळून इतर दिवस कामकाजाचे दिवस समजावे.

9) बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, 2002 च्या कलम 39 (1) (O) नुसार निवडणुक प्रक्रिया सर्व साधारण सभेत घेण्यात येणार आहे, जेणेकरून सभासद मतदारांना मतदान करणे सोईचे होईल. मतदान केलेल्या सभासदांची उपस्थिती ही सर्व साधारण सभेची उपस्थिती मानली जाईल.

10) बँकेच्या सर्व पात्र मतदारांनी एकूण 17 संचालकांच्या पदासाठी मतदान करायचे आहे.

11) मतदारांनी येतांना फोटो ओळखपत्र (सार्वत्रिक निवडणुकीसाठी लागू असलेल्या पैकी एक) सोबत आणणे बंधनकारक राहील.

12) काही अपरिहार्य कारणास्तव जाहीर झालेल्या निवडणुक कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार निवडणुक निर्णय अधिकाऱ्यास राहील.

13) दि. 08.12.2024 रोजीच्या निवडणुकीबाबतची सूचना सर्व पात्र सभासदांना त्यांचे नोंदणी झालेल्या पत्त्यावर पाठविण्यात येत आहे.

### पदाधिकारी निवडणुकीचा कार्यक्रम

**स्थळ:- बँकेचे मुख्य कार्यालय अकोला**

| | | |
|---|---|---|
| 1. | पदाधिकारी निवडणुकीचे वेळापत्रक<br>I) नामनिर्देशन पत्र सादर करणे<br>ii) नामनिर्देशन पत्र मागे घेणे<br>iii) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराची यादी प्रकाशित करणे | 16 डिसेंबर 2024 (सोमवार)<br>सकाळी 11.00 ते 12.00<br>दुपारी 12.00 ते 1.00<br>दुपारी 1.00 ते 2.00 |
| | नव्याने स्थापन्न झालेल्या मंडळाची बैठक आणि वैध नामांकनाच्या यादीचे प्रकाशन, मतदान (आवश्यक असल्यास) | 18 डिसेंबर 2024 (बुधवार) सकाळी 11.00 पासून |
| | पदाधिकारी निवडीचा निकाल जाहीर करणे | सहकारी निवडणूक आयोग नवि दिल्ली यांचे मंजुरीनंतर (Format 19N मध्ये) |

दिनांक : 23/10/2024

ठिकाण अकोला

सही/-

**(अजित कुंभार, भा. प्र. से.)**

निवडणूक निर्णय अधिकारी दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अकोला तथा जिल्हाधिकारी, अकोला

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

■ gavakari.in ■ gavkarinews.com

■ नाशिक, मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर २०२४




सिन्नरला अखंड मराठा समाज, मराठा सोयरीक संस्थेचा वधू-वर मेळावा
पान ७



बाजार समितीच्या उपसभापतींची सोनसाखळी खेचली
पान ६

■ वैभव आढाव



उठा उठा दिवाळी आली..
नवचैतन्याची पहाट आली

# धनत्रयोदशीने बाजारात चैतन्य; सोने चांदीसह भांडी खरेदी

**नाशिक : प्रतिनिधी**
**आज धनत्रयोदशी(दि.२९) साजरी होत आहे.धनतेरस जमके बरस असे म्हटले जाते. या दिवशी देवी लक्ष्मी, भगवान धन्वंतरी, आयुर्वेदाचे जनक आणि भगवान कुबेर यांचे पूजन केले जाते. धनत्रयोदशीच्या दिवशी नवीन वस्तू खरेदी करण्याची परंपरा आहे. ग्राहक या दिवशी सोने, चांदी आणि भांडी खरेदी करतात. या वस्तू खरेदी करणे शुभ मानले जाते. धनत्रयोदशीला धनाची, धणे यांचीही पूजा करण्यात येते. या दिवशी दान करण्याचे महत्व असल्याने वस्तु,कपडे,लोखंडाचे दान केले जाते.**

- **चोख सोने ७८ हजार ६०० अधिक ३ टक्के जीएसटी**
- **२२ कॅरेट ७२ हजार ३१० अधिक ३ टक्के जीएसटी**
- **चांदीचा भाव ९७ हजार ५०० अधिक ३ टक्के जीएसटी**

तिमिराकडून तेजाकडे जाणाऱ्या प्रकाशपर्वाला सुरूवात झाली असून, भगवान धन्वंतरीच्या पूजनाने मंगल आरोग्याचे दान मागण्यात येणार आहे. त्यानंतर लक्ष्मीपूजन,पाडवा आणि भाऊबीजेचा सण साजरा करण्यात येणार आहे. त्यासाठी सज्जता झाली असून, सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठा गजबजल्या आहेत.

वर्षभरातील महत्वाचा आणि आनंदाचा सण दिवाळी देशभर साजरा होत आहे. सणाचा उत्साह रस्त्या रस्त्याहून दिसून येत आहे. लायटींग, आकाशकंदील, अंगणात रांगोळी, पणत्या यांनी सजलेले अंगण त्याचबरोबर दीपपर्वाच्या स्वागतासाठी बाजारपेठा उजळून निघाल्या आहेत.

सराफबाजार, भांडीबाजार आणि लक्ष्मीपूजनचे पुजा साहित्य, झाडू, गृहोपयोगी वस्तु घेण्यासाठी ग्राहकांची गर्दी झाली होती. नवीन कपडे, नवीन वस्तु, फर्निचर, गृहसजावटीच्या वस्तु, पूजेचे साहित्य, वाहन, मोबाइल, इलेक्ट्रॉनिक्स वस्तु आदींसह बाजापेठांमध्ये रेलचेल दिसून येत आहे. शहरातील मेनरोड, शालीमार, रविवार कारंजा, पंचवटी आदी ठिकाणी ग्राहकांनी रस्ते गजबजून गेले होते. कपडे, आकाशकंदील, पणत्या प्रसाद, रांगोळी आदींची खरेदी जोरदार होत असल्याचे चित्र होते. धनत्रयोदशीला इलेक्ट्रॉनिक्स वस्तु खरेदी करण्यासाठी ग्राहकांची गर्दी झाली होती.



❛ सोन्याचे, चांदीचे भाव जरी वाढलेले असतील तरी दागिने, चोख सोन्याला मागणी प्रचंड आहे.ग्राहकांमध्ये उत्सवाचे वातावरण आहे.लग्नसराई येत्या काळात आहे. गुंतवणूक आणि सणसमारंभ, लग्नसराई आदी कारणास्तव सोन्याला मागणी चांगली असल्याने सराफ व्यावसायीकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

**- मयूर शहाणे,** संचालक मयूर अलंकार

## सोने ऐंशी हजार पार, लाखाची चांदी

### भाववाढ होवूनही खरेदीला बाजारात उधाण

**नाशिक : प्रतिनिधी**
**प्रकाशपर्वाला सुरूवात झाली आहे. धनत्रयोदशीच्या मुहुर्तावर (दि.२९) सोने चांदी, नाणी, दागिने, देवाच्या मूर्ती, पुजेची भांडी,दिवा,निरांजन आदी खरेदी केली जाणार आहे. धनत्रयोदशीला धनाची पूजा केली जाते. या मुहुर्तावर सोनेचांदी खरेदीला विशेष महत्व असल्याने आपआपल्या कुवतीनुसार खरेदी करण्यात येते.**



सोने दर २४ कॅरेट ८० हजार ८०० आणि २२ कॅरेट ७४ हजार प्रतिदहा ग्रॅम आहे. चांदी एक लाख रुपये प्रति किलो असे दर जीएसटीसह आहेत. शहर आणि उपनगरातील सराफबाजारांना झळाळी प्राप्त झाली असून, धनत्रयोदशीच्या अगोदरच सोन्याचांदीच्या दरात भाववाढ झाली असूनही मागणीत फरक पडलेला नाही. सोन्याची चोख नाणी, वेढे, दागिने आदीना ग्राहकांची पसंती मिळत आहे. चांदीचे देव, भांडी, दागिने, पूजेचे उपकरणे आदी खरेदीस ग्राहक प्राधान्य देत आहेत. धनत्रयोदशीच्या मुहुर्तावर खरेदी करणे शुभ मानले जात असल्याने यामुहुर्तावर सोने चांदीची खरेदी आर्वजून करण्यात आली.सोने चांदी दरात घसरण झाल्याने ग्राहकांनी खरेदीचा आंनद लुटत धनतेरस जमके बरस यासाजेशी साजरी केली. गेल्या वर्षी चांदीने ७१ हजार ५०० रुपये प्रतिकिलो दर गाठला होता. यंदा एक लाखांवर चांदी दर पोहचले आहेत. अनेक छोट्या मोठ्या चांदीच्या वस्तुही महागल्या आहेत..



❛ युद्धजन्य परिस्थितीमुळे सोने चांदी दरात भाववाढ झालेली आहे. चांदीचा वापर उद्योंगामध्ये वाढल्याने चांदीनेही लाख रूपयांचा टप्पा गाठला आहे.लग्नसराई आणि गुंतवणूक म्हणून मुहुर्तावर खरेदीस ग्राहक गर्दी करीत आहे. आज धनत्रयोदशीला सोने, चांदीची नाणी, पुजेची भांडी आदी खरेदी केली जात आहे.

**- गिरीष नवसे,** संचालक नवसे अलंकार. अध्यक्ष नाशिक सराफअसोशिएशन

महत्त्वाचे



## महाराष्ट्र स्वराज्य पक्ष व परिवर्तन महाशक्तीकडून विनोद गवळी यांना उमेदवारी जाहीर

**नाशिक : वार्ताहर**
नाशिक जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या देवळाली विधानसभा मतदारसंघातून विनोद गवळी यांना महाराष्ट्र स्वराज्य पक्षाकडून उमेदवारी जाहीर झाली आहे. उमेदवारी जाहीर झाल्याचे पत्र महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या वतीने देण्यात आले आहे. विनोद गवळी हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार या पक्षाकडून इच्छुक होते. राष्ट्रवादी काँग्रेस कडून त्यांच्या उमेदवारीवर जवळपास शिक्कामोर्तब झाला होता. मात्र ऐनवेळी ठाकरे गटाने ती जागा आपल्याकडे घेतल्याने गवळी यांची संधी हुकली होती. विनोद गवळी यांच्या एन्ट्रीने देवळालीतील लढत आता रंगणार असून महायुतीकडून विद्यमान आमदार सरोज अहिरे तर महाविकास आघाडी कडून माजी आमदार योगेश घोलप हे आपले राजकीय भवितव्य आजमावत आहेत. यंदा तगडी फाईट होण्याचे चित्र देवळाली विधानसभा मतदारसंघात दिसत आहे. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यासमोर विनोद गवळी यांचे मोठे आव्हान असणार आहे. उमेदवारी जाहीर होताच विनोद गवळी यांच्या समर्थकांनी त्यांच्या घरासमोर फटाके वाजवून आनंदोत्सव साजरा केला.गवळी समर्थकांनी करू किंवा मरू..! पण विनोद गवळी यांना आमदार करू अशी शपथच घेतली आहे.

## अमिषा आनंद ब्रम्हेचाचे अंतरंग पेंटिंग्ज प्रदर्शन

नाशिक : प्रतिनिधी
नाशिकची नवोदित कलाकार अमिषा आनंद ब्रम्हेचा हिच्या अंतरंग पेंटिंग्ज प्रदर्शन कलानिकेतन हॉल, गुरुदक्षिणा, कॉलेज रोड येथे शुक्रवार दिनांक २५ ऑक्टोबर रोजी आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अक्रॅलिक कलर, चारकोल, पेन्सिल स्केच, ऑइल कलर, मिक्स मीडिया, एप्सट्रेक या प्रकारातील अमिषा ब्रम्हेचा यांनी बनविलेल्या ७० च्या वर कलाकृती प्रदर्शित केल्या होत्या. दिवसभरात शहरातील कलाप्रेमी, आर्किटेक्ट, इंटिरियर डिझायनर्स, कला विद्यार्थी व मान्यवरांनी मोठ्या प्रमाणावर हजेरी लावून कलाकृतींना दाद देऊन प्रतिसाद दिला. अमिषा ब्रम्हेचा या नवोदित कलाकाराचे शिक्षण चित्रकला महाविद्यालय नाशिक व नागपूर येथे झाले आहे.

# दिनकर पाटील यांच्याकडून शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल

### मनसेच्या अंकुश पवार, प्रसाद सानप यांचे अर्ज दाखल

**नाशिक : प्रतिनिधी**
**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे नाशकात मोठे शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. नाशिक पश्चिम विधानसभा मतदार संघातून मनसेचे नाशिक पश्चिम मतदार संघाचे अधिकृत उमेदवार दिनकर पाटील यांनी पश्चिम मतदार संघातून रॅली काढत गोल्फ क्लब येथे मनसैनिकांना एकत्रित करत मोठे शक्तीप्रदर्शन केले. त्यानंतर सीबीएसपर्यंत रॅली काढत मनसेच्या दिनकर पाटील यांनी शक्ती प्रदर्शन केले.**

ठिकठिकाणी त्यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात येत होती. यावेळी डॉ. प्रदीप पवार, अतुल चांडक, सलीम शेख, सुदाम कोंबडे, अंकुश पवार, मोहिनी जाधव, प्रसाद सानप, योगेश शेवरे रतनकुमार इचम, सचिन सिन्हा, संदीप दोंदे, धीरज भोसले आदी महाराष्ट्र नवनिर्माण सैनिक यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला.

माझा विजय निश्चित आहे. लढाई जनतेने हातात घेतलेली आहे म्हणून शंभर टक्के नाशिक पश्चिम मतदार संघातून मी विजयी होईल. आ. सीमा हिरे यांनी गेल्या दहा वर्षात मतदार संघात कोणतेही विकास काम केले नाही. मतदारसंघाचा कायापालट करण्यासाठी मतदारसंघात नवीन उद्योग आणण्यासाठी मला निवडून यायचे आहे. तसेच मतदार संघातील वाढती गुन्हेगारी नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न करणार आहे. नाशिककर मतदार पुन्हा एकदा राज ठाकरे आणि मनसेवर विश्वास दाखवतील याची खात्री असल्याचे ही दिनकर पाटील म्हणाले.

दिनकर पाटील यांच्या रॅलीत पुरूषांसह महिलांचाही मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. या रॅलीत राज ठाकरे व अमित ठाकरे यांच्या कटआऊट केलेल्या फोटोंनी चांगलेच लक्ष वेधले.







## मध्य आणि पूर्वमधूनही मनसे उमेदवारांचे अर्ज दाखल

नाशिक मध्य मतदार संघातून मनसेकडून अंकुश पवार यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांनी ही अर्ज दाखल केला. तर नाशिक पूर्व मतदार संघातून प्रसाद सानप यांना मनसेकडून उमेदवारी देण्यात आली. त्यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मनसेच्या उमेदवारांनी रॅली काढून मोठ्या प्रमाणात शक्तिप्रदर्शन केले. त्यामुळे यात्रेचे स्वरुप आले होते.



## दादा भुसे यांनी मालेगाव बाह्य मतदार संघातून दाखल केला उमेदवारी अर्ज

**नाशिक : प्रतिनिधी**
**महायुतीचे मालेगाव बाह्य मतदार संघातील उमेदवार दादाजी भुसे यांनी शक्तीप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी हजारोंच्या संख्येने मालेगावची जनता रॅलीत सहभागी झाली होती. यावेळी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर जाहीर सभेत उपस्थितांशी संवाद साधताना दादा भुसे यांनी मालेगावच्या विकास कामांबाबत माहिती देत अनेक विषयांवर भाष्य केले. यावेळी शिवसेना नेते रामदासभाई कदम, शिवसेना प्रवक्त्या ज्योतीताई वाघमारे, शिवसेना सचिव सुशांत शेलार आदी मान्यवर उपस्थित होते.**

यावेळी उपस्थित शिवसेना नेते रामदास कदम म्हणाले की, मी खास कोकणातून दादा भुसे यांना शुभेच्छा देण्यासाठी याठिकाणी आलो आहे. जनसेवा कशी करता हे दादा भुसे यांच्याकडून शिकावे. स्वतः दिव्यासारखे जाळून ते स्वतः च्या मतदारसंघाला प्रकाशित करतात. ते समाजातील सर्वांना सोबत घेऊन चालतात. येणाऱ्या काळात दादा भुसे हे किमान उपमुख्यमंत्री व्हावे अशी इच्छा यावेळी रामदास कदम यांनी व्यक्त केली.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना दादाजी भुसे म्हणाले की, या निवडणुकीत आम्ही विकास कामे घेऊन जनतेच्या दारात जाणार आहोत. कृषी पंढरीचे पवित्र काम आपल्या मालेगावात झाले आहे. या मालेगावच्या विकासासाठी महायुती सरकारने कोट्यवधींचा निधी दिला आहे. येणाऱ्या काळात मालेगावच्या विकासाचा इतिहास लिहिला जाईल. शिवसेना प्रवक्त्या ज्योतीताई वाघमारे यांनी महायुती सरकारच्या कल्याणकारी योजनांची माहिती देत वाचाळवीर विरोधकांना प्रत्युत्तर दिले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आमच्या नेत्यानी हे बंड केले ते हिंदुत्व टिकवण्यासाठी केले. संविधान टिकवण्यासाठी केले. आपल्या लाडक्या बहिणींना लाभ मिळावा म्हणून केले. तरी या निवडणुकीत विरोधकांना लाडक्या बहिणीच सडेतोड उत्तर देतील, असा विश्वास व्यक्त केला.

या भव्य रॅलीला मोठ्या संख्येने मालेगावच्या जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# नाशिक पूर्व, पश्चिमधून करण गायकर यांचा अर्ज

### देवळालीतून तनुजा घोलप, इगतपुरीमधून निर्मला गावित रिंगणात

**नाशिक : प्रतिनिधी**
**मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशाने छावाचे संस्थापक अध्यक्ष आणि मराठा क्रांती मोर्चा समन्वयक करण गायकर यांनी नाशिक पश्चिम व नाशिक पूर्व मधून उमेदवारी अर्ज दाखल केला. तर इगतपुरीमधून अपक्ष निर्मला गावित आणि नाशिकरोड देवळालीतून तनुजा घोलप यांनी अर्ज दाखल केला.**

छावा क्रांतिवीर सेनेच्या संस्थापक अध्यक्ष या नात्याने नाशिक पश्चिम आणि नाशिक पूर्व मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. हे पाऊल मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशावरून उचलण्यात आले असून, मराठा समाजाच्या हक्कांसाठी आणि न्यायासाठी एक नवा संकल्प घेऊन पुढे जाण्याचा निर्धार यावेळी करण गायकर यांनी व्यक्त केला.

करण गायकर यांनी नाशिक पश्चिम व नाशिक पूर्व मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल करताना त्यांच्यासोबत मराठा समाजातील अनेक प्रतिष्ठित बांधव, तरुण कार्यकर्ते आणि समाजातील विविध घटक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या ऐतिहासिक क्षणी समाजबांधवांच्या जोशपूर्ण घोषणांनी परिसर दणाणून गेला आणि मराठा समाजाची एकजूट या घटनेतून दिसून आली.

मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाचे अनेक आंदोलन आणि न्यायाच्या लढाया करण गायकर यांनी राबवल्या आहेत. त्यांचा हा उमेदवारी अर्ज समाजाच्या न्याय आणि हक्कांच्या लढाईचे प्रतीक म्हणून पाहिले जात आहे.



उमेदवारी अर्ज भरताना छावाचे करण गायकर.



देवळाली मतदासंघातून सोमवारी अपक्ष उमेदवारी अर्ज भरताना तनुजा भोईर-घोलप

# रूटमार्चच्या माध्यमातून सिन्नर पोलिसांनी दाखवली सज्जता

**सिन्नर : प्रतिनिधी**
**विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सिन्नर पोलीस स्टेशनच्या वतीने सिन्नर शहरातून सोमवारी (दि.२८) दुपारी रुट मार्च करण्यात आला. कायदा सुव्यवस्था अबाधित राहावी, या पार्श्वभूमीवर पोलिसांनी आपले बळ रूटमार्चच्या माध्यमातून दाखवून दिले.**

सिन्नर पोलीस ठाण्याचे निरीक्षक संभाजी गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक रूपाली चव्हाण, उपनिरीक्षक सुरेश टकले यांच्यासह १६ पोलीस अंमलदार, भारत तिब्बत सीमा पोलीस दल यांचे तीन अधिकारी आणि ४६ अंमलदार शासकीय वाहनासह या संचलनात सहभागी झाले होते. दुपारी २.४५ वाजेच्या सुमारास पथसंचलनास सिन्नर पोलीस स्टेशनपासून प्रारंभ झाला.



शहरातील वैदूवाडी, गंगावेस, लाल चौक, नाशिक वेस, खासदार पूल, सरस्वती पूल, गणेश पेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, पिंप्री नाका मार्गे पोलीस स्टेशन येथे येत या पथ संचालनाचा समारोप करण्यात आला. सिन्नर विधानसभा मतदारसंघात निवडणुकी दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, त्यातून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, या अनुषंगाने पोलीस प्रशासन सज्ज असल्याचे या पथसंचलनाच्या माध्यमातून पोलिसांनी दाखवून दिले.

निवडणूक प्रक्रिया भयमुक्त व्हावी, कार्यक्षेत्रात शांतता नांदावी आणि नागरिकांना आपले मतदानाचे पवित्र कार्य निर्भयपणे आणि भयमुक्तपणे करता यावे यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असल्याचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी सांगितले.

नाशिक आज
# गांवकरी
■ नाशिक, मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर २०२४




सेन्सेक्स ३०० हून अधिक अंकांनी वाढला
पान ३



धनंजय दातार यांच्यातर्फे फुफ्फुस विकारग्रस्तांना प्राणवायू उपकरण संचांची भेट पान ३

# प्रमुख पक्षांच्या उमेदवारांकडून अर्ज दाखल

## नेत्यांचे शक्तिप्रदर्शन; वाहतूक कोंडीने सामान्य हैराण



**नाशिक : प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुकीत साठी शहरातील तीन मतदार संघातील महायुती, महाविकास आघाडी आणि मनसेसह अपक्ष उमेदवारांनी सोमवारी (दि.२८) मोठे शक्तिप्रदर्शन करत अर्ज दाखल केले.**

यात नाशिक मध्य मतदारसंघातून महायुतीमधील भाजपच्या उमेदवार देवयानी फरांदे यांनी अशोकस्तंभ ते एमजी रोड अशी भव्य रॅली काढत नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, माजी खासदार हेमंत गोडसे यांच्यासह भाजप पदाधिकारी उपस्थित होते. तर काँग्रेसच्या हेमलता पाटील यांनी देखील नाशिक मध्य मतदारसंघातून एक अपक्ष आणि एक पक्षाकडून असे दोन उमेदवारी अर्ज भरले आहेत. या मतदारसंघातून मविआकडून शिवसेना ठाकरे गटाचे वसंत गीते यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला. तर हनिफ बशीर यांनी देखील नाशिक मध्य मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. तर मनसेच्या अंकुश पवार यांनी देखील अर्ज दाखल केला.

तसेच नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघातून भाजपकडून सीमा हिरे यांनी अर्ज दाखल केला. तर याच मतदारसंघातून भाजपकडून शशिकांत जाधव बंडखोरी करत आपला उमेदवारी अर्ज भरला. त्यासोबतच मनसेचे दिनकर पाटील व माकपचे डॉ. डी. एल. कराड यांनी देखील नाशिक पश्चिम मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. त्याच प्रमाणे करण गायकर यांनी नाशिक पश्चिम व पूर्व मतदार संघातून अर्ज दाखल केला. तसेच दशरथ पाटील यांनी ही पाश्चिम मतदार संघातून अर्ज दाखल केला आहे. तर देवळाली मतदारसंघातून महायुतीमधील अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या उमेदवार सरोज आहिरे यांनी अर्ज दाखल केला. याशिवाय देवळालीतून अपक्ष उमेदवार म्हणून माजी नगरसेवक संतोष शंकर साळवे आणि माजी मंत्री बबन घोलप यांचे पुतणे रविकिरण चंद्रकांत घोलप यांनी अर्ज दाखल केला आहे. नाशिक पूर्व मतदारसंघातून भाजपचे उमेदवार राहुल ढिकले, मनसेचे उमेदवार प्रसाद सानप यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. तर इगतपुरी-त्र्यंबकेश्वर विधानसभा मतदारसंघातून माजी आमदार निर्मला गावित आणि माजी जिल्हा परिषद सदस्य कावजी ठाकरे यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे.



नाशिकपूर्वमधून अर्ज दाखल करताना महायुतीचे राहुल ढिकले.



नाशिकमध्य मधून अर्ज दाखल करताना मविआचे वसंत गिते.



नाशिक पश्चिममधून अर्ज दाखल करताना दशरथ पाटील.



नाशिकमध्य मधून अपक्ष अर्ज दाखल करताना हेमलता पाटील.
(छायाचित्रे : जगदीश सोनवणे)

### शक्तिप्रदर्शनामुळे वाहतूक कोंडी

अर्ज दाखल करण्याच्या आधी सर्वच प्रमुख पक्षाच्या उमेदवारांनी शक्तिप्रदर्शन करत रॅली काढली. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयकडे येणाऱ्या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र होते. तसेच शहरातील अनेक रस्त्यांवर इच्छुकांसोबत आलेल्या कार्यकर्त्यांनी वाहणे पार्क केल्याने इतर वाहनधारकांना गर्दीतून वाट काढणे आणि वाहने चालवणे  कठीण जात होते.

# इंडिजिनस फार्म, गंगापूररोडला वसुबारस पूजन

**नाशिक : प्रतिनिधी**

**वसुबारसच्या पवित्र दिवशी इंडिजिनस फार्म, गंगापूर रोड, नाशिक येथे गीर गायींचे पूजन अत्यंत भावपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या सोहळ्यात राष्ट्रीय गोपालरत्न पुरस्कार प्राप्त राहुल मनोहर खैरनार उपस्थित होते. ज्यांनी आपल्या अनुभवातून गायींचे महत्त्व आणि त्यांच्या संवर्धनाविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले.**



सदर पूजनाचा मान राजेश मनोहर खैरनार यांना देण्यात आला होता. त्यांनी गायींचे पूजन करून शेती, पशुधन आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी गायींच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या हस्ते गीर गायींना नमन करण्यात आले आणि शुभ्र फुलांनी त्यांचे पूजन करण्यात आले.

या पूजनाच्या माध्यमातून गायींचे संरक्षण, जैविक शेतीत त्यांचे योगदान, तसेच भारतीय संस्कृतीतील त्यांच्या महत्त्वाविषयी जनजागृती करण्यात आली.

वसुबारसच्या या मंगल प्रसंगी शेतकरी बांधवांनीही सहभाग घेतला आणि या सोहळ्याने एकता, श्रद्धा आणि गायींचे संवर्धन या मूल्यांना अधोरेखित केले.

# सागर स्वीटस् बाबतचा फेक व्हिडीओ व्हायरल

## संचालक चौधरी यांची सायबर पोलिसांत तक्रार

**नाशिक : प्रतिनिधी**

**येथील प्रसिध्द मिठाईचे दुकान सागर स्विटस बाबत व्हायरल होत असलेला व्हिडियो फेक असून, या दुकानात अशा कोणत्याही स्वरूपाची घटना घडली नसल्याचा दावा सागर स्विट्सचे संचालक दीपक चौधरी यांनी केला असून, सदर व्हिडीओ व्हायरल करणाऱ्या व्यक्ती विरोध सायबर शाखेकडे तक्रार देण्यात आली आहे.**



गत ३५ वर्षांपासून नाशिकमध्ये उत्कृष्ठ मिठाईचे दुकान म्हणून सागर स्वीटस्चा लौकीक आहे. मात्र व्हायरल व्हिडीओत एका व्यक्तीने मिठाई खरेदी करताना बॉक्स उघडून बघितला असता त्या मिठाईत किडे आढळून आले आहेत. ती घटना नाशिकच्या सागर स्वीटस्मध्ये घडल्याचा दावा या व्हिडीओत करण्यात आला आहे. ही बाब सागर स्वीटस् चे संचालक दीपक चौधरी यांच्यापर्यंत पोहचली असता त्यांनी त्वरित सायबर पोलिसात याबाबत तक्रार दाखल केली असून, हा व्हिडीओ पाच वर्षापूर्वीचा असून, तो इतर कुठल्या तरी शहरातील आहे. त्यात छेडछाड करून नाशिकच्या सागर स्विट्सची बदनामी होईल असा प्रकार करण्यात आला आहे. याबाबत चौधरी यांनी गंगापूर रोड पोलीस ठाणे व नाशिक सायबर शाखेत अज्ञात व्यक्ती विरुद्ध तक्रार दिली असून, पोलीस त्या व्यक्तीचा शोध घेत आहेत.










# संपादकीय

## आमचा वाटा कुठं हाय?

राज्यात महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात विधानसभा निवडणुकीत चुरस आहे. महायुतीत भाजपा, शिवसेना (शिंदे), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) हे तीन मुख्य पक्ष आहेत. महाविकासमध्ये काँग्रेस, शिवसेना (ठाकरे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) हे तीन मुख्य पक्ष आहेत. दोन्ही बाजूंकडे लहान लहान पक्ष आहेत. लोकसभा निवडणुकीत लहान पक्षांचा विचार दोन्ही बाजूंनी केला नव्हता. महायुतीत परभणीची एक जागा राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांना देण्यात आली होती. महाविकासमध्ये लहान पक्षांना एकही जागा मिळाली नव्हती. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीला दोन-चार जागा देण्याची तयारी करण्यात आली होती. परंतु, वंचितशी शेवटपर्यंत समझौता होऊ शकला नाही. लोकसभेची कसर विधानसभा निवडणुकीत भरुन काढण्याचा शब्द लहान पक्षांना दोन्ही बाजूंकडून देण्यात आला असावा किंवा देण्यात आलाही होता. पण, आता उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची घटका जवळ आली असताना 'आमचा वाटा कुठं हाय?' असा प्रश्न मोठ्या पक्षांना विचारण्याची वेळ लहान पक्षांवर आली आहे. महायुतीच्या जागावाटप चर्चेत लहान पक्षांना अजिबात विश्वासात घेण्यात आले नाही. महाविकास आघाडीतही तेच चित्र दिसून आले. दोन्ही मोठ्या पक्षांनी आधी आपल्या पदरात मोठे घबाड कसे पडेल, यासाठी वाटाघाटी करुन जागावाटप केले असले, तरी त्यातही काही जागांवरुन वाद संपुष्टात आलेला नाही. महाविकासमधील तीन पक्षांचा फॉर्म्युला ८५-८५-८५ वरुन ९०-९०-९० वर गेला. पण, काँग्रेसने, तर शंभरी गाठली. प्रमुख तीन पक्षांना प्रत्येकी किती जागा? या प्रश्नाचे उत्तर मिळत नाहीत. महायुतीत भाजपाने आतापर्यंत १४६ उमेदवार जाहीर केले आहेत. पण, इतर दोन पक्षांना मिळालेल्या जागांचा आकडा घोषित करण्यात आला नाही. महायुती आणि महाविकासमधील लहान पक्षांना फार मोठ्या प्रमाणात जागा नकोही आहेत. पण, जी काही अपेक्षा आहे त्यापेक्षा कमीच जागा पदरात पडतील, असे गृहीत धरुन लहान पक्षांनी आधीच जास्त जागांवर दावा केला होता. पण, त्यांच्या अपेक्षांवर पाणी पडले आहे. महायुतीत जानकर यांच्या राष्ट्रीय समाज पार्टीने ४० जागांची मागणी केली होती.

इतक्या जागा मिळणार नाहीत याची त्यांना जाणीव होतीच. पण, ४० काय चार जागाही मिळणार नाहीत, हे लक्षात आल्यानंतर जानकर यांनी महायुतीतून काढता पाय घेतला आणि स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. केंद्रीय सामाजिक न्याय विभागाचे राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आपल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियासाठी १२ ते १५ जागांची मागणी केली होती. ही मागणी नंतर ७-८ वर आली. तेथून पाचआणि शेवटी दोनवर आली. पण, आता त्यांच्या पक्षाला एकही जागा मिळणार नसल्याचे संकेत आहेत. यामुळे रामदास आठवले यांनी आपली जाहीररित्या नाराजी व्यक्त केली. त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली. पण, त्यांना कोणतेही आश्वासन मिळाले नाही. मी आणि माझ्या पक्षातले अनेक कार्यकर्ते नाराज आहेत, असे आठवले यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांना महायुतीत येण्याचे जाहीर आवतण देणाऱ्या आठवलेंना विधानसभेची एकही जागा लढवायला मिळत नसेल, तर त्यांची किती राजकीय अवेहलना महायुतीत होत आहे, हे सहजरित्या लक्षात येत आहे. इतके होऊनही आठवले महायुती सोडणार नाहीत. महायुती सोडणे म्हणजे मंत्रीपदाचा त्याग करावा लागेल. मंत्रीपद सोडण्याची त्यांची तयारी नाही. मात्र, विधान परिषद आणि महामंडळावर पक्षाला प्रतिनिधित्व मिळावे, अशी मागणी आता ते करू लागले आहेत. महायुतीची सत्ता आली, तर या मागणीचाही त्यांना पाठपुरावा करावा लागेल. महायुतीतील प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या पिपल्स रिपब्लिकन पक्षाने १५ जागांची मागणी केली होती. पण, त्यांच्या पक्षाला एकही जागा मिळणार नाही, असे चित्र आहे. जनसुराज्य शक्ती पक्षाचे आमदार विनय कोरे आगामी विधानसभेसाठी १२ ते १५ जागा मागितल्या होत्या.

त्यांच्या पक्षाला किती जागा मिळतील, हे अद्याप स्पष्ट नाही. विदर्भातील बच्चू कडू यांनी लोकसभेला वेगळी भूमिका घेतली होती. ते आता महायुतीतून बाहेर पडले आहेत. त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न झाला नाही. महायुतीतील अन्य लहान पक्षांना एका हाताच्या बोटावर मोजता येतील, त्यापेक्षाही कमी जागांची अपेक्षा आहे. पण, तेही रामभरोसे आहेत. महाविकास आघाडीतही लहान पक्षांना अशीच ट्रिटमेंट मिळत आहे. सहा जागांची मागणी करणार्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला दोनच जागा मिळत आहेत. पण, त्यावर समाधान होत नसल्याने आणखी काही जागांवर उमेदवार उभे करण्याची तयारी केली जात आहे. बारा जागांची मागणी करणारा समाजवादी पक्ष पाच जागांवर समाधानी नाही. या पक्षाने काही जागांवर आपले उमेदवार जाहीरही केले आहेत. भारतीय कम्युनिस्ट पक्षाची १२ जागांची मागणी पूर्ण होणे शक्य नाही. हा पक्षही परस्पर काही जागांवर उमेदवार उभे करण्याचा तयारीत आहे. शेतकरी कामगार पक्ष, सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष, रिपब्लिकन पक्षाचा एक गट यांची अपेक्षापूर्ती होण्याची शक्यता कमी आहे. महायुती असो की महाविकास आघाडी दोन्हीकडे सारखीच परिस्थिती आहे. लहान पक्षांची संपूर्ण राज्यात म्हणावी तितकी ताकद निश्चित नाही. मात्र, काही मतदारसंघात या पक्षांचा विशिष्ट मतदार आहे आणि तितकीच ताकदही आहे. या पक्षांना दुखावले गेले, तर काही जागांवर ते दोन्ही बाजूंकडील प्रमुख पक्षांची गणिते बिघडविण्याची शक्यता अधिक आहे. राज्यभराचा विचार केला, तर दलित आणि मुस्लिम मतदारांवर लहान पक्षांचा प्रभाव आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आणि समाजवादी पक्ष यांचा दलित आणि मुस्लिम मतदारांवर बऱ्यापैकी प्रभाव आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, वंचित बहुजन आघाडी, तिसरी आघाडी, राष्ट्रीय समाज पार्टी, बसपा असे काही पक्षांची ताकद दोन्ही बाजूंची गणिते बिघडविण्याइतपत नक्की आहे. याचा विचार करता महायुती आणि महाविकास आघाडीकडून लहान पक्षांची जी अवेहलना केली जात आहे ती महागात पडण्याची तितकीच शक्यता. शेवटी लहान पक्षांसमोर त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे.

## विचारधन



### भगवंताचे होण्यास निर्दोष असणे जरूरी आहे

भगवंताचे समाधान आम्हाला न मिळण्याचे कारण, आम्ही ज्याचे आहोत असे वाटते ते आम्हाला सोडता येत नाही; प्रपंच आम्हाला हवासा वाटतो. जगाच्या तोंडाकडे पाहून समाधान मिळेल असे आपल्याला वाटते. ही प्रपंचाची आणि जगाची आस सोडून भगवंताचे दास झाल्याशिवाय आम्हाला समाधान मिळणे कठीण आहे. हे दास्यत्व येण्यासाठी भगवंताच्या प्राप्तीची उत्कंठा आम्हाला लागणे जरूर आहे. ही उत्कंठा यावी तरी कशी ? भगवंताचे होण्यासाठी आम्ही अगदी निर्दोष असणे अवश्य आहे. हे निर्दोषपण येण्यासाठी, आपण खरोखरच जसे नाही तसे जगाला दिसू नये. मनाने नेहमी शुद्ध असावे. आपण खरोखर चांगले नाही असे आपल्याला कळत असतानासुद्धा लोक आपल्याला चांगले म्हणतात, याची आम्हाला खंत वाटणे जरूर आहे. जगात आपले वागणे असे असावे की, आपल्याविषयी दुसऱ्या कुणाला शंकाही येता कामा नये. ढोंग मुळीच करू नका. आचारविचाराने इतके पवित्र झाल्यानंतर मग आम्हाला भगवंताचे का बरे होता येणार नाही ? भगवंताचे झाल्यावर आम्हाला काळजीचे काही कारण आहे का ? आपण सर्वजण ' आम्ही भगवंताचे आहोत ' असे म्हणतो आणि काळजी करतो, हे किती विपरीत आहे ! ही प्रपंचाची काळजी नाहीशी होण्यासाठी, प्रपंचातले सर्व वैभव, धनदौलत ही आपली कर्तबगारी नसून, ती रामाच्या इच्छेने आली आहे असे आम्ही म्हटले पाहिजे. ' माझा प्रपंच तुझ्या इच्छेने चालला आहे, तू ठेवशील त्यात मी समाधानात राहीन, ' अशी आमची वृत्ती बनायला पाहिजे. यासाठी मोठे वैराग्य पाहिजे असे नाही. खरोखर, ते वैराग्य, त्याग, वगैरेंच्या भानगडीत तुम्ही पडू नका. भगवंत ठेवील त्या परिस्थितीत समाधानात राहाणे यासारखे दुसरे वैराग्य कोणतेही नाही. ज्याच्यामध्ये भगवंताचा विसर पडेल, त्याच्यावर वैराग्य करा. ज्याच्यामध्ये भगवंताची आठवण राहील, तो विवेक समजून आचरणात आणा. प्रपंच उत्तम करा, पण त्याच्या अधीन होऊ नका. अधीन होणे हे पाप आहे, प्रपंच करणे हे पाप नाही. शक्य तितके धर्माचे पालन करा; नीती प्राणाबरोबर सांभाळा; आणि प्राण गेला तरी नामाची धुगधुगी राहू द्या, इतके नाम तुम्ही सांभाळा. या तीन गोष्टी तुम्ही सांभाळा. गोंदवल्याला तुम्ही इतकी मंडळी येता, मला संकोच असा वाटतो की, इतका पैसा खर्च करून, इतक्या अडचणी सोसून, इतके कष्ट करून तुम्ही येता, तर बरोबर काय घेऊन जाता ? काहीतरी बरोबर घेऊन जाऊन आचरणात आणा. नामस्मरणात तुम्ही सगळ्यांनी राहा. नामाकरिता नाम घ्या.

# दीपावली म्हणजे आरोग्योत्सव



**दीपोत्सव**

**वैद्य विक्रांत जाधव**

दीपावली म्हणजे आरोग्यौत्सव ,दीपोत्सव तसेच त्याला खाद्यौत्सव असेही म्हणता येईल. या उत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात विविध पदार्थाची घरो घरी निर्मिती होताना दिसून येते.गोड अधिक प्रमाणात तर तिखट,आंबट खव्याचे ,दुधाचे दह्याचे असे पदार्थ जे अगोदरच्या ऋतू मध्ये निशिध्ह केले जातात ते खाण्याची सुरुवात म्हणजे दिवाळी.या पदार्थांना निर्माण करताना त्यातील घटक द्रव्याची विविधता त्या त्या स्थानिक प्रथेप्रमाणे बदलताना दिसून येते .पण आज ह्या बदला चा घटकांचा बदल हा आरोग्याला हितकारक ठरला का असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही .म्हणूनच मूळ पाककृतींचा तहातील मूळघटक द्रव्यांचा विचार करून त्यामध्ये भूमी प्रमंर योग्य बदल केल्यास आरोग्य उत्तम राहण्यास अधिक मदत होईल. अचानक निर्माण झालेले विविध विकार हे कमी होण्यास मदत होईल दीपावली हेमंत ऋतू च्या सुरुवातीला येणारी म्हणजे इसार्गाकडून ज्या ऋतू मध्ये शरीराला बळ मिळते तो ऋतू.ह्या ऋतू मध्ये अन्न पाचावणारा अग्नी वाढतो जेणे करून जडान्न पचण्यास सुकर होते ,त्याच प्रमाणे शारीरस्थ धातूंचाही अग्नी वाढून,शरीर सुदृढ होण्यास मदत होते.ऋतूच्या स्वभावाचा फायदा शास्त्रकारांनी घेऊन विविध पाककृतींची मांदियाळी आरोग्यासाठी दिली आहे. हे भारतीय आहार संस्कृतीचे वैशिष्ट्य म्हणता येईल .पौष्टिक दुध,तूप साखर उडीद ,गव्हाचे पीठ सातवा अश्या अनेक गोष्टींचा वापर अधिक केला असून दीपावलीपासून हे पदार्थ खाण्याची परंपरा जणू शेकडो वर्षापासून भारत वर्षात रूढ झालेली दिसते.प्रामुख्याने हे पदार्थ प्रतिकारक्षमता वादाव्णारे मधुर गुणाचे ,शुक्रवर्धक ,बुधीवार्धक ,धातुवार्धक ,वात नाशक ( या ऋतू मध्ये वाढणारा वातह्या मधील घटकांमुळे कमी होताना दिसतो ,काही पदार्थ शीत गुणाचे असून उष्नेतेचा त्रास कमी करणारे आहेत.गोड पदार्थां बरोबर तिखट पण नेमक्या घटकांचे पदार्थ थंडी त्रास कमी करणारे दिसतात ,हि ग्रंथकारांनी गया रक्षणार्थ रचना विविध प्रांत देशाप्रमाणे केलेली दिसते.दीपावलीतील काही मुख्य पदार्थान विषयीच्या कृती आपण पाहणार आहोत.त्यातील घटकां विषयी माहिती घेऊन दीपोत्सव आरोग्यदायी करूया.

**अनारसा**

दिवाळीच्या फराळातील एक अत्यंत बलवर्धक पदार्थ.गोल जाळीदार, चॉकलेटी रंगाचा वासाने आकर्षित करणारा बलवर्धक पदार्थ म्हणजे अनारसा. अनारसा हा पाककलेतील एक उत्तम पदार्थ आहे.अनारसा तयार करताना त्याला आणलेला रंग,त्याचे एक देखणे रूप या पदार्थाला आकर्षित करते.

**साहित्य** : जुने तांदूळ (जुने असल्यास त्याची चव आणि आकृती उत्तम होते हे ध्यानात ठेवायला हवे) गुळ, शुद्ध तूप ,खसखस, अनारसाच्याचे पीठ : तांदूळ ३ दिवस पाण्यात भिजवावे. त्यानंतर उपसून कपड्यावर सावलीत वाळवावे. हे तांदूळ थोडे ओलसर असताना दळून घ्यावे.

**कृती** : जेवढे तांदूळ घेतले असतील तेवढाच गुळ पिठात मिसळावा व १ वाटी पिठात २ चमचे शुद्ध तूप टाकावे. हे मिश्रण ३-४ दिवस ठेवावे हे इथ नंतर चांगले माळून घ्यावे या पिठाची लहानशी गोळी करून खसखशीवर फक्त बोटांनी थापावी. अनारसा खूप जाड करू नये.. अनारसानंतर तळावा.तळताना खसखस असलेली बाजू वर ठेवावी. झाऱ्यावर ठेवून तळले तरी चालेल. कधीही अनारसा उलटू नये. खसखस ही त्यातील खास आहे हे लक्षात ठेवावे.त्यावर तळताना जाळी आणण्यासाठी तुपाचा शिरकाव करावा. म्हणजे छान जाळी येते.चाळणीत ठेऊन तूप खाली निथळन्यासाठी वाट पहावी. गार झाल्यावर मस्त कडक होतो खमंग होतो. अनारशाचे पीठ भिजून मुरायला ठेवले की पित्तकर होते खरे पण नंतर साखर तुपाच्याच्या सानिध्यात ते पित्तनाशक होते.तांदळाच्या पिठात तूप टाकून नंतर गुळाच्या पाण्यात भिजवल्याने अनारसा अधिक चवदार होतो.तांदूळ,तूप ,गुळव इतर घटक द्रव्यान मुळे अनारसा थंड गुणाचा होतो,रुचकर असून स्निग्द आहे.अनारसा अस्थी धातूंना बळ देणारा असून वातनाशक आहे.हाडांमधील ठिसूळ पणा (स्त्रियांसाठी तसेच उतार वयातील इतर आजार नसल्यास हाडांच्या बळकटी साठी उत्तम) त्वचेवरील सुरकुत्यांवर तूप टाकून खाल्ल्यास अत्यंत गुणकारी आहे. मधुमेह ,स्थूल यात्क्तींनी टाळलेला बारा. अनारसा करताना त्याचे सौंदर्य ठेवण्यासाठी खसखस खूप खुबीने शास्त्रकारांनी वापरली आहे. तांदूळ भिजतठेवल्याने तो आंबतो व पित्त वादावतो पण इतर घटकांमुळे पित्ताचा नाश होतो. अनारसाच्या सौंदर्याचा विचार हजारो वर्षांपूर्वी शास्त्रकारांनी केला आहे हे विशेष. अनारसा जुलाबावरील उत्तम औषध ठरते. तसेच त्या रुग्णास तत्काळ शक्ती देते. अनारसाच्यावर पाणी टाळावे,थंडीतील वाट कमी करणारा,बाल देणारा शुक्राची वृद्धी करणारा उत्तम पदार्थ दिवाळीच्या निमित्ताने आरोग्यासाठी दिला आहे.ह्दयासाठी ह्दय रुग्णांसाठी आहे शास्त्राकारांचा अमृतरसा अनारसाच्या घराण्यातील परंतु खास ह्दय रुग्णांसाठी अत्यंत गुणकारी म्हणून वर्णना केलेला अमृत्रसा तांदुळाचे पीठ ३ भाग. तर साखर १/२ भाग व दही आणि पांढरे तीळ घालून केलेला पदार्थ म्हणजे अमृत्रसा यामध्ये तांदूळ,साखर एकत्र करून मळावे आणि त्या नन्तर पांढरे तील घालावे .ह्या मिश्रणाचे वाडे करून ते टाळावे.हे वाडे शास्त्रानुसार ह्दयाला अत्यंत हितकारक असून ह्दयाचे बाल वादावते,रक्तप्रवाह वाढवते .हे वाडे थंड गुणाचे असूनही स्निग्दातेमुळे वाट नाशक ठरते तसेच पित्त नाशक आहेत.

# दिवाळी उत्सवाचे स्वरुप काळानुरुप बदलले

**दीपावलीचा सण आपल्यास- ाठी प्राचीन काळापासून विशेष आहे. त्यातल्या अनेक परंपरा, विधी, आणि उत्साह आता,काळानुसार बदलला असला तरी, या सणाचा आत्मा अजूनही जिवंत आहे.**



**दृष्टिक्षेप**

**नीता नितीन डोंगरे**

पूर्वीच्या काळी, दीपावलीची तयारी लवकर सुरू होत असे. लोक घरांची साफसफाई करून, रंगकाम करीत. खेडोपाड्यात तर दारापुढं शेणाने सारवून घेऊन, सडा-रांगोळ्या घातल्या जात. आकाशकंदिल, पणत्या, रांगोळ्या यांची सजावट करून घराचा गाभा सुंदर केला जाई. त्या काळात लोक स्वतःच पणत्या तयार करीत असत, सुगंधी उटणे, स्नानाचे तेल, आणि गोड पदार्थांचा आनंद घेत असत. अगदी, नवरात्र सुरू झाले की तेव्हापासूनच दीपावलीची चाहूल लागलेली असायची.

ग्रामीण भागात तर, नवरात्रात पारंपरिकरित्या महाराष्ट्रातील काही ठिकाणी या उत्सवाच्या काळात दाराच्या उंबऱ्याच्या दोन्ही बाजूंना शेणाचे सैनिक बनवले जायांचे. याला सांस्कृतिक आणि धार्मिक महत्व होते ते पाळले जायचे.

शेणाचे सैनिक हे घराच्या रक्षणासाठी प्रतीकात्मक रूपात मांडले जात असत. हे सैनिक घराला वाईट शक्तींपासून संरक्षण देतात आणि नकारात्मकता दूर ठेवतात अशी ती श्रद्धा होती.

अर्थात मला वाटतं, शेणामध्ये अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असल्याने, त्यामुळे प्राचीन काळात हे आरोग्यासाठी उपयुक्त मानले गेले असावे. त्यामुळे वातावरण शुद्ध रहायचे. नवरात्रीच्या काळात देवीच्या शक्तीचे पूजन केले जाते. या प्रथेमध्ये पूर्वजांचे संस्कार आणि श्रद्धा यांचा सन्मान केला जात.

हिंदू धर्मात सणाच्या प्रत्येक विधीचा धार्मिक तसेच सांस्कृतिक दृष्टिकोनातून विशेष अर्थ आहे.

व्यापार-उद्योगाची सुरुवात 'वसुबारस' पासून केली जात असे. दिवाळीपासून हिशेबाचे संवत वर्ष सुरू व्हायचे, मग व्यापारी, धंदेवाईक लोक हिशेबाच्या वह्या, चोपड्या खरेदी करून त्याची पूजा करायचे.आणि 'पाडवा' हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा होत असे. घराबाहेर दिवे लावले जात, त्यात मातीच्या पणत्या प्रामुख्याने असत. लाडू, चकली, शेव, करंजी हे सर्व पदार्थ घरात तयार होत असत. शेजारी, मित्र-परिवार एकत्र येऊन सण साजरा करीत, परस्परांना भेटवस्तू देत असत.बालगोपाळांसाठी कथाकथन, रामायण महाभारताच्या गोष्टी ऐकणे हा एक भाग असे.

मात्र आजची दीपावली काहीशी आधुनिक झाल्याचे चित्र बघायला मिळते आजच्या काळात, बदलत्या जीवनशैलीमुळे दीपावली साजरी करण्याची पद्धत बरीच बदलली आहे. घाईगडबडीत लोक बाहेरून रेडीमेड पणत्या आणि आकाशकंदिल खरेदी करतात. गोड पदार्थ तयार करण्याऐवजी लोक त्यांचा बाहेरून रेडिमेड पदार्थ त्वरित खरेदी करतात. सोशल मीडियाच्या माध्यमातून शुभेच्छा पाठवल्या जातात आणि भेटवस्तू देण्यापेक्षा गिफ्ट कार्ड्स दिली जातात.रंगीबेरंगी लायटिंग हायलाइट असते. फटाके फोडण्याकडेही तरुणाईचे मोठे आकर्षण आहे. बहुतेक लोक फराळाचे पदार्थ बाहेरून विकत घेतात. एकमेकांना शुभेच्छा देण्यासाठी व्हॉट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम यांचा वापर होतो.गिफ्ट कार्ड्स, कुपन्स आणि ऑनलाइन शॉपिंगला प्राधान्य दिले जाते. काही अंशी नव्या युगात सणांचे महत्व कमी होताना दिसत आहे. आधुनिक जीवनशैली, ताणतणाव, आणि बदलते सामाजिक-सांस्कृतिक वातावरण यामुळे सणांचा अनुभव आणि त्याविषयीची भावना काहीशी बदलली आहे. कारण आजच्या काळात लोकांची कामाच्या ठिकाणी व्यस्तता वाढली आहे, त्यामुळे सणासाठी वेळ काढणे कठीण झाले आहे. व्यावसायिक जीवनात वाढलेल्या स्पर्धेमुळे लोकांना सुट्टी घेणे शक्य होत नाही. जागतिकीकरणामुळे परदेशी संस्कृतीचा प्रभाव वाढला आहे. त्यामुळे काही पारंपरिक सणांना ओझं वाटू लागले आहे आणि त्याऐवजी नव्या सणांकडे आकर्षण वाढले आहे. सोशल मीडियामुळे सण साजरे करण्याचे स्वरूप बदलले आहे. लोक प्रत्यक्ष भेटण्याऐवजी ऑनलाइन शुभेच्छा देतात. त्यामुळे सणांमध्ये पूर्वीची आत्मीयता कमी झाली आहे. शहरी भागात पारंपरिक सण साजरे करण्याची पद्धत कमी झाली आहे. कुटुंब विभक्त होऊन दूर राहत असल्याने सण साजरे करणे हे फक्त एक औपचारिकता वाटू लागली आहे.

खरेतर, सण हे कुटुंब आणि समाज यांना एकत्र आणण्यासाठी महत्त्वाचे असतात. मात्र, नव्या युगात सण साजरे न केल्याने सामाजिक बंधने कमी होऊ लागली आहेत. सणांच्या माध्यमातून स्थानिक उद्योगांना चालना मिळते, पण सणांचे महत्व कमी झाल्यास हे उद्योग प्रभावित होतात. सणांचे महत्व कमी झाल्यामुळे पुढील पिढ्यांना या सणांचे स्वरूप समजणे कठीण होईल, ज्यामुळे परंपरांचे संवर्धन करणे कठीण होईल. परंतु, असे म्हणता येईल की, काही लोक सणांना नव्या प्रकारे साजरे करत आहेत, जसे की पर्यावरणपूरक सण, सांस्कृतिक कार्यक्रम, आणि दानधर्म करणे. त्यामुळे सणांचे स्वरूप बदलले असले तरी त्यांचा अर्थ अजूनही जीवंत ठेवला जात आहे.

अशा प्रकारे, नव्या युगात सणांचे महत्व काही प्रमाणात कमी झाले आहे, मात्र त्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी नवीन पिढीला त्यांची महत्ता आणि गरज समजावून सांगणे आवश्यक आहे. पूर्वीच्या आणि आजच्या दीपावलीमध्ये फरक असला तरीही, हा एक उत्सवच आहे व या सणाचे महत्त्व आणि आत्मा अजूनही कायम आहे.

# इंटरनेट जीवनाच्या अविभाज्य भाग

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट आज सर्वांच्या जीवनातील अविभाज्य घटक बनला आहे. इंटरनेट शिवाय कोणी राहू शकत नाही एकवेळ माणूस अन्नापाण्याशिवाय राहील पण इंटरनेटशिवाय नाही इतकी इंटरनेट आज जीवनावश्यक गोष्ट बनली आहे. आपला इंटरनेट पॅक अचानक संपला तर आपली काय अवस्था होते हे तपासून पहा. असं कोणतेच क्षेत्र नाही जिथे इंटरनेटचा वापर होत नाही .सर्वच क्षेत्रात इंटरनेटचा वापर केला जातो म्हणूनच इंटरनेट आपल्या जीवनातील अविभाज्य भाग बनला आहे. भारतात १९९५ च्या सुमारास इंटरनेट उपलब्ध झालं. २९ ऑक्टोबर हा दिवस जागतिक इंटरनेट दिवस म्हणून मानला जातो . इंटरनेटवर पहिला संदेश पाठवला त्याला आज बरोबर ५५ वर्ष पूर्ण झाली. या ५५ वर्षात इंटरनेटमुळे जगात अनेक क्रांतिकारी बदल झाले मात्र इंटरनेटवर पहिला संदेश कसा पाठवला गेला हे पाहणे खूप मनोरंजक आहे. १९६० चा दशकात अमेरिका आणि रशिया यांच्यात शीतयुद्ध चालू होते अमेरिकन सैन्याला इंटरनेट व्यवस्था सारखी गुप्त व्यवस्था संदेशवहनासाठी हवी होती. अशी यंत्रणा स्थापन करण्यासाठी अमेरिकन संरक्षण खात्याने एका संशोधन प्रकल्पाला मोठ अर्थसहाय्य देऊन अमेरिकेतील काही विद्यापीठाकडे त्या संशोधनाचे काम सोपवल. या प्रकल्पासाठी एकूण चार संगणक अमेरिकेतील चार विद्यापीठात जोडण्यात आले. त्या चार संगणकातच जगातील पहिलं इंटरनेट होत. या चार संगणकांपैकी एक होता कोलिफॉर्निया लॉस एंजेलिस विद्यापीठात, दुसरा होता स्टॅनफोर्ड विद्यापीठात तिसरा होता सांता बार्बरा विद्यापीठात तर चौथा होता उता विद्यापीठात. एका संगणकातून दिला जाणारा संदेश इंटरनेटद्वारे दुसऱ्या संगणकात पोहचतो असे संशोधन या प्रकल्पातील तज्ज्ञांनी केले होते त्याची चाचणी या चार संगणकाद्वारे केली जाणार होती. अर्थात त्याकाळी आजच्या इतके प्रगत तंत्रज्ञान नव्हते. संगणकाचे मॉनिटर तर हिरव्याजर्द अक्षरांनी चमकणारे असत. हा दिवस माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सुवर्ण दिन ठरला. म्हणूनच २९ ऑक्टोबर हा दिवस इंटरनेटदिन म्हणून साजरा केला जातो.

**-श्याम ठाणेदार**

## जनमनाचे प्रतिध्वनी

### गणित व विज्ञानाला काहीच व्हॅल्यू नको का?

पुढील शैक्षणिक वर्षापासून अभ्यासक्रम आणि परीक्षेचे स्वरूप बदलत आहे.विद्यार्थ्यांच्या मनातील गणित आणि विज्ञान विषयाची भीती कमी करण्यासाठी उत्तीर्ण होण्याची क्षमता बदलण्यात आली आहे.आता पुढील वर्षापासून गणित व विज्ञान विषयांत ३५ ऐवजी २० गुण मिळाले की विद्यार्थ्यांना उत्तीर्ण केले जाणार आहे.म्हणजे विद्यार्थ्यांना केवळ शाळेतील अंतर्गत गुणांच्या आधारे गणित व विज्ञान विषयांत उत्तीर्ण केले जाणार आहे.जर असे होणार असेल तर शिक्षण क्षेत्रासाठी ही फार मोठी धोक्याची घंटा आहे! आरटीई एक्ट अंतर्गत पहिली ते आठवी वर्गातील विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण न करता सर्वांना उत्तीर्ण करण्याचे धोरण आणले गेले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना नापास होण्याची भीती राहिली नाही.या कारणाने विद्यार्थी अभ्यासा पासून खूप दूर गेले. शिक्षणाचा दर्जा घसरला आणि मग शासनाला जाग आली. गेल्यावर्षीपासून आठवी व पाचवी वर्गातील विद्यार्थ्यांची परीक्षा सुरू झाली आहे.या दोन वर्गातील विद्यार्थी नापास होऊ शकतात या भीतीपोटी किमान या दोन वर्गातील विद्यार्थी आता अभ्यास करणारच आहेत.हे ताजे उदाहरण असताना नवीन अभ्यासक्रम अंमलबजावणी सोबत गणित व विज्ञान विषयांत उत्तीर्ण होण्याचे निकष बदलल्याने विद्यार्थी या दोन विषयांना क्षुल्लक विषय समजू शकतात.आणि गणित व विज्ञान विषयाची आवड त्यांना राहणार नाही.गणित हा सर्व विषयांचा राजा आहे.विज्ञान विषय आपल्या सर्वांचा आत्मा आहे.साऱ्या जगाचा डोलारा या दोन विषयांत सामावला आहे. गणित व विज्ञानाशिवाय हे जग निष्क्रिय होईल.आणि हे दोन विषय वगळून शिकलेल्या शिक्षणाला व घेतलेल्या ज्ञानाला किती व्हॅल्यू राहील याची कल्पना करवत नाही.मग शासनाने आणि अभ्यासक्रम मंडळाने दोन विषयांत उत्तीर्ण होण्याचे निकष बदलल्याने या दोन विषयांना कसलीच व्हॅल्यू राहणार नाही. हे लक्षात घेऊन या निर्णयाचा फेरविचार व्हावा हीच अपेक्षा.

**- बबन दामोदर गुळवे**

### फटक्याविषयी जनजागृती वाढली

देशातील सर्वात जास्त फटाके तामीळनाडूतील शिवकाशी या गावात निर्माण केले जातात . तब्बल ११७५ कारखाने येथे फटाक्यांचे उतपादन करतात एकूण जवळपास ३ लाख लोक प्रत्यक्ष उत्पादनात गुंतले आहेत . याशिवाय ५ लाख लोकांना अप्रत्यक्ष रोजगार मिळतो . पंडित जवाहरलाल नेहरूंनी या गावाचा उल्लेख कुट्टी जपान असा केला होता .( लहान जपानच ) एवढी ख्याती या शिवकाशीची आहे . आता फटाक्यांमुळे हवेचे स्तर दूषित होत आहेत . वेगवेगळ्या कारणामुळे हवेचे प्रदूषण वाढत आहे . त्यात या फटाक्याची भर पडत आहे . दिल्ली सारख्या शहरात तर १ जानेवारी २०२५ पर्यत फटके उडविण्यावर बंदी आहे . सर्वोच्च न्यायालयाने २०१७ साली एका आदेशान्वये ही बंदी दिल्ली आणली . २०१८ मध्ये फक्त हरित फटाक्यांनी परवानगी देण्यात आली. २०20 पासून मात्र सरसकट सर्व फटाक्यांवर बंदी आणली . दिल्ली प्रमाणे अन्य काही शहरत सुद्धा बंदी आहे . कोरोना काळात फटाक्याच्या धंद्यावर मोठे संकट आले . त्यानंतर मात्र उत्पदनात गट दिसून येते . दिल्लीत घातलेली फटाक्यावरची बंदी व अन्यत्र असलेली फटाक्यावरची बंदी यामुळे फटाके उधोगावर मोठा परिणाम झाला आहे . ही माहिती नुकतीच द इंडियन फायरवर्क्स मॅन्युफॅक्टरर्स असोसिएशन चे अध्यक्ष एस श्रीराम अशोक यांनी दिली फटाके बनविताना जे अल्युमिनियम , गंधक तसेच कागदाचा वापर केला जातो . या सर्वांचे दर मोठ्या प्रमाणात वाढत आहेत . फटाक्याची बेरियमचा वापर करण्यास बंदी असल्यामुळे फुलबाज्या, भुईनळे, तसेच भुईचक्र यांच्या वापरावर परिणाम झाला आहे.असे वाटते

**- शांताराम वाघ पुणे**

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन



### तेलंगणाच्या युनिव्हर्सिटीसाठी मेइल फाउंडेशनचे २०० कोटींचे योगदान

**मुंबई :**

सध्याच्या युगात नोकरीसाठी पारंपारिक शिक्षण बरोबरच कौशल्य विकासाचे महत्व खुप आहे. तेलंगणा सरकारने यंग इंडिया स्किल युनिव्हर्सिटी ची स्थापना करून या दिशेन एक महत्वाचे पाउल उचलले आहे. मेइल फाउंडेशन, या मेघा इंजिनियरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर्स लिमिटेड च्या सामाजिक दायित्वाच्या शाखे अतंर्गत ही योजना कार्यन्वित होत आहे. हैदराबादमध्ये यंग इंडिया स्किल्स युनिव्हर्सिटी स्थापन करण्यासाठी २०० कोटी रुपयांचे योगदान मेइल फाउंडेशन देणार आहे. तेलंगणा सरकारच्या भागीदारीत विकसित होणारे हे विद्यापीठ तरुणांसाठी कौशल्य आणि उद्योजकतेचे प्रगत प्रशिक्षणाचे काम करेल. या सामंजस्य करारावर आज स्वाक्षरी करण्यात आली. यावेळेस मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी आणि मेइल चे व्यवस्थापकीय संचालक कृष्णा रेड्डी यांच्या उपस्थितीत होते. हैदराबादच्या जवळ, मीर खान पेटा येथे ५७ एकरच्या विस्तीर्ण जागेवर विद्यापीठाची उभारणी होत आहे. धखडण कॅम्पसमधील प्रमुख सुविधांमध्ये शैक्षणिक, प्रशासकीय इमारती, वाचनालय आणि संगणक कार्यशाळा, प्रयोगशाळा, विद्यार्थी आणि प्राध्यापक निवास, गेस्ट हाउस आणि तउ, रजिस्ट्रार निवास, , ७०० आसनी सभागृह आणि कॉन्फरन्स रूम इत्यादींचा समावेश आहे.

### ट्रेंडी, परवडणाऱ्या फॅशन परिधानांसह झुडिओ जळगावमध्ये दाखल

जळगाव :

आता सर्वोत्कृष्ट आणि वेगाने बदलणारे फॅशनचे प्रवाह जळगांवकरांनाही विनासायास उपलब्ध होतील आणि ते त्यांच्या आवाक्यातही येतील. कारण टाटा समूहाची सर्वांना परवडेल अशी फॅशन परिधानांची विक्री शृंखला (व्हॅल्यू रिटेल फास्ट फॅशन चेन) झुडिओने या शहरात प्रवेश केला असून, सदोबा वेअरहाऊस, तांबापुरा येथे तिचे विस्तीर्ण दालन सुरू केले आहे. झुडिओ स्टोअर फॅशनेबल परंतु परवडणारे तयार कपडे आणि क्सेसरीजच्या विस्तृत श्रेणीमुळे ग्राहकांमध्ये लोकप्रिय आहे.

आम्ही महाराष्ट्रातील समकालीन फॅशनच्या वाढत्या मागणीची पूर्तता करत आलो आहोत आणि आमच्या जळगावच्या या नव्या स्टोअरने महाराष्ट्राशी आमचे नाते अधिक घट्ट केले आहे. शैली आणि मूल्याचा परिपूर्ण समतोल असलेल्या झुडिओमधील पुरुष, स्त्रिया, किशोर आणि मुलांसाठी उपलब्ध श्रेणी तिच्या अतुलनीय किंमतीसह प्रत्येकाला आकर्षित करत आहे, असे ट्रेंट लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कार्यकारी संचालक पी. वेंकटेसलु म्हणाले.

झुडिओ आपल्या ग्राहकांसाठी ट्रेंडी फॅशनचे अतुलनीय मिश्रण प्रस्तुत करते. वेस्टर्न आणि एथनिक पोशाख, कॅज्युअल परिधाने, पादत्राणे आणि पुरुष आणि स्त्रिया दोहोंसाठी निवडीच्या नवनवीन आणि असंख्य पर्यायासह, ही नाममुद्रा १९ शहरांमध्ये ८९ स्टोअर्ससह महाराष्ट्रात आपली उपस्थिती विस्तारत चालली आहे.

### 'मनमौजी' ८ नोव्हेंबरल सर्वत्र प्रदर्शित

**मुंबई :**

मुलगी किंवा बायका न आवडणाऱ्या तरुणाच्या आयुष्यात एक नाही, तर चक्क दोन तरुणी येतात आणि त्या तरुणाचं काय होतं याची धमाल, मनोरंजक गोष्ट 'मनमौजी' या चित्रपटातून उलगडणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च नुकताच करण्यात आला असून, आतापर्यंत पोस्टर आणि टीजरमध्ये दिसलेल्या फ्रेशनेसमुळे चित्रपटाविषयी आधीच असलेलं कुतुहल आता आणखी वाढलं आहे. उत्तम स्टारकास्ट असलेला मनमौजी हा चित्रपट ८ नोव्हेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. गुलाबजाम, लॉस्ट अँड फाऊंड अशा चित्रपटांची निर्मिती केलेल्या गोल्डन गेट मोशन पिक्चर्सच्या विनोद मलगेवार यांनी मनमौजी चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन शीतल शेट्टी यांचे असून हृषिकेश जोशी यांनी संवाद लेखन केले आहे. प्रसाद भेंडे यांनी कॅमेरामन म्हणून काम पाहिले आहे. क्षितिज पटवर्धन आणि वलय मुळगुंद यांनी गीतलेखन, अमितराज आणि पंकज पडघन यांनी संगीत दिग्दर्शन केलं आहे. चित्रपटात अभिनेता भूषण पाटील अभिनेत्री सायली संजीव, सिनेसृष्टीत प्रथमच पदार्पण करणारी रिया नलावडे, जयवंत वाडकर, अरुण नलावडे, भाऊ कदम यांच्या प्रमुख भूमिका आहेत. फिल्मास्त्र स्टुडिओज ह्या चित्रपटाचे वितरक म्हणून काम पाहणार आहेत तर कार्यकारी निर्माता म्हणून संदीप काळे यांनी काम पाहिले आहे. मुलींपासून चार हात लांब राहणाऱ्या तरुणाच्या आयुष्यात दोन तरुणी येतात, त्यानंतर या तरुणाचे मुलींविषयीचे विचार बदलतात का? त्याचं प्रेम जडतं का? अशा आशयसूत्रावर मनमौजी हा चित्रपट बेतला आहे. प्रेमकथेशिवाय कथेला अनेक भावनिक पदर असल्याचंही आपल्या ट्रेलरमधून पाहायला मिळतं. उत्तम कलाकार, रंजक गोष्ट, नेत्रसुखद लोकेशन्स, श्रवणीय संगीत याचा मिलाफ मनमौजी चित्रपटातून नक्कीच अनुभवायला मिळणार आहे. चित्रपटाचा ट्रेलर निश्चितच प्रॉमिसिंग आहे. म्हणून मनमौजी अनुभव घेण्यासाठी आता ८ नोव्हेंबरला चित्रपटगृहात जावंच लागणार यात शंका नाही.




### अरिहंत अकॅडमीकडून झील अकॅडमीचे संपादन

**मुंबई :**

स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यशस्वी होण्याची महत्त्वाकांक्षा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मदतीचा हात पुढे करत अरिहंत अकॅडमी या भारतातील आघाडीच्या कोचिंग संस्थेने झील अकॅडमीच्या संपादनाची घोषणा केली आहे. या धोरणात्मक विलीनीकरणामुळे मुंबईतील विद्यार्थ्यांना उच्च-स्तरीय अध्यापन, संसाधने व वैयक्तिकृत मार्गदर्शन उपलब्ध होईल. विद्यार्थ्यांना ही बातमी ऐकून आनंद झाला आहे. अरिहंत अकॅडमीने नेहमी सर्वोत्तमतेला प्राधान्य दिले आहे, तसेच त्यांचा अनेक टॉपर्स घडवण्याचा प्रमाणित ट्रॅक रेकॉर्ड आहे. त्यांचे अनुभवी शिक्षकवर्ग, तसेच विद्यार्थी-केंद्रित दृष्टीकोनाने अनेक महत्त्वाकांक्षी विद्यार्थ्यांना त्यांची स्वप्ने साकारण्यास मदत केली आहे. आता, समाविष्ट करण्यात आलेले झील अकॅडमीचे स्थानिक कौशल्य आणि वैद्यकीय व्यावसायिकांवर फोकससह अरिहंत अकॅडमी अधिकाधिक विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजांची पूर्तता करण्यासाठी सुसज्ज आहे. अकॅडमी कोर्सेसची व्यापक श्रेणी देते, जसे इयत्ता ८वी ते १०वी साठी फाऊंडेशन कोर्सेस, इयत्ता ११वी व १२वी साठी स्पर्धात्मक परीक्षांकरिता तयारी, जेईई मेन अँड ॲडवान्स्ड आणि नीटवर फोकस. दुसरीकडे, झील आपल्या नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि आयआयटी जेईई व नीट परीक्षा तयारीमधील यशाच्या प्रमाणित ट्रॅक रेकॉर्डसाठी प्रसिद्ध आहे.

# सेन्सेक्स ३०० हून अधिक अंकांनी वाढला

**मुंबई**

आज म्हणजेच २८ ऑक्टोबर रोजी शेअर बाजारात तेजी आहे. सेन्सेक्स ३०० हून अधिक अंकांच्या वाढीसह ७९,७०० च्या पातळीवर व्यवहार करत आहे. त्याच वेळी, निफ्टीमध्ये ५० पेक्षा जास्त अंकांची वाढ होत आहे, तो २४,२५० च्या पातळीवर व्यवहार करत आहे.

सेन्सेक्समधील ३० समभागांपैकी २४ शेअर्समध्ये वाढ तर ६ शेअर्समध्ये घट दिसून येत आहे. आज बँकिंग, आयटी आणि ऊर्जा समभागांमध्ये अधिक वाढ दिसून येत आहे. आज दीपक बिल्डर्स आणि इंजिनियर्स इंडियाचे शेअर बाजारात



सूचिबद्ध होतील. याआधी शुक्रवारी म्हणजेच २५ ऑक्टोबर रोजी शेअर बाजारात घसरण पाहायला मिळाली. सेन्सेक्स ६६२ अंकांच्या (०.८३%) घसरणीसह ७९,४०२ वर बंद झाला. निफ्टी देखील २१८ अंकांनी घसरला (०.९०%), तो २४,१८० च्या पातळीवर बंद झाला. त्याच वेळी, बीएसई स्मॉल कॅप १,३०७ अंकांनी (२.४४%) घसरला आणि ५२,३३५ च्या पातळीवर बंद झाला.

# दिवाळीपूर्वी सोने चांदी स्वस्त खरेदीदारांना मोठा दिलासा

**मुंबई :**

दिवाळीपूर्वी सोन चांदी खरेदी करणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. देशाची राजधानी दिल्लीत सलग दुसऱ्या दिवशी सोने स्वस्त झाले आहे. गुरुवारनंतर शुक्रवारी सोन्याच्या दरात मोठी घसरण पाहायला मिळाली. सोन्याच्या दरात १४५० रुपयांची घसरण झाली आहे. दुसरीकडे, चांदीच्या दरातही घसरण दिसून आली आहे. चांदीच्या दरात ३००० रुपयांची घसरण दिसून आली आहे. त्यानंतर दिल्लीत चांदीचा भाव १ लाख रुपयांच्या खाली आला आहे. त्यामुळं खरेदीदारांना मोठा संधी आहे.

परदेशात झालेल्या कमी मागणीमुळं सोन्या-चांदीच्या दरात घसरण झाली आहे. सोन्याची किंमत विक्रमी पातळीपासून



१४५० रुपयांनी स्वस्त झाली आहे. दुसरीकडे, चांदीच्या दरातही घसरण दिसून आली आहे. ३००० रुपयांची ही घसरण दिसून आली आहे.

ज्वेलर्स आणि किरकोळ विक्रेत्यांच्या मंद मागणीमुळे शुक्रवारी राष्ट्रीय राजधानी दिल्लीच्या सराफा बाजारात सोन्याचा भाव १,१५० रुपयांनी घसरून ८०,०५० रुपये प्रति १० ग्रॅम झाला. याशिवाय ९९.५ टक्के शुद्धतेच्या सोन्याचा भाव ३५० रुपयांनी घसरून ८०,४५० रुपये प्रति १० ग्रॅम झाला, तर आदल्या दिवशी त्याची किंमत ८०,८०० रुपये प्रति १० ग्रॅम होती. ९९.९ टक्के शुद्धतेच्या सोन्याचा भाव १,१५० रुपयांनी घसरून ८०,०५० रुपये प्रति १० ग्रॅम झाला, तर गुरुवारी त्याची किंमत ८१,२०० रुपये प्रति १० ग्रॅम झाली.

**चांदी ९९,००० रुपये प्रति किलोवर**

दुसरीकडे, चांदीही विक्रीच्या दबावाखाली राहिली आणि २,००० रुपयांनी घसरून १ लाख रुपयांच्या खाली ९९,००० रुपये प्रति किलोवर आली. याआधी गुरुवारी चांदीचा भाव १.०१ लाख रुपये प्रति किलोवर बंद झाला होता. गेल्या दोन दिवसांत चांदीच्या दरात तीन हजार रुपयांची घसरण पाहायला मिळत आहे. गुरुवारी चांदीच्या दरात १००० रुपयांची घसरण दिसून आली. व्यापाऱ्यांनी सांगितले की, स्थानिक बाजारपेठेतील ज्वेलर्स आणि किरकोळ विक्रेत्यांची कमकुवत मागणी आणि परदेशातील बाजारातील कमजोर कल यामुळे सोन्याच्या किमतीवर परिणाम झाला.

## डाबर मेसवाकच्या ब्रँड ॲम्बेसेडरपदी नागार्जुन अक्किनेनी

**मुंबई :**

भारतातील आघाडीची विज्ञान-आधारित आयुर्वेद कंपनी डाबर इंडिया लिमिटेडने आपल्या ओरल केअर ब्रँड डाबर मेसवाकसाठी सुप्रसिद्ध दक्षिण अभिनेता आणि सुपरस्टार श्री. नागार्जुन अक्किनेनी यांची ब्रँड म्बेसेडरपदी नियुक्ती केली आहे. डाबर मेसवाकमध्ये मौखिक काळजीकरिता ७० पेक्षा जास्त फायद्यांसाठी ओळखल्या जाणा-या चमत्कारी औषधी वनस्पती मेसवाकचा शुद्ध अर्क आहे. डाबर मेसवाकचे विज्ञानाद्वारे प्रमाणित सूत्र दातांची आणि हिरड्यांची संपूर्ण काळजी घेते. ही भागीदारी नागार्जुनचे चाहते असणा-या दक्षिण भारतात डाबर मेसवाकचे स्थान आणखी मजबूत करेल. नथिंग लाइक मेसवाक' ही नवीन मोहीम लवकरच टेलिव्हिजन स्क्रीन आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रक्षेपित होईल.

या भागीदारीबद्दल बोलताना नागार्जुन अक्किनेनी यांनी सांगितले की, ज्या ब्रँडवर मी अनेक वर्षांपासून वैयक्तिकरित्या विश्वास ठेवत आहे त्या डाबर मेसवाकसोबत जोडल्याचा मला आनंद होत आहे. डाबर मेसवाक संपूर्ण मौखिक काळजी प्रदान करते. मी डाबर मेसवाकसोबतच्या या भागीदारीबद्दल आणि प्रत्येकाला मौखिक काळजी घेण्याचे रहस्य सांगण्यासाठी खूप उत्सुक आहे.

डाबर इंडिया लिमिटेडचे कार्यकारी उपाध्यक्ष-विपणन अभिषेक जुगरान म्हणाले, भारतीय ग्राहक आज त्यांच्या सिद्ध परिणामकारकता आणि घटकांमुळे नैसर्गिक उत्पादनांचा अवलंब करत आहेत. डाबर मेसवाक संपूर्ण मौखिक काळजीसाठी ओळखले जाते. यात मेसवाक ही दुर्मिळ औषधी वनस्पती आहे जी मौखिक काळजीच्या ७० पेक्षा जास्त




फायद्यांसाठी ओळखली जाते. नवीन युगातील ग्राहकांची प्राधान्ये लक्षात घेऊन डाबर मेसवाक हे व्हेगन, पेटा प्रमाणित आणि पेरोक्साईड आणि फ्लोराईडपासून मुक्त उत्पादन आहे. डाबर मेसवाकचा नवा चेहरा म्हणून नागार्जुन अक्किनेनी आमच्यासोबत जोडल्याचा आम्हाला आनंद होत आहे. आपल्या आकर्षक चवीमुळे हा ब्रँड ग्राहकांना आकर्षित करत असून विविध बाजारपेठांमध्ये याची झपाट्याने वाढ होत आहे. दरम्यान नागार्जुनच्या लोकप्रियतेमुळे मेसवाकचे बाजारातील स्थान आणखी मजबूत होईल. डाबर मेसवाककडे लोकांचे लक्ष वेधण्यासाठी आम्ही मल्टी-प्लॅटफॉर्म मार्केटिंग मोहीम राबवणार आहोत.

डाबर इंडिया लिमिटेडचे ओरल केअर विपणन प्रमुख प्रशांत अग्रवाल यांनी सांगितले की, नागार्जुन अक्किनेनी त्याच विश्वास, परंपरा आणि निरोगीपणाचे प्रतीक आहेत ज्यासाठी डाबर मेसवाक ओळखले जाते. ब्रँडसह त्यांची भागीदारी यात असणा-या चमत्कारिक औषधी वनस्पती मिसवाकचे ७० हून अधिक फायदे अधोरेखित करते. डाबर मेसवाकने टूथपेस्ट श्रेणीत झपाट्याने वाढ केली आहे आणि ही भागीदारी मेसवाकच्या फूटप्रिंटचा विस्तार करण्यासाठी आणि ओरल केअर विभागात व्यवसाय वाढीला गती देण्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे.

गॉडझिलाचे चीफ क्रिएटिव्ह श्री रविंदर सीवाच यांनी सांगितले की, इतर कोणत्याही टूथपेस्टच्या तुलनेत मेसवाकचे अनेक फायदे असून यात असलेली मेसवाक औषधी संपूर्ण मौखिक काळजी प्रदान करते. आमची नवीन मोहीम 'नथिंग लाईक मेसवॉक' हाच दृष्टिकोन अधोरेखित करते. या मोहिमेकरिता श्री नागार्जुन यांच्यासोबत काम करण्याचा अनुभव खूप छान होता. टीव्हीवरील जाहिरातीत ते एका अनोख्या अवतारात दिसतील. ही जाहिरात डाबर मेसवाकचे मौखिक काळजीचे फायदे सुंदरपणे मांडते आणि दात आणि हिरड्यांच्या काळजीबाबत ब्रँडचा दावा अधिक मजबूत करते.

## बीएफएसआयमधील रोजगार संधींमध्ये लक्षणीय वाढ

**मुंबई :**

सणासुदीच्या मोसमाचा आरंभ झाल्या-झाल्या भारतातील बँकिंग, फायनॅन्स सेवा आणि विमा (बीएफएसआय) क्षेत्र ग्राहकांचे वाढते व्यवहार आणि देवाण-घेवाण यांच्या व्यवस्थापनासाठी सज्ज झाले आहे. या धामधुमीच्या कालावधीत योग्य व्यवस्थापन करण्यासाठी आर्थिक संस्था डिजिटल बँकिंग संचालन वाढवण्यावर आणि उत्तम ग्राहक सेवा प्रदान करू शकेल असे कुशल मनुष्यबळ तयार करण्यावर लक्ष केंद्रित करत आहेत. टीमलीझ सर्व्हिसेस या अग्रगण्य स्टाफिंग समूहानुसार बीएफएसआय क्षेत्रात रोजगार संधींमध्ये लक्षणीय वृद्धी दिसत आहे, विशेषतः रिटेल लेंडिंग, मायक्रोफायनॅन्स संस्था (एमएफआय) आणि पेमेंट सेवांमध्ये.

गेल्या चार महिन्यांत वैयक्तिक तसेच दुचाकी आणि चार-चाकी वाहन कर्जांची मागणी १२%नी वाढली आहे. ही मागणी सप्टेंबरमध्ये गणेश चतुर्थीपासून सुरू होऊन नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या सणासुदीच्या खरेदीच्या मोसमाने प्रेरित आहे. त्याचा थेट परिणाम रिटेल लेंडिंग आणि एमएफआय क्षेत्रातील रोजगार संधींवर होईल आणि जुलैपासून नोव्हेंबर २०२४ पर्यंत ही वाढ १२,००० वरून १९,००० वर पोहोचेल. एमएफआय सेवांची मागणी २५% ने वाढेल, ज्यावरून आर्थिक समावेशकता आणि स्मॉल स्केल लेंडिंगवरील या क्षेत्राचा फोकस स्पष्ट दिसून येतो. शिवाय, पेमेंट सर्व्हिसेसमध्ये नोकऱ्यांचे प्रमाण ४१%नी वाढेल, तर क्रेडिट कार्ड सेगमेन्टमध्ये रोजगार संधी ३२%नी वाढतील असे अनुमान आहे. ही वाढ सणासुदीच्या मोसमात डिजिटल पेमेंट सोल्यूशन्सचा वाढता वापर आणि क्रेडिट ऑफरिंगने प्रेरित आहे. या उत्सवाचा मोसमादरम्यान बजारपेठेच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी आर्थिक संस्था केवळ आपले मनुष्यबळ वाढवीत नाही आहेत, तर वर्तमान कर्मचाऱ्यांचे कौशल्य वाढवण्यावर देखील लक्ष केंद्रित करत आहेत. टीमलीझ सर्व्हिसेसचे उपाध्यक्ष आणि व्यवसाय प्रमुख श्री. कृष्णेंदू चटर्जी म्हणाले, सणासुदीच्या काळात बीएफएसआय उद्योगांवर कामाचा मोठा ताण असतो, पण या वर्षी कुशल कर्मचाऱ्यांच्या मागणीत असामान्य वाढ दिसून येत आहे. रिटेल लेंडिंगपासून ते पेमेंट सर्व्हिसेसपर्यंत हे क्षेत्र झपाट्याने बदलते आहे आणि आमचा डेटा दर्शवितो की, या महत्त्वाच्या काळात ग्राहकांना उत्कृष्ट सेवा देण्यासाठी कंपन्या आपले मनुष्यबळ वाढवून आणि कर्मचाऱ्यांचे कौशल्य वाढवण्यावर लक्ष केंद्रित करून सद्य परिस्थितीला प्रतिसाद देत आहेत.

## मनोरंजनासाठी 'खिचडी २' झी सिनेमा वाहिनीवर

**मुंबई :**

सज्ज व्हा हास्यकल्लोळासाठी कारण 'खिचडी २' चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमिअर ह्या सणासुदीच्या दिवसांमध्ये झी सिनेमा वाहिनीवर रविवार, ३ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजता. आपल्या सर्वांच्या लाडक्या पारेख परिवाराला परत घेऊन येणारा हा चित्रपट तुमची हसून हसून पुरेवाट करण्याचे वचन देतो. 'खिचडी २' च्या विशेष पैलूंपैकी एक म्हणजे त्यांच्या देशाला वाचवण्याच्या अनपेक्षित मिशनमध्येही विनोदबुद्धी प्रदान करण्याची क्षमता. चाहत्यांना प्रफुल आणि हंसा यांच्यातील क्लासिक मजेदार संवाद, परिस्थिती विचित्रपणे हाताळण्याचा जयश्रीचा अंदाज, हिमांशुचे गुदगुल्या करणारे विनोद आणि बाबुजींची व्यंगात्मक विनोदबुद्धी - ह्या सगळ्या घटकांनी अनेक वर्षांपासून खिचडीला घराघरांत पोहोचवले.

आतिश कपाडिया लिखित व दिग्दर्शित आणि जमनादास मजेठिया निर्मित, 'खिचडी २' हा अतिशय सुंदर पद्धतीने कुटुंब, एकत्रपणा आणि त्यातील विक्षिप्त मजेदार पात्रे जेव्हा दैनंदिन आयुष्यातून आपली वाट काढत असताना निर्माण होणाऱ्या




विनोदांना टिपतो. मूळ खिचडी मालिका आणि चित्रपटांचे चाहते ह्या मनोरंजन 'सीक्वेल' मधून प्रफुल, हंसा, जयश्री आणि बाबुजी अशा त्यांच्या लाडक्या व्यक्तिरेखा जेव्हा पुन्हा एकदा एकत्र येतात तेव्हा निर्माण होणाऱ्या दुप्पट धमालीची अपेक्षा करू शकतात. अख्ख्या जगाचे लक्ष ह्या विनोदी चित्रपटाच्या दिशेने लागलेले असताना, 'खिचडी २' आपल्याला ह्या गोष्टीची आठवण करून देईल की हास्य खरोखरीच सर्वोत्तम औषध का आहे.

जमनादास मजेठिया - 'खिचडी २' हा प्रत्येक कुटुंबासाठीचा उत्सव आहे - एकता, प्रेम आणि अर्थातच हशा यांचा. हा कुटुंबांसाठीचा, कुटुंबांबद्दलचा चित्रपट आहे. खिचडीचा वारसा आणि मिळालेले प्रेम आपल्या सर्वांना माहीत आहे. हा चित्रपट या गाथेचा एक नवीन, रोमांचक अध्याय घेऊन येतो. आमचे उद्दिष्ट फक्त मनोरंजन करणे हे नव्हते तर आम्हाला काही सरप्राईज आणायचे होते. यावेळी, एक अनपेक्षित ट्विस्ट आहे कारण हे कुटुंब राष्ट्राच्या संरक्षणासाठी एका रोमांचक मिशनवर निघाले आहे. आम्ही चाहत्यांना आवडणारी विशिष्ट विनोदबुद्धी घेतली आहे आणि एक साहसी पैलूही जोडला आहे, हा केवळ हसण्याचाच दंगा नाही तर मनोरंजनाचा रोलरकोस्टर आहे. दुसरा 'नाच नाच' हा क्रम आहे. मी संपूर्ण टीमला नाचताना पाहायला खूप उत्सुक होतो, विशेषत: खिचडीमध्ये गाण्याची आणि नाचण्याची कल्पना कोणीही केली नसेल! हा चित्रपट दाखवतो की काहीही असो, हे बिनशर्त प्रेम कुटुंबांना एकत्र ठेवते आणि प्रत्येक क्षण खास बनवते. विशेषत: सणासुदीच्या काळात झी सिनेमाच्या प्रेक्षकांनी ह्या चित्रपटाचा आनंद घ्यावा यासाठी आम्ही उत्सुक आहोत. माझा विश्वास आहे की प्रत्येक घरासाठी ही दिवाळीची परिपूर्ण भेट आहे.

सुप्रिया पाठक - 'खिचडी २' ची जादू त्याच्या सत्यतेमध्ये आहे; दैनंदिन जीवनातील सुंदर गोंधळ ते प्रतिबिंबित करते. माझे पात्र हंसा तेच आहे - जीवन, विनोद आणि अर्थातच तिचे अद्वितीय आकर्षण. तिचे वय अजिबात वाढलेले नाहीये. असं म्हणतात की हंसासारख्या आनंदी लोकांचे वय वाढत नाही आणि चाहत्यांनाही ते आवडणार नाही! बऱ्याच लोकांसाठी, हे एक उत्तम तणाव निवारक आहे. हा चित्रपट आपल्या प्रियजनांसोबतच्या आपल्या नातेसंबंधांना दिलेली आदरांजली आहे, ज्यांना प्रत्येक गोष्टीचा सामना करावा लागतो - चढ-उतार, आव्हाने, आनंद आणि अगदी मिशन्सचा सामना करणाऱ्या पात्रांनी भरलेला! विनोद आणि प्रेमळपणाद्वारे, हा चित्रपट आणि हे कुटुंब आपल्याला शिकवतात की आपले एकमेकांशी असलेले नातेच आपले जीवन खरोखर चांगले बनवते.

## 'बादल पे पांव है' मालिकेत गौरव शर्माची एंट्री

**मुंबई :**



सोनी सबवरील 'बादल पे पांव है' या मालिकेत बानी (अमनदीप सिद्धू) या महत्त्वाकांक्षी आणि दृढनिश्चयी तरुणीची गोष्ट सांगितली आहे, जी आर्थिक अडचणींना तोंड देऊन आपल्या कुटुंबाचे जीवनमान उंचावण्यासाठी सतत झटत असते. मालिकेत अलीकडेच प्रेक्षकांनी पाहिले की, बानीचा पती रजत (आकाश आहुजा) याला अटक झाल्यामुळे बानी कठीण प्रसंगात अडकली आहे. त्याच्या जामिनासाठी पैसे उभे करण्यासाठी एका बेकायदेशीर व्यवहारात सामील होण्यावाचून दुसरा कोणताच पर्याय तिच्यापाशी शिल्लक राहात नाही.या सगळ्या गदारोळात एक रहस्यमय नवीन माणूस तिच्या परिचयात येतो. उत्तम अभिनेता गौरव शर्मा माहिर ढिल्लोन नामक अत्यंत हुशार वकीलाच्या भूमिकेत या मलिकेत दाखल होत आहे. नैतिकदृष्ट्या भ्रष्ट लोकांच्या पाठीशी आपण कधीच उभे राहणार नाही, हे तत्त्व जपणारा हा वकील आहे. नातेसंबंधांबद्दल त्याची मतं बरीचशी एककल्ली आहेत.स्त्रिया प्रेमाच्या नाही तर नेहमी पैशाच्याच मागे असतात असे त्याचे ठाम मत आहे. तो जेव्हा बानीला भेटतो, तेव्हा तिचा दृढनिर्धार आणि सच्चेपणा बघून तो थक्क होतो. तिचा प्रामाणिकपणा, रजतवरचे तिचे प्रेम तसेच तिची धडाडी पाहून माहिर अवैध स्टॉक व्यवहारात अडकलेल्या बानीला बाहेर काढण्यासाठी कायदेशीर मदत करण्यास तयार होतो. अशाप्रकारे माहिरने बानी आणि रजतच्या जगात प्रवेश केल्यामुळे पुढे कथानकात काही ना काही ट्विस्ट आणि संघर्ष नक्कीच असणार आहे. रजत आणि बानीच्या जीवनात लावण्याने प्रवेश केल्यानंतर त्या दोघांमध्ये झालेला संघर्ष प्रेक्षकांनी बघितला आहे.आता माहिरच्या परिचयामुळे त्या दोघांच्या जीवनात एक नवेच आव्हान असणार आहे. मी अलीकडेच या मालिकेचे शूटिंग सुरू केले आहे. येथील कलाकार आणि क्रू सदस्य यांनी खुल्या दिलाने मला स्वीकारले. मालिकेचे कथानक उलगडत जाईल, माहिरची भूमिका स्पष्ट होत जाईल तसे या मालिकेत काही तीव्र, उत्कट क्षण नक्कीच येणार आहेत!

## धनंजय दातार यांच्यातर्फे फुफ्फुस विकारग्रस्तांना प्राणवायू उपकरण संचांची भेट

**मुंबई :**

करोनाची प्राणघातक साथ मानवजातीला खूप काही शिकवून गेलीय. शरीराचे तापमान, रक्तदाब, रक्तशर्करेचे प्रमाण, हृदयाचे ठोके याप्रमाणेच आजकाल श्वासोच्छवासातील प्राणवायूच्या (ऑक्सिजन) पातळीवरही काटेकोर लक्ष ठेवणे गरजेचे बनले आहे. फुफ्फुसांच्या आजारांनी दुर्बळ रुग्णांसाठी शुद्ध प्राणवायूचा तत्काळ पुरवठा अत्यंत मोलाचा ठरत आहे आणि एका श्वासाची किंमत जगाला आता उमगू लागली आहे.

'प्रतिभा प्रभाकर पल्मोनरी



रिहॅबिलीटेशन सेंटर'च्या वतीने श्वसन संस्थेचे आरोग्य आणि प्राणवायूचे महत्त्व अधोरेखित करणारा एक कार्यक्रम नुकताच गोरेगावमध्ये आयोजित करण्यात आला. समाजोपयोगी उपक्रमांना मदतीचा हात देणारे सुप्रसिद्ध उद्योजक मसालाकिंग धनंजय दातार या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. फुफ्फुसाच्या विकाराने ग्रस्त, परंतु आर्थिक असहाय्यतेमुळे प्राणवायू पुरवठा उपकरणे खरेदी न करु शकणाऱ्या ३ गरजू रुग्णांना दातार यांनी स्वखर्चाने असे उपकरण संच भेट दिले. प्रत्येक संचात घरात हवा तेव्हा प्राणवायू पुरवठा करणारे ऑक्सिजन कॉन्संट्रेटर, घराबाहेर किंवा प्रवासात प्राणवायू पुरवणारे पोर्टेबल ऑक्सिजन मशीन व ऑक्सिमीटर या उपकरणांचा समावेश होता.

याप्रसंगी बोलताना धनंजय दातार म्हणाले, माझ्या आईच्या अखेरच्या दिवसांत ती फुफ्फुसाच्या आजाराने गलितगात्र झाली होती. श्वासोच्छवासासाठीची तिची धडपड मला बघवत नव्हती. आजही अशा आजारांनी ग्रस्त गरीब रुग्णांचे हाल मला अस्वस्थ करतात. करोना साथीच्या काळात तत्काळ प्राणवायू न मिळाल्याने अथवा वाहनाच्या अनुपलब्धतेमुळे रुग्णालयात वेळेवर पोचू न शकल्याने अनेक रुग्ण दगावले. त्यावर उपाय म्हणून मी व माझ्या समूहाने ऑक्सिजन सिलेंडरने सज्ज 'रिक्षा म्ब्युलन्स' या अभिनव उपक्रमाला आर्थिक पाठबळ पुरवले. गेल्या वर्षी आणि यंदाही पैशाअभावी प्राणवायू उपकरणे खरेदी करु न शकणाऱ्या रुग्णांना आम्ही प्राणवायू संच भेट दिले आहेत आणि यापुढेही गरीब गरजूंना अशीच मदत करत राहणार आहोत.

'प्रतिभा प्रभाकर पल्मोनरी रिहॅबिलीटेशन सेंटर'चे संस्थापक चालक डॉ. प्रल्हाद प्रभुदेसाई व त्यांच्या पत्नी वैशाली प्रभुदेसाई यांनी यावेळी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. डॉ. प्रभुदेसाई म्हणाले, आयुष्य आरोग्यपूर्ण घालवणे महत्त्वाचे असते आणि त्यासाठीच सर्वांनी आरोग्य, योग्य जीवनशैली व श्वासाचे महत्त्व ओळखणे गरजेचे आहे.

# राज्यात पुन्हा महायुतीचेच सरकार येणार

## विनोद तावडे : पत्रकारांशी साधला संवाद

**नाशिक : प्रतिनिधी**

**राज्यात महायुतीला स्पष्ट बहुमत तर मिळणार आहेच यात कोणतीही शंका नाही. तथापि, त्यापेक्षाही अधिक जागा मिळून पुन्हा राज्यात महायुतीचीच सत्ता येणार आहे. लोकसभेला विरोधकांनी फेक नरेटिव्ह सेट केले. परंतु आता विरोधकांचे फेक नरेटिव्ह चालणार नाही. असे भाजपाचे राष्ट्रीय महामंत्री विनोद तावडे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.**



खरी बातमी देण्याची व्यवस्था महायुती मीडिया सेंटर येथे होईल. असा विश्वासही विनोद तावडे म्हणाले. उत्तर महाराष्ट्र विभागीय मीडिया सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी भाजपाचे शहराध्यक्ष प्रशांत जाधव, उपाध्यक्ष पवन भगूरकर, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, महानगर प्रसिद्धी प्रमुख राहुल कुलकर्णी, प्रदेश प्रवक्ते व उत्तर महाराष्ट्र माध्यम विभाग प्रमुख गोविंद बोरसे, नाशिक पूर्वचे आमदार राहुल ढिकले आदी उपस्थित होते.

पत्रकारांना स्नेहसंवाद मेळाव्यात बोलताना तावडे यांनी नाव न घेता संजय राऊतांवर टीका केली. दररोज सकाळी कोंबड्याची बांग होते त्यानंतर इतर प्रतिक्रिया सुरू होतात. त्यामुळे वास्तव काय आहे हे कळत नाही. माध्यमांचा उपयोग करून जनतेमध्ये चुकीचा प्रसार केला जात आहे. यामुळे राजकारणाचा स्थर खाली गेला आहे तो थोपवण्यासाठी उत्तर महाराष्ट्र विभागीय मीडिया सेंटरचे उदघाटन करण्यात आले आहे.

महाराष्ट्रात एकूण१४६ उमेदवार भाजपाचे आहेत. शिवसेना राष्ट्रवादीच्या याद्या लवकरच येतील. असे सांगत महाविकास आघाडीचा समाचार घेतला. २०१९ मध्ये जागा कोणाच्या जास्त आल्यानंतर गद्दारी कोणी केली हे जनतेला माहिती असल्याचे तावडे म्हणाले. शिवसेना प्रमुखांच्या काळात अशी गद्दारी आमच्या कल्पनेतही आली नसती असे तावडे पुढे म्हणाले.मगद्दारी केली असेल तर शिवसेना प्रमुखांनी शिकविल्याप्रमाणे त्यांचा लष्कर ए तोयबा असेल तर आमचा लष्कर ए शिवबा असेल. असे तोडीस तोड उत्तर दिले पाहिजे. मुळ गद्दारी करणारे कोण होते हे जनतेला माहिती आहे.

आता एकनाथ शिंदेच्या नेतृत्वात फडणवीस, अजित पवारांच्या चांगल्या योजनां विरोधकांना खटकत आहेत.महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते शरद पवारांनीही योजनेवर टीका केली याचा अर्थच त्यांना योजना बंद करावी असे वाटते आहे. चांगल्या योजना करणारे सरकार पुन्हा २०२४ ला महाराष्ट्रातील जनता निवडून आणेल, असा विश्वास विनोद तावडे यांनी व्यक्त केला.

> निवडणूक केवळ लाडकी बहीण एकच मुद्यावर नाही तर ४० मुद्यांवर लढत असल्याचे तावडे यांनी सांगितले. नाशिकमध्ये भाजपामध्ये अनेकजण इच्छुक होते. परंतु वेळेवर त्यांना डावलण्यात आले. त्यामुळे दुसऱ्या पक्षात प्रवेश करीत निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. राजकारणात महत्त्वाकांक्षा असणे चूक नाही. मुद्यांच्या आधारे निवडणूक लढवावी. मनसेकडून लढणारे उमेवारही रिंगणात असल्याने कमीत कमी डॅमेज होईल असा विचार सुरू आहे. घराणेशाही संपूर्णपक्ष घराण्यावर सुरू आहे. घराण्याच्या हितासाठी पक्ष काम करतो असा घणाघात यावेळी तावडे यांनी केला. तावडे यांना तुम्ही नक्की कोणाच्या प्रचारासाठी येथे आलात असे विचारले असता त्यांनी सर्वच्या सर्व २८८ उमेदवारांच्या प्रचारासाठी आलो असल्याचे नमूद केले. तसेच चांदवडबाबत जागेचा प्रश्न उपस्थित केला असता त्याच चर्चेसाठी जाणार असल्याचे सांगितले. आगामी काळात महाराष्ट्रात काम करणार का या प्रश्नावर तावडे यांनी नो महाराष्ट्र ओन्ली राष्ट्र असे सांगत मराठी माणूस दिल्लीत गेला तर त्याचे पाय मागे का खेचत आहात, असा टोलाही लावला. जरांगेबाबत बोलताना मीही मराठा समाजाचा घटक असल्याचे ते म्हणाले.



# वाजवा रे...




## अपक्षांची हिंमत!

अर्ज भरताना सर्वांचीच कसरत
अनेकांनी पाहिली दुरुनच गंमत
नेत्यांना कळाली कार्यकर्त्यांची किंमत
अपक्षांनीही दाखवली त्यांचीही हिंमत
माघारीनंतरच येणार आहे खरी रंगत
मतदारराजा दाखवणार त्याची करामत

■ सर्किट

## इलेक्शन फ्लॅश



महाविकास आघाडीचे सरकार बनलं तर कोण मुख्यमंत्री....
- नाना पटोले



छत्रपती संभाजीनगर पश्चिम विधानसभा मतदारसंघात संजय शिरसाट यांचं पारडं जड पण पेपर अवघड!



'जी चूक मी केली, त्यांनीही आता तीच चूक केली'
- अजित पवार



मी प्रामाणिकपणे काम करत असताना सर्वांनी माझा घात केला. उद्धव ठाकरे माझ्यासाठी देव आहेत त्यांची मला माफी मागायची आहे.
- श्रीनिवास वणगा

# हजारो नागरिकांच्या उपस्थितीत भरला अर्ज

## दहशत मिटविण्यासाठी उमेदवारी : समीर भुजबळ

**मनमाड : प्रतिनिधी**

**नांदगाव विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना विकासाची मूलभूत हक्क देण्यासाठी तसेच गेल्या पाच वर्षाच्या कालावधी येथील लोकप्रतिनिधीने निर्माण केलेली जनतेवरील दहशत दडपशाही संपवण्यासाठी आपण उमेदवारी करत आहे. त्यासाठी आपज आशीर्वाद द्यावे असे आवाहन नांदगाव विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार माजी खासदार समीर भुजबळ यांनी केले.**

नांदगाव विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार समीर भुजबळ यांनी भव्य रॅलीद्वारे आज भयमुक्त नांदगाव प्रगत नांदगावसाठी नांदगाव येथे उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर नांदगाव शहरातील जैन धर्मशाळा येथे भव्य सभा पार पडली. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी शेखर पगार, विजय पाटील, अरुण पाटील, अमित पाटील, दिपक गोगड, रतन हलवर, राजाभाऊ खेमनार, दीपक साळवे, संतोष आहेर, संजय निकम, रवींद्र घोडेस्वार, बंडू पगार, कैलास पाटील, बाळासाहेब हिंगे, रामू नहार, विनोद शेलार, अपर्णा देशमुख, संगीता सोनवणे, अमित नाहर, गोरख जाधव, कैलास बर्डे, संपत पवार, यांच्यासह भयमुक्त नांदगाव - प्रगत नांदगाव समन्वय समितीचे सदस्य व नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

'मेरा इरादा सियासात का रुख बदलेगा, तू याद रख मेरा ये हौसला तेरा गुरुर तोडेगा' या शायरीतून समीर भुजबळ यांनी यावेळी आपल्या भाषणात विरोधकांना टोला लगावला.

### भाषण संपताच शेखर पगार यांना फोनवर शिवीगाळ

लोकशाही धडक मोर्चाचे अध्यक्ष शेखर पगार यांनी समीर भुजबळ यांना पाठिंबा जाहीर केला. नांदगाव तालुका दाहशतमुक्त करण्यासाठी आपण पाठिंबा दिला असे भाषण केलं. लगेचच आमदार सुहास कांदे यांनी त्यांना फोन करून अर्वाच्च्य भाषेत शिवीगाळ केली. पगार यांनी लागलीच तो फोन माईकसमोर पकडला. सर्व जनतेला ती शिवीगाळ ऐकवली. या कृत्यांची सर्व सोशल मीडियावर व वृत्तवाहिन्यावर जोरदार चर्चा झाली. नांदगाव तालुक्यातील प्रत्येक मोबाइलवर हा शिवीगाळचा व्हिडीओ व्हायरल झाला.

# मविआचे शक्तिप्रदर्शन; बडगुजर, गिते भरणार अर्ज

## प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, जितेंद्र आव्हाडांची उपस्थिती



**नाशिक : प्रतिनिधी**

**महायुतीने सोमवारी शक्तिप्रदर्शन करत आपल्या उमेद्वारांचे अर्ज भरले. दरम्यान त्यानंतर महाविकास आघाडी मंगळवारी (दि.२९) जोरदार शक्तिप्रदर्शन करणार आहेत. ठाकरे गटाचे नाशिक पश्चिमचे उमेदवार सुधाकर बडगुजर, देवळालीचे उमेदवार योगेश घोलप, खा. शरद पवार गटाचे नाशिक पूर्वचे उमेदवार गणेश गिते हे मंगळवारी अर्ज दाखल करणार आहे. दरम्यान यावेळी पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड हे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत.**

सिडको येथून बडगुजर व देवळाली येथून घोलप त्यांच्या समर्थकांसह भव्य रॅली काढत विरोधकांना ताकद दाखवणार आहेत. तर गणेश गितेही उमेदवारी अर्ज भरण्यापुर्वी जोरदार शक्तिप्रदर्शन करणार आहेत. त्यासाठी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व आमदार जितेंद्र आव्हाड उपस्थित राहण्याची शक्यता आहे. दरम्यान मंगळ्वारी मुख्य उमेदवारांसह अपक्ष अर्ज दाखल करणार असल्याने जिल्हाधिकारी कार्यालय आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीची शक्यता नाकारता येत नाही.

सोमवारी उमेद्वारी अर्ज भरण्यासाठी विविध पक्षाच्या नेत्यांकडून काढण्यात आलेल्या रॅलीमुळे शहरात मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र होते. मंगळ्वारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत असून दुपारी तीन वाजेपर्यत महायुतीच्या उमेदवारांना अर्ज भरता येणार आहे. सोमवारी भाजप नेते विनोद तावडे अर्ज दाखल करण्यासाठी उपस्थित होते. महाविकास आघाडीचे उमेदवार सुधाकर बडगुजर व गणेश गिते जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज भरणार आहेत. तर योगेश घोलप मुंबई नाका येथील अटल भवनात उमेदवारी अर्ज भरतील.



# सीमा हिरेंकडून अर्ज दाखल

## विनोद तावडेंच्या उपस्थितीत शक्तिप्रदर्शन

**नाशिक : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूकीसाठी नाशिक पश्चिम मधून महायुतीकडून भाजपाच्या सीमा हिरे यांनी मोठे शक्तीप्रदर्शन करत अर्ज दाखल केला. त्यांनी अर्ज दाखल करण्याच्या अधी मतदारसंघातून रॅलीही काढली होती.

या रॅलीत भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी ही हजेरी लावली होती. सिडको भागातील भोळे मंगल कार्यालयापासून रॅली काढण्यात आली होती. त्यानंतर उत्तमनगर, पवन नगर, सावता नगर, दिव्या ॲडलॅब, त्रिमुर्ती चौक यामार्गे दुर्गा मंदिरात दर्शन घेऊन रॅलीचा समारोप करण्यात आला. ठिकठिकाणी हिरे यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. तसेच महिलांनी औंक्षण करत त्यांना शुभेच्छा दिल्या. रॅलीमार्गावर महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतल्याचे चित्र होते. यावेळी महेश हिरे, रश्मी हिरे बेंडाळे, रविंद्र पाटील यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. अर्ज दाखल केल्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना सीमा हिरे म्हणाल्या, भाजपाने माझी उमेदवारी पहिल्या यादीत नाव जाहीर करून माझ्यावर विश्वास दाखवला आहे. राज्यात साडे सात वर्ष महायुतीची सत्ता होती. महायुतीने केलेले विकास कामे, सिडको फ्री होल्ड चा गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला प्रश्न आमच्या सरकारने मार्गी लावला आहे. त्यामुळे सिडकोवासियांना न्याय मिळाला आहे. नवीन उद्योग आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. जनता नक्कीच आमच्या पाठीशी उभी राहील याची मला खात्री आहे. असे सिमा हिरे म्हणाल्या.

# सरोज आहिरेंकडून उमेदवारी अर्ज दाखल

## भगूर ते पाथर्डी गावापर्यंत मिरवणुकीद्वारे शक्तिप्रदर्शन

**नाशिक : प्रतिनिधी**

**देवळाली विधानसभा मतदारसंघातून महायुतीच्या आ. सरोज आहिरे यांनी सोमवारी (दि.२८) त्यांचा उमेदवारी अर्ज भरला. तत्पूर्वी भगूर येथील रेणुका माता मंदीर ते पाथर्डी गाव येथील खंडेराव महाराज मंदिरापर्यंत भव्य मिरवणूक काढत त्यांनी शक्तिप्रदर्शन केले. दुपारी दोन वाजेच्या सुमार अटल दिव्यांग भवन येथे राष्ट्रवादीसह महायुतीतीतील पदाधिकाऱ्यांच्या उपस्थित त्यांनी उमेदवारी अर्ज भरला.**



यावेळी माजी खा. देविदास पिंगळे, निवृत्ती अरिंगळे, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष विष्णुपंत म्हैसधूने, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष राजाराम धनवटे, दिलीप थेटे, तुकाराम पेखळे, दे कॅम्प भाजप अध्यक्ष जीवन गायकवाड, भाजप तालुकाध्यक्ष अरुण खांडबहाले, नामदेव गायकर, राष्ट्रवादी विधानसभा अध्यक्ष सोमनाथ बोराडे, अंकुश भोर. आदी उपस्थित होते. देवळाली विधानसभेसाठी राष्ट्रवादी अजित पवार गटाने गेल्या आठवड्यात आ. आहिरे यांना दुसऱ्यांदा उमेद्वारी जाहीर केली. दरम्यान आ. आहिरे यांची उमेद्वारी जाहीर करुनही त्यांच्याविरोधात उमेदवाराची शोधाशोध सुरु होती. मातर उमेद्वार जाहीर होत नसल्याने यावरुन विरोधी पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये कमालीची संभ्रमावस्था आणि अस्वस्थता होती. त्यातच शरद पवार गटाने एनवेळेस अनपेक्षीतरित्या ठाकरे गटाला देवळालीची जागा देऊन टाकली. हक्काची जागा ठाकरे गटाला सोडल्याने शरद पवार गटामध्ये खळबळ माजली असून काही इच्छुक बंडखोरी करण्याच्या तयारीत आहे. त्यादुष्टीने त्यांनी तयारीही सुरु केली आहे. त्यामुळे याचा ठाकरे गटाला फटका बसण्याची शक्यता आहे. दरम्यान सोमवारी आ. आहिरे यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत उमेद्वारी अर्ज भरला असून ४ नोव्हेंबर नंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

आ. सरोज आहिरे यांच्या रॅलीत तरुण, महिलासह ग्रामिण भागातील मतदार मोठया संख्येने उपस्थित होते. आहिरे यांना उमेद्वारी मिळल्यावर देवळालीत पुन्हा राष्ट्रवादीच येणार. मतदारसंघात केलेली विकासकामे आणि सर्वांना सोबत घेऊन काम करण्याच्या कार्यशैलीमुळे पुन्हा एकदा आ. सरोज आहिरे यांच्या रुपाने देवळालीत आमदार मिळणार असल्याचा दावा राष्ट्रवादीच्या समर्थकांनी सोमवारी व्यक्त केला.

> देवळाली मतदारसंघातील विकास हीच आपल्या यशस्वी कामाची पावती आहे. पस्तीस वर्षातील मतदारसंघ आणि पाच वर्षातील मतदारसंघ या दोन्ही कालावधीची तुलना केल्यावर लक्षात येईल की, पाच वर्षात जो विकास झाला. तो याआधी कधीही झाला नाही. हे आपण नव्हे तर मतरासंघातील नागरिक बोलून दाखवत आहे. त्यामुळे जनता महायुतीवर विश्वास ठेवून आपणास पुन्हा विधानसभेवर पाठवतील.
>
> **- आ. सरोज आहिरे,** देवळाली



# फरांदे यांनी रॅलीद्वारे शक्तिप्रदर्शन करत भरला उमेदवारी अर्ज

## विनोद तावडे यांची रॅलीत उपस्थिती

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक मध्य विधानसभा मतदार संघाच्या आमदार देवयानी फरांदे यांनी घारपूरे घाट अशोकस्तंभ येथून रॅली काढत जोरदार शक्तिप्रदर्शन केले. रॅलीमध्ये भाजपा राष्ट्रीय महामंत्री विनोद तावडे यांनी रॅलीत हजेरी लावली. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यकर्ते आणि इतर पदाधिकारी यांनी गर्दी केली.**

विधानसभा निवडणूकीसाठी उमेदवारी जाहिर झाल्यानंतर देवयानी फरांदे यांनी आगामी काळात ड्रग्जमुक्त शहर, विकासकामे, नवीन उद्योग आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी माध्यमांना बोलतांना सांगितले.

विधानसभा निवडणुकीसाठीची उमेदवारी जाहीर करण्यात आल्यानंतर मोठा जल्लोष करण्यात आला होता. वसुबारसच्या मुहुर्तावर रॅलीद्वारे शक्तीप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज भरण्यात आला. नाशिक मध्य मतदार संघात मोठ्या प्रमाणात विकासकामे केली आहेत. शहराचा अजून विकास करायचा असल्याने विरोधक काहीही प्रचार करत असले तरी आपण पुन्हा बाजी मारू, असे आ. फरांदे म्हणाल्या.

# सिन्नर विधानसभेसाठी राहुल शर्मा निवडणूक निरीक्षक

## निवडणूक तक्रारींचे होणार निरसन

**सिन्नर : प्रतिनिधी**

**१२० सिन्नर विधानसभा निवडणुकीवर निरीक्षण करणे कामी निवडणूक आयोगाने राहुल शर्मा यांची निरीक्षक म्हणून नेमणूक केली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी रवींद्र भारदे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सुरेंद्र देशमुख यांनी ही माहिती दिली.**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करीता भारत निवडणूक आयोगाने निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर केला आहे. १२०, सिन्नर विधानसभा मतदार संघाकरीता निवडणूकीवर भारत निवडणूक आयोगाने निरिक्षक म्हणून राहूल शर्मा (भा. प्र. से.) यांची नेमणूक केली आहे. सोमवारी (दि. २८) त्यांचे सिन्नर तालुक्यात आगमन झाले आहे. त्यांची राहण्याची व्यवस्था शासकीय विश्रामगृह सिन्नर येथे करण्यात आली आहे. सार्वत्रिक विधानसभा निवडणूकीचे संदर्भात काही तक्रारी व सुचना असल्यास त्यांना ९३५६६५०९५७ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल. तसेच त्यांना भेटण्यासाठी संपर्क अधिकारी प्रविण भोसले यांना ७५८८१७५७४५ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल.